# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – ३६
## सभावृत्तांत

दिनांक – १९.१०.२०१९ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर- २०१९ ची मासिक मा. महापालिका सभा शनिवार दिनांक १९/१०/२०१९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर

२) मा.वसंत प्रभाकर बोराटे

३) मा.बारसे प्रियांका प्रविण

४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

५) मा.अनुराधा गणपत गोरखे

६) मा.अश्विनी भिमा बोबडे

७) मा.संजय बबन नेवाळे

८) मा.शैलजा अविनाश मोरे

९) मा.अपर्णा निलेश डोके

१०) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

११) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

१२) मा.कोमल दिपक मेवानी

१३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१५) मा.नवनाथ दत्तू जगताप

१६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१७) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर- आयुक्त, मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.दुरगुडे-सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब, सभागृहात पुरेशी गणसंख्या नसल्यामुळे आजची सभा गणसंख्येअभावी तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** आजची सभा गणसंख्येअभावी बुधवार दि. २०/११/२०१९ रेजी दु. १.३० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – ३६
## सभावृत्तांत
## (दि.१९/१०/२०१९ ची तहकूब सभा)

दिनांक – २०.११.२०१९ वेळ – दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१९/१०/२०१९ ची तहकूब मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २०/११/२०१९ रोजी दुपारी १.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ९) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ११) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १२) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १३) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १४) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| १५) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |

१६) मा.गोफणे अनुराधा देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२७) मा.सावळे सिमा रविंद्र

२८) मा.लोंढे नम्रता योगेश

२९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०) मा.गीता सुशिल मंचरकर

३१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.मंगला अशोक कदम

३६) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३७) मा.अश्विनी भिमा बोबडे

३८) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३९) मा.संजय बबन नेवाळे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.भालेकर प्रविण महादेव

४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४५) मा.घोलप कमल अनिल

४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.जावेद रमजान शेख

४९) मा.यादव मीनल विशाल

५०) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५१) मा.प्रमोद कुटे

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा.शैलजा अविनाश मोरे

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६०) मा.ढाके नामदेव जनार्दन

६१) मा.करुणा शेखर चिंचवडे

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६७) मा.जयश्री वसंत गावडे

६८) मा.कोमल दिपक मेवानी

६९) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७०) मा.सुलक्षणा राजू धर

७१) मा.शाम गणपतराव लांडे

७२) मा.सुजाता सुनिल पालांडे

७३) मा.योगेश मंगलसेन बहल

७४) मा.कदम निकीता अर्जुन

७५) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७८) मा.नढे विनोद जयवंत

७९) मा.पाडाळे निता विलास

८०) मा.काळे उषा दिलीप

८१) मा.कोकणे संतोष अंकुश

८२) मा.पवार मनिषा प्रमोद

८३) मा.बारणे अर्चना तानाजी

८४) मा.अभिषेक गोविंद बारणे

८५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८६) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

८७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८) मा.बारणे माया संतोष

८९) मा.निलेश हिरामण बारणे

९०) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९१) मा.दर्शले रेखा राजेश

९२) मा.कलाटे राहुल तानाजी

९३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९४) मा.ममता विनायक गायकवाड

९५) मा.कामठे तुषार गजानन

९६) मा.चोंधे आरती सुरेश

९७) मा.कस्पटे संदिप अरुण

९८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१००) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२) मा.कुटे निर्मला संजय

१०३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०५) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०६) मा.मुंढे उषा अंकुश

१०७) मा.लोखंडे चंदा राजू

१०८) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०९) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११०) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१११) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११२) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११३) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११४) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११५) मा.नवनाथ दत्तू जगताप

११६) मा.संतोष बबन कांबळे

११७) मा.सोनवणे शारदा हिरेन

११८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२०) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२१) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२४) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य

लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.निकम, मा.तुपे, भालकर - सह शहर अभियंता, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.गाडेकर -प्र.सहा.आयुक्त, मा.साळूंके- मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील- प्राचार्य, औ.प्र.कैंद्र, मा.मुंढे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.गलबले, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख, मा.धानोरकर, मा.रामगुडे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मो.गोफणे-आरोग्य अधिकारी, मा.बहूरे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, गुरुदास दासगुप्ता- भाकपचे जेष्ठ नेते तथा माजी खासदार, गिरिजा कीर- जेष्ठ लेखिका, सोपान महाराज नामदास- संत नामदेव महाराजांचे १७ वे वंशज, अतुल आळशी, निशा पिसे- दै.प्रभात पिंपरी चिंचवड आवृत्तीच्या उपसंपादिका, बाबासाहेब धाबेकर- जेष्ठ कॉंग्रेस नेते तथा माजी मंत्री, टी.एन. शेषन- माजी निवडणुक आयुक्त, गीता माळी- सुप्रसिध्द गायिका, सिंधुताई पांढारकर- माजी पीसीएमटी सदस्य, चंद्रकांत शिवराम डोके- माजी महापौर अपर्णा डोके यांचे सासरे, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे माजी विश्वस्त, विमल बाळासाहेब साळुंके, बाळासो. नामदेव लांडगे- पीएमपीएमएल कर्मचारी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. संजय वाबळे-** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** श्रध्दांजलीसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज ज्या काही वर्तमानपत्रामध्ये बातम्या आल्या आहेत, आयुक्तांच्या माध्यमातून अस सांगण्यात आल आहे की शहरामध्ये दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय

आदरणीय आयुक्तांनी काल कुठल्यातरी मिटींगमध्ये घेतला गेला आणि आज सर्व वर्तमानपत्रामधुन त्याच्या बातम्या छापून आलेल्या आहेत. खरतर या पिंपरी चिंचवड शहराच दुर्भाग्य आहे की “धरण उषाला आणि कोरड घशाला” अशा माध्यमातून या शहराची अवस्था झालेली आहे. मा.महापौर साहेब, गेले अनेक वर्षे आम्ही या सभागृहामध्ये असताना, ठिक आहे ज्यावेळेस उन्हाळा असतो त्यावेळेस एक दोन महीने आपण पाण्याची ॲडजेस्टमेंट करण्याचा प्रयत्न करतो. पण आज शंभर टक्के पवना धरण भरलेल असताना काय एवढ मोठ झाल आहे की आज आपल्याला पाण्याची कपात दिवसाआड करायला लागली आहे. आज शहरामध्ये सर्वसामान्य नागरीकांच्या समोर ज्यावेळेस नगरसेवक जातो त्यावेळेस आम्हांला प्रश्नांची उत्तर देतांना नाकीनऊ यायला लागलेली आहेत. कुठल्याही ठिकाणी जा प्रत्येक ठिकाणी पाण्याचा प्रॉब्लेम आहे. मग ही जी काही समस्या आलेली आहे ती जाणुनबुजून आलेली आहे का, ती प्रशासनाने केलेली आहे का, कोणाच्या हितासाठी केलेली आहे का, का टँकरलॉबीसाठी केलेली आहे का. मा.महापौर साहेब, हा खुप महत्वाचा विषय आहे, आज शहरामध्ये प्रत्येक नागरीकांना पाण्यासाठी त्रास आहे, आम्हांलाही त्रास असेल असं असताना आयुक्तांनी जे काही पाणी कपातीच धोरण अवलंबविण्याचा प्रयत्न केला त्याचा पहील्यांदा मी जाहीर निषेध करतो. कारण असं शक्य होणार नाही की तुम्ही डायरेक्ट जाणार, पाणी बंद करणार, दिवसाआड सोडणार हा मनमानी कारभार आम्ही कोणी चालू देणार नाहीत. शहरामध्ये प्रत्येक जण सांगतो, आम्ही बघतोत की पवना धरण फुल भरलेल आहे. पवना धरणामध्ये चांगल पाणी असताना नियोजनशुन्य कारभार, आयुक्तांचा जर काही पोरखेळपणा असेलतर, आयुक्तांना पाणीपुरवठा नीट करता येत नसेलतर ठिक आहे ज्यावेळेस राष्ट्रवादी कॉँग्रेसची सत्ता असताना पाणी आम्ही सगळयांना सुरळीत देत होतो. सगळयाना चांगल पाणी चालू होतं. कोणीही सांगाव सभागृहामध्ये, त्यावेळेस सगळ चांगल होतं. मग दिड वर्षात एवढी मोठी काय लोकसंख्या वाढलेली आहे. दोन लाख, तीन लाख, चार लाख, पाच लाख एवढी मोठी काय लोकसंख्या वाढलेली आहे की आपल्यावर ही नौबत आलेली आहे की आपल्याला दिवसाआड पाणी करायला लागतय. हा प्रशासनाचा भोंगळ कारभार आहे. प्रशासनाला जमत नाही, प्रशासनाला काम करता येत नाही हा माझा सरळ सरळ आरोप आहे. का लिकेज बघत नाहीत, का नवीन लोकांचे कनेक्शन बघत नाहीत, का लोकांना पाणी येत नाही, काय झाल त्या २४X७ च. कोणाकोणाकड चार्जेस आहेत. २४X७ यासाठी आणलेल होतं की आम्हांला २४ तास पाणी मिळणार होतं म्हणून आम्ही २४X७ आणल. कुठ

आडकल साहेब ते, पाण्यासाठी जे कन्सलटंट आतापर्यंत नेमलेले आहेत, त्यांनी आतापर्यंत काय केलं, किती त्याला पैसे पुरवले, किती त्याला बील आदा केलं. हे सर्व प्रश्न आज आपल्यासमोर मा.महापौर साहेब आलेले आहेत. आज मा.महापौर साहेबांचा चेहरा खुललेला आहे, आज आम्हांला तुम्हांला दु खवायच नव्हतं. आज आनंदात दिवस घालायचा होता कारण आपला आज या आपल्या कार्यकाळामधला शेवटचा आणि चांगला दिवस आहे म्हणुन आम्हांला आनंद व्यक्त करायचा होता पण आज पेपरला ज्या बातम्या वाचल्या गेल्या त्यामुळे सगळया नगरसेवकांना, म्हणजे माझ्यासह सगळयांना विचारा, अन्तकरणापासून विचारा की तुम्हांला आज दिवसभरात किंवा काल परवा किती लोकांना फोन येतात लोकांना काय त्रास होतो हा त्रास त्या नगरसेवकाला माहिती आहे, अधिका-याला कोणी फोन करत नाही. अधिकारी एवढ मदमस्त झालेले आहेत ते सांगतात त्याला फोन कर याला फोन कर. आमच्या हातात काही नाही. ही उत्तर अधिका-यांची. तांबेना तर कितीही बोला काहीही करा तेल लावलेल्या पइलवाना सारख कोणच्याही हाताला लागत नाहीत. पाण्याची कपात करायला वेळ जर तसा असेलतर आम्ही तुम्हांला सपोर्ट केलेला आहे. पण ती वेळ आज नाही. पक्षनेते तुम्हांला विनंती करतो हा जो काही तुम्ही निर्णय घेता, किंवा घेतला असेलतर साफ चुकीचा आहे. राहूलदादा पण बोलले होते की ज्या आता नवीन स्किम्स आलेल्या आहेत त्याना पाणी दयायच बंद करा. ज्या नवीन नवीन डेव्हलपमेंट होतात त्यांना पाणी दयायच बंद करा. तीथ सरसगट चालल आहे. मात्र सर्वसामान्य माणसाला पाणी नाही. पण बिल्डर्स लॉबीला दुस-या दिवशी कनेक्शन देण्याच काम होत कारण तीथ तुम्हांला आर्थीक मलीदा मिळतो. एखादयाला कनेक्शन दिल की आपल्या अधिका-यांच टेबलाखालून टेबल वरुन काहीतरी मिळतं आणि सर्वसामान्य माणुस नळ कनेक्शन मागायला गेलातर त्याला सहा सहा महीने हेलपाटे मारायला लावतात ही आपली कामाची पध्दत आहे. मा.महापौर साहेब, मी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने आपल्याला विनंती करतो की या पाणीकपातीला मा.महापौर साहेब, तुमचा विरोध असताना याचा अर्थ आयुक्त तुमच ऐकत नाहीत. मा.महापौर साहेब तुम्ही आज निर्णय घेताना खरच शेवटच्या दिवशी चांगला निर्णय घ्या. पाणी कपात न होणे गरजेचे आहे नाहीतर शहर आपल्याला माफ करणार नाही. नागरीक आपल्याला माफ करणार नाहीत. मोटार एकाची पकडलीतर दुस-याचे पैसे घेतात, दुस-याची पकडली की तीस-याचे पैसे घेतात. नळाच्या कनेक्शनला मोटार लावतात त्याच्यामुळे इतरांना पाणी मिळत नाही कारण शेजारच्या चार नळाच पाणी ती मोटार ओढून घेते त्यांच्यावर का कारवाई

करत नाहीत. गेले अनेक दिवसापासून सर्व शहर पाणी पाणी करतय तर आपण निर्धास्तपणे आहात. मला तर शंभर टक्के वाटतय की या शहरामध्ये टँकर लॉबीच प्रमाण वाढलेल आहे त्यांना पोसण्यासाठी किंवा अधिका-यांचा नाकर्तेपणा झाकण्यासाठी, आपल्याला काम करता येत नाही यासाठी आपण ही जबरदस्तीन आमच्यावर, या शहरावर पाणीकपात लादताय असा माझा आरोप आहे. मा.महापौर साहेब, आपल अभिनंदन करत असताना गेल्या दिड वर्षे अतीशय चांगल काम सभागृहामध्ये केल आहे. हे करत असताना आजच्या दिवशी तुम्ही आयुक्तांना जाब नीट विचारा आणि नीट जरा कडक भाषेत सांगा की हे करण शहराच्या दृष्टीने धोकादायक आहे. पाणी कपात करण किंवा दिवसाआड पाणी करण हे धोकादायक आहे. नसेलतर आयुक्तांनी या सभागृहामध्ये मान्य कराव की मला प्रशासन सांभाळता येत नाही, मी निष्क्रीय अधिकारी आहे असं आपण सभागृहात डिक्लेअर कराव आम्ही पण समजून घेवू. म्हणून मी या पाणी कपातीला आमच्या राष्ट्रवादीच्या वतीने जाहीररीत्या निषेध करतो आणि पाणीकपातीला तीव्र शब्दात विरोध करतो.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर दत्ता काकानी सुरवात केली आणि पाण्याच्या विषयावर मलाही बोलायच आहे. काल सगळया गटनेत्यांना घेवून बैठक घेतली, राहूल कलाटे फक्त नव्हते. त्या बैठकीमध्ये सगळया गटनेत्यांना घेवून आयुक्तांनी हा निर्णय जाहीर केला. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की या संदर्भामध्ये आयुक्तांच म्हणण या सभागृहासमोर सांगाव त्यानंतर आपण चर्चा करुयात.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठयाची जाबाबदारी पिंपरी चिंचवड महापालिकेवर आहे आणि संपुर्ण पिंपरी चिंचवडकर नागरीकांना पुरेस, किफायतशीर आणि पिण्या इतक पाणी देण्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महापालिकेच प्रशासन पाणीपुरवठा विभागाच्या वतीन राबवण्यात येत असते. त्याच्यामध्ये सर्व नागरीकांना पुरेस पाणी देण्याच्या अनुषंगान सारासार विचार करुन आजची परिस्थिती, भविष्यात होऊ घातलेली वाढ, आपल्या स्त्रोताची स्थिती, उपलब्ध पाण्याची स्थिती नवीन स्त्रोत बळकट केल्यानंतर आपल्याला मिळणार पाणी हे सगळे अंमलबजावणी करण्यासाठी लागणारा कालावधी, चालू प्रकल्प पुर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी, सध्याच्या पाणी वापराची स्थिती, विवीध भागातले नागरीक किती पाणी वापरतात, शहरातील पाण्याची गळती, पाण्याची चोरी, अनधिकृत बांधकामाद्वारे करण्यात येणारा

अनधिकृत पाण्याचा वापर या सर्व विषयांचा ऊहापोह करुन कुठल्याही प्रकारची कपात न करता केवळ डिस्ट्रीब्यूशन व्यवस्था एक दिवसाआड करण्याचा निर्णय प्रशासनान सर्व गटनेत्यांच्या समवेत चर्चा करुन घेतलला आहे. यापुर्वी ज्या ज्यावेळेला आपण एकदिवसा आड पाणीपुरवठा केलेला आहे त्या त्यावेळेला टंचाईग्रस्त स्थिती आपल्या शहराला होती. आपल्या धरणामध्ये पाणी कमी झालेल होतं आणि म्हणून पर्यायान पाणीबचत करण्याच्या हेतूनं आपण तसा निर्णय वेळोवेळी घेतलेला होता. मात्र आपल्या सर्वांच्या समोर मी सांगू इच्छितो की, आपल्या धरणामध्ये पाण्याची स्थिती समाधानकारक आहे. संपुर्ण वर्षभर पुरेल इतक पाणी धरणामध्ये उपलब्ध असताना देखील एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा हा निर्णय प्रशासनाने जो घेतलेला आहे त्याच्या मागे कपात हे धोरण नाही. मी पुनश्च एकदा सांगतो की पाणी जेवढ आपण दर दिवशी उचलतो तेवढच पाणी आपण उचलत राहणार आहोत आणि तेवढच पाणी आपण पंप संपुर्ण शहरामध्ये करणार आहोत. केवळ दोन दिवसाला एखादया घराला लागणार पाणी आपण एक दिवसामध्ये पंप करणार आहोत अशा स्वरुपाची भूमिका प्रशासनान या धोरणामध्ये ठेवलेली आहे. त्यामुळ याच्यामध्ये कपातीच धोरण नसुन एक दिवसाआड पाणीपुरवठा हा डिस्ट्रीब्यूशनमध्ये समसमानता आणण्याच्या हेतूनं केलेली अंमलबजावणीची एक स्टेप आहे हे मी सुरवातीलाच आपल्या सर्वाच्या समोर व्यक्त करतो आहे. याच्यामध्ये हा निर्णय घेत असताना हा निश्चितपणे हा अडचणीचा निर्णय आहे हे मला देखील माहिती आहे. कारण अनेक घरामध्ये स्टोअरेजची कपॅसिटी पर्याप्त नसते. सोसायटया असतील किंवा प्लिन्थ बांधकाम असतील त्यांच्याकडे अंडरग्राऊंड टाकी आणि वरती ठेवलेली टाकी अशी व्यवस्था आहे अशा नागरीकांना अशा व्यवस्थेचा निश्चितपणे थोडासा फटका बसतो पण तरी त्यांच्याकडे स्टोअरेज व्यवस्था असल्याने अडचण येत नाही. मात्र ज्यांच्याकडे स्टोअरेज व्यवस्था कमी आहे, पर्याप्त नाही अशाना निश्चिपणे या व्यवस्थेचा फटका बसतो आणि त्याच्यासाठी आपल्याला काही काळासाठीच ही उपाययोजना राहणार आहे हे सर्वप्रथमच मी पाणीपुरवठा विभागाला देखील स्पष्ट करु इच्छितो. कालच्या सभेमध्ये सक्त वॉर्निंग पाणीपुरवठा विभागाला दिलेली आहे की एक दिवसाआड पाणीपुरवठा झाला म्हणजे त्यांनी कुठल्याही पध्दतीना रिलॅक्स होण्याची अपेक्षा नाही, त्यांच्याकडन जी जी कायमस्वरुपी रचना आहे म्हणून स्विकारण्याची आवश्यकता नाही. हा निर्णय दोन महीन्यानंतर पुनश्च रिन्यू केला जाईल आणि इतर जी निर्णय प्रक्रीया आपल्याला करावी लागणार आहे ती जर झाली नाहीतर

पुनश्च हा निर्णय एक दिवसाआड पाणीपुरवठा रद्द करुन दरदिवशी पाणीपुरवठा प्रत्येक भागाला करण्याच धोरण आपण त्याच्यावरती निर्णय घेवू शकतो. याच्यामध्ये दोन तीन गोष्टी यासोबत जे प्रशासनाच्या वतीने निर्णय घेण्यासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत त्या अशा आहेत की आपल्या शहरामध्ये पाणीगळती, पाणी चोरी आणि अनधिकृत पाणी वापर या तीन्ही बाबीमध्ये जवळपास पस्तीस ते चाळीस टक्के आपल पाणी वाया जात असतं या पाण्यावरती रोख लावण्याचा महत्वपुर्ण निर्णय प्रशासनान घेतलेला आहे. याच्यामध्ये दोन बाबी करण्यात येणार आहेत. आपण सभागृहान अनधिकृत नळजोड नियमानुकूल करण्याचा निर्णय यापुर्वीच घेतलेला आहे. मात्र आपण अनधिकृत नळजोड नागरीकांच्या स्वेच्छेन नियमानुकूल करण्याची भूमीका आतापर्यंत ठेवलेली होती, नागरीकांना वेळोवेळी सांगूनही त्यांच्याकडन पुरेसा म्हणावा तीतकासा प्रतीसाद येताना दिसत नव्हता. याच्यावरती सुधारीत निर्णय प्रशासनाच्या वतीने घेण्यात येत आहे तो असा आहे की ज्या ठिकाणी अमृत योजना असेल किंवा २४X७ च्या योजनेच काम सुरु असेल त्याठिकाणी, ज्या ज्या ठिकाणी असलेले अनधिकृत नळजोड सापडले की ते त्या जागेवरती नियमानुकूल करण्यात येतील. त्याच्यासाठी मीटर लावून ते कनेक्शन जे नियमानुकूल करण्यासारखे कनेक्शन असेल ते करण्यात येईल. त्याठिकाणी जर जे काही ॲरीअर्स, रक्कम जी ग्राहकाकडन वसूल करणं अपेक्षीत असेल ती त्यांनी त्याठिकाणी दिली तर ठिक, नाही दिलीतर त्या कनेक्शन्स वरती ॲरीअर्स स्वरुपामध्ये दडवून इक्वल हप्त्यामध्ये, जी पॉलीसी ठरेल त्याप्रमाणे त्यांच्याकडन वसुल करण्यात येईल. जे कनेक्शन्स अतिरीक्त आहेत किंवा नियमानुकूल करण्यासारखे नाहीत, विशेषत्वान कमर्शिअल कनेक्शन्स जे असतील ते तात्काळ त्याठिकाणी निष्काषीत करण्यात येतील. असे कमर्शिअल कनेक्शन्स जे की बांधकामासाठी वापरले जात आहेत, कार वॉशिंग सेंटरसाठी वापरले जात आहेत किंवा हॉटेल्स किंवा अन्य पाणी वापर जास्त करणारे जे घटक आहेत, कमर्शिअल वापर करणारे आहेत ते जर अशाप्रकारचे कनेक्शन्स वापरताना दिसून आल्यास त्यांचेवरती तात्काळ निष्कनेक्शन्स करुन त्यांच्यावरती फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देखील प्रशासनाला दिलेले आहेत. जर याच्यामध्ये कुठल्याही अधिका-याकडन हयगय होताना दिसली त्यांच्यावरती प्रशासकीय कारवाई करण्याची देखील तरतूद ठेवण्यात येत आहे. दुसरी जी बाब आहे ती पाणीपुरवठा करताना संपुर्ण शहरामध्ये समसमान पाणीवापर होताना दिसत नाही. काही भागामध्ये जे कमांड ऐरीयाजमधले लो लाईन ऐरीयाज आहे किंवा आपल्या ज्या

भागामध्ये डिस्ट्रीब्शून लाईन्स सुरवातीला आहेत त्या परिसरामध्ये अतिरीक्त पाण्याचा वापर होताना दिसतो. नागरीकांनाही सांगण्यात येते की त्यांच्या घरामधले जे लिकेजेस आहेत ते त्यांनी दुरुस्त करावेत. त्यांच्या घरामध्ये जो काही पाण्याचा अतिरीक्त गैरवापर होतो आहे तो कमी करण्यासाठी नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे आणि ज्या भागामध्ये पाणी वापर कमी होतो आहे किंवा पाणी कमी उपलब्ध होत आहे त्याठिकाणी अतिरीक्त पाणी पुरवण्यासाठी या अल्टरनेट डेजच्या माध्यमातून समसमान पाणी वापर करण्याच्या हेतून प्रेशराईज पध्दतीन पाणीवापर वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तरी आपल्याला जे काही शहरामध्ये स्त्रोत उपलब्ध आहेत यांच देखील बळकटीकरण करणं अत्यंत आवश्यक आहे. यापुर्वी झालेल्या जनरल बॉडीमध्ये म्हणल्याप्रमाणे आपल्याला आज उपलब्ध असलेले स्त्रोत, उपलब्ध असलेली पंपींग क्षमता आणि उपलब्ध असलेली ट्रिटमेंट कपॅसीटी या तीन्हीचा विचार जर आपण केलातर आजच्या स्थितीमध्ये रावेत येथील पंपींग स्टेशनवरती जेवढे काही पंप आहेत तेवढे सगळयाची सगळे पंप चोवीस तास पुर्ण क्षमतेन आज वापरले जात आहेत. आणि त्यामुळे त्या पंपींग क्षमतेमध्ये कुठेजरी खंड पडला, फ्रिक्वेन्सी जरी कमी झालीतरी सुध्दा त्याच आऊटपुट कमी होतो आणि पर्यायानं उपलब्ध होणार पाणी कमी होतं आणि त्यामुळे काही भाग बाधित होतात आणि पर्यायानं नागरीकांची गैरसोय होते आणि त्याची नाराजी आपल्या सगळयांना भोगावी लागते. याचा विचार करता आजच्या ठिकाणी सेक्टर २३ मध्ये जर आपल्याला ॲडीशनल कपॅसिटीची ट्रिटमेंट जी शिल्लक आहे ती एक्सप्लट करण्यासाठी रावेतमधन आपल्याला अतिरीक्त पंपींग कसं करता येईल याचा विचार प्रशासनाने कन्सलटंटच्या माध्यमातून, आपल्या पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून केलेला आहे. त्याची व्यवस्था करण्यासाठी आपल्याला ॲडीशनल सबस्टेशन निर्माण कराव लागणार आहे त्याच्यासाठी जागा शोधण्याचे निर्देश, तात्काळ युध्दपातळीवरती जागा शोधून सबस्टेशन निर्माण करायला घेतल्यास पुढील तीन ते सहा महीन्यामध्ये निश्चित होईल, आपण किती लवकर हे सब स्टेशन निर्माण करुन घेवू शकतो, ॲडीशनल पंप एस्टॅब्लीश करु शकतो, ज्या वर्षात अतिरीक्त पाणी आपल्याला पवनेमध्ये उपलब्ध होतं तीकडन आपल्याला पंप करुन घेता येवू शकेल. याच्यासाठी आपण एक काम सुरु करतो आहोत आंद्र-भामा-आसखेड योजनेसाठीच आपल्याला आरक्षण मंजूर आहेत. आंद्र धरणातल पाणी देहू बंधा-यातन शंभर एमएलडी उचलण्यासाठी जी योजना आहे त्याची दोन टप्प्यांची टेंडर निवीदा प्रक्रीया पुर्ण झालेली असून त्याचे काम लवकरच सुरु करण्यात येत

आहे. त्याच जे ऍडव्होकच काम आहे ते देखील निवीदा प्रक्रीया अंतीम टप्प्यात आहे. त्याच्यामध्ये काही उच्च दराने निवीदा प्राप्त झाल्या होत्या त्यामुळ त्याच इस्टीमेट रिव्हाईज करुन, वास्तवदर्शी करुन त्याच्या अनुषंगान आपण निवीदा प्रक्रीया तात्काळ करतो आहोत. मात्र ही देखील काम आपल्याला वेगान पुर्ण करावी लागतील. पाणी जरी अतिरीक्त उपलब्ध झालतरी वाढत्या शहराला, जी गाव आहेत या गांवामध्ये वितरण व्यवस्था पर्याप्त नाही आणि त्यामुळे अस्तित्वात असलेल्या वितरण व्यवस्थेवरच ताण येवून टेल आणि हेड अशा स्वरुपाची घटना निर्माण होते आणि त्यामुळे असमसमान पाणी वाटप शहरामध्ये होतं. याकरिता आपल्याला डिस्ट्रीब्यूशन मेन्स सुमारे ५५ कि.मी. लांबीच्या आणि सुमारे २७ टाक्या नव्याने तयार कराव्या लागणार आहेत. याचा डीपीआर प्रकल्प पुर्णपणे तयार करण्यात आलेला असून त्याचे चार पॅकेजेस तयार करुन त्याची निवीदा प्रक्रीया लवकरच सुरु करण्यात येत आहे. भामा-आसखेड प्रकल्पाच आपल्याला काम देखील पुढे शहराचा जर आपण अनुभव विचारात घेतलातर त्यांना आठ नऊ वर्षे एक प्रकल्प पुर्ण करण्यासाठी लागेल त्याच्यामध्ये काही कारणामध्ये नागरीकांचा रोष आपल्याला लागू शकतो. हे विचारात घेता त्याची देखील डीपीआर प्रक्रीया अंतीम टप्प्यात आणलेली असून त्याची देखील आपण इमीजेटली निवीदा प्रक्रीया सुरु करतो आहोत. सगळयात शेवटी जे काही आपल्याला पाणी आहे त्याच्यामध्ये इन्डस्ट्रीअल वापर असेल कमर्शिअल वापर असेल हा जर वापर आपण रिसायकल टर्सिरीटेड पाण्यान जर स्वाप करु शकलोतर तेवढ अतिरीक्त पाणी आपल्या शहरामधल्या नागरीकांना पिण्यासाठी, पोटेबल युजसाठी उपलब्ध होवू शकेल. याकरिता या सभागृहानं यापुर्वीच आपल्याला धोरण मंजूर करुन दिलेलं आहे त्या धोरणानुसार ७५ एमएलडीची कासारवाडी येथील रिसायकल रियुज कीज आणि च-होली वरुन ५ एमएलडीची रिसायकल रियुज कीज या दोनच्या निवीदा प्रक्रीया लवकरच सुरु करण्याचा निर्णय प्रशासनान घेतलेला आहे. हे होत असतानाच अनेक ठिकाणी नागरीकांच्याकडे ग्राऊंड लेव्हलवरती टाक्या नसल्याने डायरेक्ट पहील्या माळयावर, दुस-या माळयावर, तीस-या माळयावर नागरीकांची अपेक्षा असते की प्रेशरन पाणी मिळाव. अशा नागरीकांना देखील अवाईड करण्यात येत आहे की आपल्याला वाढत्या लोकसंख्या, वाढत शहर आणि पाण्याची कमतरता याचा विचार करता सगळया ठिकाणी दुस-या माळयावरती किंवा त्याच्यावर वरती आपल्याला प्रेशर पध्दतीन पाणी उपलब्धता करुन देता येणं शक्य होणार नाही अशा परिस्थितीत त्यांनी ग्राऊंड फ्लोअरवरती एक स्टोअरेज टँक करुन पंप आणि संप माध्यमातून

त्यांनी रचना करावी अस अवाईड नागरीकांना करण्यात येत आहे. हे करत असतानाच मोटारचा वापर ज्या ज्या ठिकाणी होतो त्या त्या ठिकाणी पंधरा दिवसामध्ये त्या नागरीकांनी पर्यायी व्यवस्था केलीतर पंधरा दिवसानंतर आपल्या इकडे ग्रॅव्हेटी सब-डिव्हीजनमध्ये दोन आणि प्रत्येकी पंपींगच्या दोन डिव्हीजनमध्ये एक अशी मोटार विरोधी पथक आपण तयार करण्याची सूचना दिलेली आहे. पाणीपुरवठा विभागाला संपुर्ण प्रक्रीयेमध्ये २४X७ ची जी अंमलबजावणी आहे त्याच्यामध्ये नागरीकांचा जो रोष आहे की आपण अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवतो पण रिस्टोरेशन हैड्रॉलीक टेस्टींगच्या अभावान वेळेवर होत नाही. ही काम पुढील एक महीन्याच्या कालावधीमध्ये तात्काळ पुर्ण करुन त्यांच रिस्टोरेशन करण्याच्या सूचना देखील पाणीपुरवठा विभागाला दिलेल्या आहेत. मात्र पाणीपुरवठा विभागाने हे समजण्याच कारण नाही की ही उपाययोजना कायमस्वरुपी राहील. जर पाणीपुरवठा विभागाकडन कार्यक्षमपणान भविष्यामध्ये समसमान पाणी वाटपासाठी प्रयत्न ज्या पध्दतीने अपेक्षीत आहेत त्या पध्दतीने दिसले नाहीतर गटनेत्यांची समिती असेल, प्रशासन असेल हे पुनश्च त्याच्यावरती विचार करु शकेल याची माहिती देखील पाणीपुरवठा विभागाला देवून हा निर्णय आता आपण घेत आहोत. माझी सभागृहाला, सर्व सन्मा.सभागृहाला आणि सन्मा. नागरीकांना विनंती आहे की जी काही थोडीफार गैरसोय काही भागातील नागरीकांना होणार आहे त्याबद्दल आपण निश्चितपणे दिलगीर आहोत. पण नागरीकांना जर पाण्याचा वापर समन्यायीक पध्दतीने करायचा ठरवलं, काही भागातील नागरीक अतिरीक्त पाण्याचा वापर करतात त्यांनी जर आपला अतिरीक्त पाणी वापर कमी केलातर अशी वेळ आपल्यावरती येणार नाही आणि तेच जर कोणी, काही कालावधीत निदर्शनास आल की पाणी वापर काही भागातील कमी होतोय आणि ज्या भागात वंचित आहेत त्या भागात अतिरीक्त पाणी आपण वापर देवू शकतो तर याच्यावर आपण पुनर्विलोकन निश्चित करु शकू. येथेच्छ मुद्दयासकट मी माझ निवेदन संपवतो, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता जे आयुक्तांनी निवेदन केल मला त्यांची किव येते किव. आपल्या प्रशासनाचा भोंगळ कारभार झाकण्याच काम यांच्या निवेदनामधुन आता मला दिसलेल आहे. एका बाजूला सांगतात की आम्ही पाणी कपात करणार नाहीत आणि दुस-या बाजूला सांगतात की आम्ही दिवसाआड पाणी करु. ठिक आहे, तुमच्या भाषेत आम्हांला समजल, शंभर टक्के एका बाजूला पाणीपुरवठा करायचा आणि शंभर टक्के दुस-या बाजूला पाणीपुरवठा करायचा. पण असं करताना आपण जे यापुर्वीच सगळ

नियोजन लावलेल होतं त्याच्या बाबतीत आपण काही बोललेलं नाही. मग २४X७ च काय झालं, आमृत योजनंच काय झालं, कुठल काम कुठपर्यंत आल. ठिक आहे हास्यातून एकदा दयायला काही हरकत नाही. पण तुम्ही आता दिवसाआड पाणी कपात करायला निघालात. मा.महापौर साहेब, मला वाटत नाही की लोक या गोष्टीला ॲक्सेप्क्ट करतील. तुम्ही सरळ सांगीतल आहे ४० टक्के गळती. आम्ही कितीतरी वर्षे ऐकतो. ४० टक्के गळती, ४० टक्के गळती, ४० टक्के गळती. या गळतीला नियंत्रण आणणार कधी. हे नगरसेवक नियंत्रण आणणार आहेत, नगरसेवक तीथ जावुन काम करणार आहेत. नगरसेवक पाईपलाईन रिपेअर करणार आहेत, गळती काढायच काम कोणाच आहे. तुमच आहे का नगरसेवकांच आहे. आतापर्यंत आम्ही ही गळतीच ऐकतोय. ठिक आहे ४० टक्केच ३० टक्के व्हायला पाहीजे होतं. अजूनही तुमच ४० टक्केच आहे. पण जेवढे जेवढे तुम्ही ते कन्सलटंट लावलेत काम करतात, त्यांनी काय केलं याच्यावरती कोणी बोलले नाही. तुमच धोरण तुम्ही सांगता की आम्ही पाणी समसमान वाटप करु. एक दिवस इकड एक दिवस तीकड. पण ही गळती का होते, कुठून होते, कोण करतय, कोण चो-या मा-या करतय. याच्यावरती आपण सभागृहात का सांगीतल नाही. हे का सांगायची इच्छा आपल्याला झाली नाही. ठिक आहे सांगू दयानां सभागृहाला की ४० टक्के आमची या या पाँईंटला गळती आहे. मग पाईपलाईन फुटली, कोण चोरी करतय, कोण मीटर चोरुन घेतय, कोण टँकर वापरतय याच सांगाना काय केलं ते. आयुक्त साहेब, तुमच हे म्हणण आम्हांला अजीबात पटलेलं नाही. तुमचा नाकर्तेपणा या निमीत्तान दिसतोय. ठिक आहे आम्ही एप्रिल, मे, जुन समजून घेतल. तीन महीने आम्ही समजून घेतले दिवसाआड पाणी ठिक आहे, कारण धरणात पाणी नव्हतं. नागरीकाना समजावता येत होत की धरणात पाणी नाही तर आम्ही देवू कुठून. पण आज धरणामध्ये शंभर टक्के पाणी असताना तुम्ही हा निर्णय घेता. हा साफ चुकीचा निर्णय आहे साहेब. मा.महापौर साहेब, यांच एकही म्हणण अजीबात मान्य नाही. तुम्ही मा.महापौर साहेब, किती वेळा ऐकल सभागृहात गळती, गळती, गळती. अरे, ही गळती थांबवणार कोण. याला जबाबदार कोण आहे. तुम्ही सांगा या गळतीला आमका आमका नगरसेवक जबाबदार आहे किंवा महापौर साहेब जबाबदार आहेत किंवा मी जबाबदार आहे हे तुम्ही सांगाना. कशासाठी पाण्याची कपात करण्याच कारण सांगा. ठिक आहे भामा-आसखेडच आजना उदया होईल, पवना बंद जलवाहीनीच काय होईल ते होईल. ठिक आहे तुम्ही दोन तास देता ते एकच तास दया पण प्रेशरन दयानां. लोक तुम्हांला म्हणत नाहीत की आम्हांला

चोवीस तास पाणी द्या म्हणून. कुठलाही नागरीक म्हणणार नाही आम्हांला चोवीस तास पाणी पाहीजे म्हणून. एक तास द्या, प्रेशरनी द्या आणि चांगल द्या, वेळेवर द्या. माझ सात ते आठचा पाणीवेळ असेलतर सात ते आठलाच द्या, नऊ ते दहाला पाणी वेळ असेलतर नऊ ते दहालाच द्या. तुम्ही डायरेक्ट कपात करायला निघालात. हे अजीबात योग्य वाटत नाही. एखाद सर्वसामान्य कुटूंब आहे, आपली बैठी घर आहेत. दिवसाआड पाणी करताना एक सांगा की ज्यावेळेस आदल्या दिवशी पाणी साठवून ठेवतो आणि दुस-या दिवशी पाणी आल्यानंतर ते ओतून देतो याचा अर्थ आपण डबल वापर करतो. शिळ आणि ताज पाणी असा लोकांच भ्रम आहे. नळाच आल की ताज पाणी आणि शिळ पाणी ओतून देणं आणि ताज पाणी भरणं. प्रत्येकाकडे साठवणूकीसाठी काही आहे का नाही याची जबाबदारी पण घेणं गरजेच आहे. ठिक आहे त्या तीन महीन्यात लोक समजून घेतील. आता कोण समजून घेणार आहे. म्हणून महापौर साहेब, तुम्हांला विनंती आहे की या पाण्याच्या बाबतीत आपण कठोर निर्णय घेवून समसमान वाटप करा. तास कमी करा, वेळ कमी करा, ज्यांच्याकड जास्त आहे त्यांच कमी करा. आमच्याकड असेलतर आमच कमी करा पण सगळयांना समसमान पाणी वाटप करा असं आमच म्हणण आहे. तुम्ही टेल सांगताय पण ते आज आहे का. हे शहरामध्ये आज आहे का. तुम्ही आम्हांला आज का सांगताय. आम्हांला पण कळतयना, चढाला पाणी जात नाही उताराला पाणी जातय. पण त्या चढाच्या भागाला पाणी नेण्याची जबाबदारी ही प्रशासनाची आहे, नगरसेवकांची नाही. हे काम करण तुमच काम आहे. पाणी चोरी झालेली का सांगत नाहीत तुम्ही. चाळीस टक्के कपात ही का सांगत नाहीत. तुमची गळती, चो-या मा-या का सांगत नाहीत. तुमच्या अधिका-यांवर तुम्ही का करवाई करत नाहीत. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की या विषयाला आमचा तीव्र विरोध आहे आणि या विषयाचा आम्ही जाहीर निषेध करतो. पाणी कपात कुठल्याही नगरसेवकांच्या मनात नसणार आहे आणि ही करु नये अशी आमची आपल्याला अग्रहाची विनंती आहे, धन्यवाद.

**मा.मीनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम गेले चार महीने पाऊस पडतो, आता दिवाळीपर्यंत पाऊस पडत होता. काल्हापूरला ओला दुष्काळ जाहीर केला, अख्खा पुर्ण महाराष्ट्र पाण्यामध्ये आहे आणि अशा परिस्थितीमध्ये पिंपरी चिंचवडला पाणी कपात होते यासारखी वाईट गोष्ट दुसरी कुठली नाही. याचा मी माझ्या पक्षाच्या वतीने, शिवसेनेच्या वतीने

आणि पिंपरी चिंचवडच्या प्रत्येक सर्वसामान्य नागरीकांच्या वतीने जाहीर निषेध करते. हा निषेध फक्त अधिकारी वर्गाचा नसुन जे काम करतात पाणीपुरवठा विभाग त्यांचा नाकर्तेपणा आहे. गेले ते वर्षानुवर्ष, दहा वर्षे हे अधिकारी त्यांच्या खुर्चीला चिटकून आहेत. गेल्या पंचवार्षीकमध्ये कोणाचीही सत्ता असो पण तेव्हा पाणी कपात नव्हती हे मान्य करावेच लागेल. गेल्या दिड वर्षामध्ये अशी किती लोकसंख्या वाढली की या अधिका-यांना एवढ पाणी असुनही त्याच नियोजन करता येत नाही. म्हणजे अधिकारी वर्गाचा हा नाकर्तेपणा आहे. एवढा मोठा पगार त्यांना मिळतो तो कशासाठी मिळतो. मुबलक तुम्ही जर सर्वसामान्याना पाणी देवू शकत नाहीत. आयुक्त साहेब तुमचा हा जाहीर निषेध आहे. कारण सर्वसामान्यांच्या अपेक्षा असतात की आपल्याला व्यवस्थीत पाणी मिळाव, घरातील कचरा नीट वेळच्या वेळी उचलावा या सामान्य गरजा असतात आणि याकरिता एवढ पाणी असतानाही जर पुरवल जात नसेलतर खरच हा अधिकारी वर्गाचा निषेध आहे. त्याचप्रमाणे मा.महापौर साहेब तुम्ही गेले दिड वर्षे खुप चांगल काम केल आहे आणि वेळावेळी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. पण तुमचा आजचा कार्यकाळातील शेवटचा दिवस असताना तुम्हांला हे बोलण्याची वेळ येते आणि तुमच्या कार्यकाळात असा निर्णय होऊ नये म्हणून मी तुम्हांला नंम्र विनंती करते की कठोर शब्दात तुम्ही आयुक्तांना सांगा की माझ्या कार्यकाळात तरी ही पाणी कपात थांबवा. आम्ही मान्य करु शकतो की एप्रिल, मे मध्ये ही पाणी कपात झालीतर. पण धरण भरलेल असताना जर तुम्ही एवढी पाणी कपात करत असालतर खरच तुम्ही याच्याकडे गांभीर्याने घेतल पाहीजे. आपली पिंपरी चिंचवड ही कामगार नगरी आहे, गोरगरीब कष्टाने एक एक रुम करुन बांधतात आणि तुम्ही कालच स्टेटमेंट दिलय की अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करणार. तीच कारवाई तुम्ही जी सर्वसामान्य जनता आहे जी पाणीपट्टी भरते, सगळे कर भरते तेव्हा आपलीही जबाबदारी तवढीच पडतेना त्यांना अनधिकृत बांधकामावर एवढी कडक कारवाई करताय त्याचप्रमाणे सर्वसामान्य जनता पाणीपट्टी भरते त्यांना मुबलक पाणी देण्याच काम हे तुमच आहे. आदि  तुम्ही तुमची जबाबदारी पुर्ण करता का. एखादयान पाणीपट्टी घरपट्टी भरली नाहीतर तुम्ही लगेच फाईन देता मग कोणत्या हाक्काने तुम्ही हे मागताय, त्याच्यामुळे कुठल्याही राजकीय दाबाखाली काम न करता सर्वसामान्य जनतेच ध्येय हातात घेवून, कारण तुम्ही पुढे एक दोन वर्षात येथून निघुन जाताल, पण इथे जी सत्ता आहे त्यांना हे पुढील परिणाम भोगावे लागतील. त्याच्यामुळे मी नंम्र विनंती करते, त्याचबरोबर मागील

पंचवार्षीकमध्ये कांदयाच्या भावामुळे सर्वसामान्यांच्या डोळयातून पाणी आलं त्याच मुळे या पंचवार्षीकला पाण्यामुळे इथल्या लोकांच्या डोळयात पाणी येतय. सर्वसामान्य जनता ही बरोबर ज्यांच त्यांच उत्तर हे मतरुपाने देत असते. त्याच्यामुळे नम्र विनंती करते की तुम्ही पाणी कपात थांबवावी, धन्यवाद.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या महापालिकेच ब्रिद वाक्य आहे "कटिबध्दा जनहिताय" लाईट, पाणी, रस्ते आणि आरोग्याच्या संदर्भात ज्या मुलभूत गरजा आहेत त्या आपल्या महापालिकेनी जनतेला व्यवस्थित पुरवाव्यात. परंतु आयुक्त साहेब काल आपण घोषणा केली कि दिवसाआड पाणी देणार म्हणून, खरतर २४X ७ अमृत योजना ही का राबवली हा एक जनतेला पडलेला प्रश्न आहे. परवा खासदार साहेबांबरोबर मिटींग झाली होती तेव्हा आयुक्त साहेब आपण सांगीतलेल होतं की दिड वर्षात जवळ जवळ दिड लाख लोकसंख्या वाढलेली आहे. मग लोकसंख्या वाढते त्याप्रमाणे तसं आपण नियोजनही केल पाहीजे होतं. खरतर हे प्रशासन पाण्यासंदर्भात पुर्णपणे निष्क्रीय ठरलेलं आहे. मी आयुक्तांचा जाहीर निषेध करते की त्यांनी दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. खरतर चाळीस टक्के पाणी गळती होते. मग त्या गळतीच प्रमाण आता कमी व्हायला पाहीजे होतं. तीन वर्षापासून आम्ही गळती ऐकतो. मग ती गळती का कमी झाली नाही. चिंचवड गावात दोन वेळा पाण्याच वेळापत्रक आहे. चिंचवड गावात जी रस्त्यांची कामे चालू आहेत तिथे रोडच्या कामामुळे लाईन फुटते. अक्षरशः नागरीकांचे आम्हांला फोन येतात आम्ही अधिका-यांना फोन करतो तेव्हा तिथ लोक पोहचतात. मग तुमच काय काम चालल आहे. तीथल्या ठेकेदाराला कळत नाही का धो धो पाणी लोकांच्या समोर वाहतय आणि अधिकारी निष्क्रीय पणे बसलेले असतात. आयुक्त साहेब, मी निषेध करते तुम्ही खरच जनतेचा तळतळाट घेवू नका, धन्यवाद.

**मा.निता पाडळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब, तुम्ही दिवसाआड जो पाण्याचा निर्णय घेतला आहे तो खरंच चुकीचा आहे. कारण माझ्या प्रभागात एक दिवसाआड पाणी करुन आयुक्त साहेब, काही काही सोसायटया अशा आहेत की आज सुध्दा तिथ महिना महिनाभर पाणी गेलेल नाही. दिवसाआड पाणी केलतरी सुध्दा त्या सोसायटयांना पाणी जात नाही. तांबे साहेब स्वतः त्या सोसायटयात पाहायला आले होते, त्या सोसायटयांना अजीबात पाणी मिळत नाही. रोज पाणी असलतर कधीतरी येत पण दिवसाआड केल्यास तर अजीबात नाही. डेली टँकर घ्यावे लागतात. आयुक्त साहेब, मला एवढच तुम्हांला

सांगायच आहे की तुम्ही पाण्याच जे नियोजन आहे ते व्यवस्थित करा. माझ्या प्रभागामध्ये जे.ई, डेप्युटी, सांगतात तुमच्याकडे सेप्रेट टाकी नाही. आयुक्त साहेब २०१६ साली टाकीच भूमीपुजन झाल आहे. त्य टाकीच काम अजून चालू केलं नाही. पहीले पाईप जळाले त्यामुळ त्या पाईपाच इन्शुरन्स होण्यासाठी काम थांबल असं सांगतात, त्या पाईपाचा इन्शुरन्स एक वर्ष होणार नाही त्याच्या नंतर आमच्या टाकीच काम चालु होणार आहे का. आयुक्त साहेब, अजीबात आम्हांला पाणी मिळत नाही. आज सुध्दा सकाळी कोकणेनगर परिसरात, शिवरत्न कॉलनी, पंचरत्न, श्रीकृष्ण नगर येथे एक एक हांडाभर पाणी लोकांना मिळालेल आहे. आपले जे एक्झिक्यूटीव्ह आहेतना ते फक्त पालीकेमध्ये बसण्याच काम करतात, दुसर काही करत नाहीत. कामाच आपण प्रायव्हेट टेंडर देतो आणि त्याच्यातन तो माणुस ठेवतो तो माणुस त्यांना सांगतो की साहेब इथे असं केल पाहीजे, हा वॉल दाबा, तो वाल दाबा, असं करा, तस करा आलेला नगरसेवक ओरडला की त्यांच्या सांगण्यानुसार तो वॉल दाबायचा, तो नगरसेवक ओरडला की त्याच्या सांगण्यानुसार तो वॉल दाबायचा. फक्त वॉल दाबादाबी आणि कुठलतरी पाणी कमी करायच आणि कुठेतरी जास्त सोडायच हेच प्रभागात चालल आहे दुसर काही चाललेल नाही आयुक्त साहेब. पाण्याच्या लाईन जो ठेकेदार टाकतो तो तर पालीकेचा जावाई आहे का तेच काही कळत नाही. त्याचा स्वत:चा मनमानी कारभार चाललेला आहे. एक लूप तयार करायचा तर तो तीन तीन महीने लावतो. आयुक्त साहेब आपण पाण्याच्या लाईनच उद्घाटन केल परंतु तीन महीने त्या ठेकेदारांनी त्या कॉलनीतल्या पाण्याची लाईन टाकली नाही. का टाकली नाही ते त्याला विचारा. त्याला कोण सांगतय टाकायची नाही, काही करायच नाही. आयुक्त साहेब तुम्ही एकदा तीथ भूमीपुजन घेतल्याच्यानंतर ती लाईन का थांबवली जाते, तुम्ही तांबे साहेबांना हे विचारा. त्या कॉलनीत मी काल गेले होते तर एक-एक, दोन-दोन हांडे सुध्दा लोकांना पाणी मिळाल नाही. काही कॉलनीमध्ये पाणी येतं तर काही कॉलनीमध्ये पाणी येत नाही. एका कॉलनीत सुरवातीच्या दहा पंधरा घराना पाणी येतय आणि लास्टच्या घरांना अजीबात थेंबभरही पाणी नाही. तुम्ही सांगाना आयुक्त आम्ही काय करायच. एक दिवसाआड पाण्याची तुमची बातमी आम्ही काल मोबाईलमध्ये व्हॉटसअप वर वाचल्यानंतर अक्षरश: झोप उडाली, की आता त्या विजयनगरच्या सगळया सोसायटयाच करायच काय. त्यांना दिवसाआड पाणी केलतर अजीबातच पाणी मिळत नाही. आपले अधिकारी सांगतात मॅडम टेल असल्यामुळ लाईन रिकाम्याच असतात, थोडफार पाणी जाईल हा प्रकार तीथ होतोय, मग आम्ही करायच काय ते

सांगा. तुम्ही म्हणताय दिवसाआड पाणी करु पण दिवसाआड पाणी करुनही आमच्या प्रभागाला पाणीच मिळत नाही. मग करायच काय ते सांगा. याच्यावरती उत्तर आहे का, तुम्ही सांगताय अमृत योजनेची काम, एक माझी कॉलनी आहे तर त्या कॉलनीत तुमच्याकडे येवून ती लाईन टाकून घेतली. सहा महीन्यापुर्वी लाईन टाकली त्या कॉलनीचे कनेक्शन्स अजून झालेले नाहीत. आज सुध्दा आता तुम्ही तीथे गेलेनां तर लोक तुम्हांला ड्रेनेजच पाणी त्यांच्या हांडयात दाखवतील. पुर्ण ड्रनेज मिक्स पाणी येतय. तरी सुध्दा तो ठेकेदार कनेक्शन करत नाही, फक्त मनमानी कारभार. ज्या ठिकाणी त्यांनी लाईन टाकल्या आहेत त्याठिकाणचे पहील्यांदा कनेक्शन दिले पाहीजेत. एक एक वर्षभर तो पाण्याच्या लाईन चालू करत नाही, कनेक्शन देत नाहीतर त्याच्यावर तुमच आणि तुमच्या अधिका-यांच वर्चस्व आहे का नाही, का तो आपल्या पालीकेचा मालक झाला. कोण ठेकेदार आहे काय आहे हे आम्हांला काही माहिती नाही त्यांना एकदा बोलवा. फक्त त्यांच्या कॉन्ट्रॅक्टची माणस येतात आणि झाल, ती माणस कशाही पध्दतीने काम करतात. आयुक्त साहेब तुम्ही नियोजन करा पाणीपुरवठा हे सर्वाना समान दया. मी तांबे साहेबांना दहा वेळा फोन केला एका माणसाच अक्षरशः बिस्लेरी प्लॉन्ट चालू होता त्याला पाणी देतो दोन-दोन इंची कनेक्शन घेवून. अशा चो-या तुम्ही थांबवल्या पाहीजेत. त्यांच्या एवढया मोठमोठया टाक्या रोज भरायच्या तीथे. दोन दोन इंची कनेक्शन आपल्या पालीकेच्या लाईनला चोरुन मारले होते त्यांनी. त्याच्या टाक्या वाहून पुर्ण ते पाणी रोडवर यायच. तरी आपले अधिकारी कारवाई करीत नव्हते. मी दहा वेळेस तांबे साहेबांना फोन केला त्याच्यानंतर साबळे साहेब आले आणि त्याचे कनेक्शन बंद केले. साहेब तुम्ही प्रत्येक प्रभागात फिरा, छोटे छोटे जार मिळतातना तर प्रत्येक जारवाला हा त्याचच पाणी विकतो साहेब. आपल्या प्लंबर पासून हे डेप्युटी पर्यंत सगळयांना माहीत असतं की कोण जारचा धंदा करतय कोण काय करतय. यांना हप्ते जातात साहेब. ही चोरी आपण थांबवली पाहीजे. आज लोक आपल्या पालीकेच्या पाण्यावर करोडो रुपये कमवतात, टँकर लॉबी आहे ते सुध्दा पैसे कमवतात. काही काही ठिकाणी कॉर्पोरेशनचा टँकर विकत मिळतो. कॉर्पोरेशनच पाणी येत कुठून टँकरमध्ये ते मला सांगा. तो माणुस जर कार्पोरेशनच पाणी त्या सोसायटीला विकत टाकत असेलतर ते पाणी कार्पोरेशनच येत कुठून. साहेब, आपण पण लक्ष दिल पाहीजे. आपले एक्झिक्यूटीव तर कधी पालीकाच सोडायला तयार नसतात. त्यांना कोणता ठेकेदार येतो, कधी त्याच्यावर सही होते याच्यातच मग्न असतात. आयुक्त साहेब तुम्ही प्रॉपर लक्ष घाला. पाणीचोरी थांबली पाहीजे. आपल

पाणी जातय कुठ कुठ, आपण कोणाला पाणी मंजूर केलेलं आहे. कोणत्या कंपन्यात आपल पाणी जातय हे सगळ तुम्ही स्वतः पाहील पाहीजे. हे सगळ इथ बसलेल्यांना माहीती आहे. तुमचे प्लंबर, ठेकेदारांची माणस सगळ ते मॅनेज करतात. मोटारी लावल्यावरती त्या मोटारी उचलायच्या म्हणता परंतु आयुक्त साहेब, त्या उचललेल्या मोटारी पण आपले जे.ई. असतात, प्लंबर असतात हे नंतर विकतात. याचा कधी हिशोब घेतला आहे का. बीचारे नागरीक आडीच तीन हजाराला मोटार घेतात हे हजार हजार रुपयाला विकतात. आतापर्यंत किती मोटारी उचलल्या, आज फक्त तुम्ही विचारा किती मोटारी उचलल्या आणि त्या मोटारी यांच्याकडे आता दाखवायला आहेत का ते बघा. एक मोटार तुम्हांला मिळणार नाही. ते म्हणतील आम्ही परत देवून टाकल्या, नगरसेवकांचे फोन आले. कोणत्याच नगरसेवकांचे फोन गेल्यावर हे मोटारी देत नाहीत. कुठला वॉल बदलायचा असेलतर इथला वॉल काढायचा तो रिपेअर करायचा आणि तो दुसऱ्या ठिकाणी टाकायचा पालीकेच्या बीलात लिहायच नवीन वॉल टाकला. खाली कोण नगरसेवक बघायला जातय किंवा तुम्ही बघायला जातात की वॉल खरच नवीन टाकलाय का. बीलतर पालीकेच्या नावावर फाडली जातात. आयुक्त साहेब आपण जे नागरीकांना पाणीपुरवठयाचे बील देतोत त्या बीलांसाठी आपण एजन्सी नेमलेली आहे. ती एजन्सी काम करते का हे बघा फक्त. कुणाला पाणीपुरवठयाचे बील मिळत नाहीत काही मिळत नाही. आम्हांलातर काळेवाडीतून ब प्रभागात जायच. मी मागे खोत साहेबांना म्हणलं पाणीपुरवठयाची बील भरण्यासाठी तुम्ही आम्हांला थेरगावला जागा उपलब्ध करुन दया. आज ज्येष्ठ नागरीक ब प्रभागात बील भरण्यासाठी लाईनला उभे असतात. तरी तुम्ही काळेवाडीला मध्यवर्ती ठिकाणी पाणीबील भरण्यासाठी केल पाहीजे. काही नाही आयुक्त साहेब, इथे आम्ही बोलायच तुम्ही ऐकायच परत जैसे थे. त्याच्यासाठी तुम्ही विचारा की आमच्या काळेवाडीच्या टाकीच काय झालं. आज डिसेंबर २०१६ मध्ये भूमीपुजन झाल होत आज २०१९ डिसेंबर आला आहे. या तीन वर्षात टाकी झाली असती. आपले अधिकारी सांगतात काळेवाडीला टाकी सेप्रेट नाही, तीन वर्षात या टाकीच काम जर पुर्ण झाल असतंतर आज त्यांच्या म्हणण्यानुसार आम्हांला पाणी मिळाल असतं. आयुक्त साहेब, तुम्ही लक्ष घाला परंतु मा.महापौर साहेब, एक दिवसाआड जो पाण्याचा निर्णय घेतलेला आहे तो मला चुकीचा वाटतो. कारण माझ्या प्रभागा मध्ये जवळपास पन्नास सोसायटयाना अजीबात पाणी मिळत नाही,धन्यवाद.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचे महापौर जाधवदादा, उपमहापौर सचिनदादा या सोळा महीन्यात त्यांनी हे सभागृह एकदम चांगले अशा पध्दतीने चालवले सर्वांना बोलण्यास संधी दिली, ही सभा महापौरांच्या मार्गदर्शनाखाली, सोळा सोळा तास, दहा दहा तास अनेक प्रश्नावर चालली. खरोखर दादा तुम्ही आमच्यासारख्या या नवीन सभासदांना सुध्दा बोलत केल आम्हांला काही कळत नव्हतं कस बोलायचं. तुमच्यामुळे आम्हांला सभागृहामध्ये तोडकमोडक बोलण्याला येवू लागल म्हणून मी माझ्या तर्फे महापौरांच अभिनंदन करतो. उपमहापौर सचिनदादांच पण अभिनंदन करतो. पाण्याचा विषय निघाला आहे, पाण्याची परिस्थिती खुप अवघड आहे. ऑगष्ट-२०१८ पासून आपल्या पिंपरी चिंचवड शहराला पाणी नाही. कारण २०११ पासून परतीचा पाऊस पडला नाही हे कारण आपण सांगत राहीलो पण २०१९ ला भरपूर पाऊस पडला. लोकांना वाटत धारणामध्ये पाणी आहे मग पाणी कसं मिळत नाही. आयुक्त साहेब, सांगतात आपल्याला धरणातून ४२० एमएलडी पाणी मिळतय प्लस ५० एमएलडी पाणी मिळतय. मा.आयुक्त साहेब, आम्ही आता आमच्या महापौरांच अभिनंदन केल. मला पण वाटत आडीच वर्षात जे तुम्ही काम केलं तुमच पण अभिनंदन करणारच पण ते कशा पध्दतीने करायला पाहीजे हे तुम्हांला आमच्या सर्व नगरसेवकांच्या पुढ सांगतो. पत्रकार बंधुपशी पण सांगतो. कारण अख्या शहराचा पाणीपुरवठयाचा विषय असतो. तो कसा सोडवायचा हे आम्ही सर्व नगरसेवक तुमच्या समोर मांडतो आणि पाणीपुरवठयाचे जे अधिकारी असतात ते एक्झिक्यूटीव्ह असू द्यात, डेप्युटी असू द्यात किंवा जेई असु द्यात आम्हांला फक्त आतापर्यंत पाणीपुरवठयाची कारण सांगीतली जातात. एवढ एमएलडी पाणी येतं. आज ऑगष्ट २०१८ पासून अशी काय लोकसंख्या वाढलेली आहे. आता आमचे दत्ताभाऊ सानेंनी सांगीतल की एवढी काय लोकसंख्या वाढली. साहेब, आख्या पिंपरी चिंचवडचा विचार केला तो तर बाजूलाच राहीला पण मी स्थानिक नगरसेवक जेव्हा टाक्या वर जातो, आमचा ऐरीया दापोडी, नवी सांगवी, जूनी सांगवी, गुरव पिंपळे हे शेवटचे टोक आहे. आम्हांला २४ एमएलडी पाणी येतं व ते २०१७-१८ ला येत होतं. ऑगष्ट महीन्यापासून हे पाणी गायब झाल. आता पाणी लिकेज आहे तेवढ पण पाणी येत नाही. आमची एक विनंती आहे की जेवढ आम्हांला पहील पाणी येत होत तेवढच पाणी दया. आम्हांला सर्वांना ते पाणी पुरेस होईल. तुम्ही आणि तुमचे सर्व अधिकारी आम्हांला जनतेला वेडयात काढतात. कारण जे रावेत मधुन बायपास पाणी होत ते अनेक ठिकाणी आडवल जाते. मग ते कशाला आडवल जात कशा

पध्दतीने आडवल जात हे कधी साहेब तुमच्या अधिका-यानी, तुम्ही कधी शोधल नाही. तांबे साहेबांची जी केबीन आहे ती पाण्याच्या टाकीच्या खाली पाहीजे. त्या टाकीच्या खाली एक्झिक्यूटीव्ह, डेप्युटीला केबीन दयायला पाहीजे. यांना हेड ऑफिसला ठेवू नका. आयुक्त साहेब तुम्ही आल्यापासून जे नियोजन पाहीजे ते होत नाही, महापौर सर्व नगरसेवकांना बोलायला देतात. तुम्ही आडीच वर्षात या शहरासाठी पाण्याचा प्लॅन करायला पाहीजे होता. पण तो तुम्ही केलेला नाही. २०१६ ला अमृत योजना आणि २४x७ ची योजना तुम्ही आणली. १४३ कोटीच पहील तुम्ही टेंडर काढल ते नागपूरच्या ठेकेदाराला दिलं. नंतर २०१८ ला तुम्ही १०० कोटीच टेंडर काढल, नंतर तुम्ही ५० कोटीच टेंडर काढल परत तुम्ही ५०-५० चे दोन टेंडर काढले. असे ३४२ कोटीच २४x७ च्या योजनेला तुम्ही नियोजन केल. आयुक्त साहेब आज तुम्ही देशामध्ये सातवा नंबरला येणारे अधिकारी आहेत. तुम्ही ३४२ कोटीची जी पहीली योजना होती ही योजना आणायची गरज नव्हती. उलट तुम्ही पाणी कुठून मिळेल, कोणत नवीन धरण कसं मिळेल, त्याच्यातून आपल्याला पाणी कशा पध्दीने आणता येईल हे करायला पाहीजे होतं ती योजना बाजूलाच राहीली आणि तुम्ही ३४२ करोड रुपये हे २४x७ च्या नावा खाली सर्व या योजनेच वाटोळ केलेल आहे. त्यापेक्षा तुम्ही कुठ धरण बांधता येईल, कुठून पाणी उचलता येईल किंवा पवना नदी असेल त्याच्यावर तुम्ही तलाव बांधायला पाहीजे होता. बारीक बारीक तलाव बांधायला पाहीजे होते. फक्त तुम्ही टेंडर काढत बसला आणि २४x७ मुळ लोकं म्हणतात आमच्या पहील्या लाईनला पाणी चांगल येत होतं आताच्या लाईनीला पाणीच येत नाही. टिव्ही पुढे बसल्यानंतर जशी एक न्यूज येते तस तांबे साहेब आम्हांला एक मॅसेज पाठवतात आज पंपींग बंद आहे तो पण मॅसेज कधी येतो पाचला येतो सातला पाणी संपल आणि त्यांचा फोन बंद राहतो. मग आमच्या मागे अख्खे लोक लागतात. तुम्ही कोणत्या मोठया प्लॅनवर ॲक्शन घेतली, कोणत्या मोठया हॉटेलवर ॲक्शन घेतली कोणतीही ॲक्शन तुम्ही आतापर्यंत घेतली नाही. किंवा टॅंकरलॉबीवर ॲक्शन घेतली नाही. फक्त तुम्हांला एक कारण सापडल आहे २०११ ला १६ लाख लोकसंख्या होती आता लोकसंख्या झाली २७ लाख. आयुक्त साहेब तुम्ही मनापासून पाणीपुरवठयाच्या अधिका-यांना बसवा, सगळयांचा अभ्यास घ्या, एक्झिक्यूटीव्ह, आमच्या तेथे कुलकर्णी मॅडम आहेत त्या मॅडमला साध एमएलडी कळत नाही. ईंजिनीअरला काही कळत नाही. तुम्ही आता बोलवा त्यांना दापोडीला किती एमएलडी पाणी विचारा. ते लीटरमध्ये सांगतात

लाखामध्ये सांगत नाहीत. साहेब, त्यांची एक शाळा घ्या. अभ्यास वर्ग घ्या. मला बोलण्यास चान्स दिला त्याबद्दल मी आभारी आहे.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाण्याचा विषय हा सर्व नगरसेवकांच्या वॉर्डातील नागरीकांचा जिव्हाळयाचा हा विषय आहे. महीलांनातर प्रथम पहील पाणी पाहीजे. आतापर्यंत सर्व नगरसेवकांनी सांगीतल आहे की पाऊस एवढा पडलेला आहे धरण भरलेलं आहे परंतु नागरीकांना पाण्याचा प्रश्न भेडसावतो. प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये हा प्रश्न आहे हे सगळयांना माहिती आहे. काही ठिकाणी पाणी आल की एक ते दिड तास पाणी असतं आणि ते पाणी शेवटच्या टोकापर्यंत जाईपर्यंत इकड आपल पाणी बंद होतं. आता पाणी व्यवस्थित झालेल आहे मागच्या वेळेस घाण पाणी यायच परंतु आता सुरवातीला थोडस गढूळ पाणी येत पुन्हा चांगल पाणी येतं. परंतु आलेल सुरवातीला पाणी महीला दुसऱ्या भांडयात टाकतात ते ओतून देत नाहीत. परंतु पिण्याच्या पाण्याचे टाईमापर्यंत पाणी जातं. नागरीकांनी किती दिवस दुसरीकडून पाणी भरायच. पिण्याच पाणी चांगल पाणी जिथ असेल तीथ जावुन भरतात. परंतु किती दिवस हे चालणार. आता तर दिवसाआड पाणी देणार म्हणल्यावर काय करणार नागरीक. प्रत्येक वॉर्डामध्ये व्यवस्थीत पाणी नाही. व्यवस्थित पाणी असेलतर ते बोलणार नाहीत. ज्यांच्या वॉर्डामध्ये पाण्याचा प्रश्न बीकट आहे ते तर ओरडणार आहेत. दिवसाआड पाणी झालतर कशा पध्दतीने पाणीपुरवठा होणार आहे. ज्या भागामध्ये बायपासच पाणी आहे त्या भागात जर आज पाणी दिलेल असेलतर उदया तो पाणीपुरवठा विस्कळीत असतो. काही ठिकाणी मिळत, काही ठिकाणी प्रेशर कमी असतं. मग असं दिवसाआड जर पाणी झालतर लोकांना पाणी मिळणार नाही. पाण्याचा नियोजन कशा पध्दतीने करायच हे आपण मा.महापौर साहेब, ठरवायच आहे. तुमची कारकीर्द चांगली गेलेली आहे अनेक जणांनी कौतूक केलेल आहे. बोलण्याची संधी अनेकांना मिळालेली आहे. या पाण्याच्या प्रश्नासाठी आपण चांगल्या पध्दतीने नियोजन कराव. काल आपली मिटींग झालेली आहे. पाण्याचा प्रश्न बीकट आहे पाण्यासाठी नागरीक आपल्यावरती नाराज आहेत हे सगळयांना माहीती झालेलं आहे. कारण अनेक ठिकाणी लोकांची हीच ओरड आहे की आम्ही पाणीपट्टी भरतो, आम्ही घरपट्टी भरतो मग आम्हांला पाणी का मिळत नाही. आमच्या प्रभागामधली स्थापत्याची काम थांबलेली आहेत. आम्ही रोडची काम केलेली नाहीत, स्थापत्याची काम केलेली नाहीत या अमृत योजनेमुळे. डांबरीकरणाची काम आमची मंजूर झालेली होती परंतु परत खोदाखोदी नको, पालीकेची नुकसान नको म्हणून आम्ही आतापर्यंत

डांबरीकरण केल नव्हतं. काम नाही झालीतर परत आम्हांला काहीतरी नियोजन केल पाहीजे. आता जर या लाईनी लवकर सोडल्या नाहीतर आम्ही डांबरीकरण करुन घेणार आहेत. रस्त्यावर खड्डे झालेले आहेत लोकांची छोटया छोटया रस्त्यामुळे ऍक्सीडेंट होतात. गल्लीबोळात सुध्दा खड्डे झालेले आहेत. आम्ही म्हणतोत की परत खोदायला नको म्हणून आम्ही रस्त्यांची काम थांबवली होती. परंतु आता ही काम चांगल्या गतीने झाली पाहीजेत. आम्ही तरी नागरीकांना किती उडवाउडवीची उत्तर देणार. तरी हे लवकरात लवकर झाले पाहीजे अशी मी विनंती करते. काम झाली नाहीतर आम्ही आमच्या पध्दतीने काम करुन घेणार. मग अधिकारी वर्ग कशा पध्दतीने आम्हांला साथ देणार हे तुम्ही त्यांना सांगू शकता. तरी आमच्या पध्दतीने काम करुन घ्यायला आम्ही विनंती करतोत की ही काम लवकर झाली पाहीजेत. पाण्याचा प्रश्न लवकर सुटला पाहीजे. आणि जर तुम्ही बायपासन जर पाणी देत असालतर त्या भागातील नियोजन व्यवस्थित केल पाहीजे. कारण दिवसाआड पाणी केलतर दुस-या दिवशी आमच्या लोकांना पाणी मिळणार नाही. आपण मला बोलायला संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देते. महापौरांच्या कारकीर्दीला पण धन्यवाद देते.

**मा.संगिता (नानी) ताम्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एक दिवसाआड पाणी दिल्यास, आता एक दिवस पाणी दिलतरी वरच्या कडेच्या लोकांना पाणी दिलंतर खालच्या कडेच्या लोकांना पाणी मिळत नाही. आमच्याकडे गुरुवारी पाणी नसतं शुक्रवारी पाणी येतं ते पाणी शेवटच्या टोकापर्यंत कधीच पोहचत नाही. आमच्याकडे पहाटे तीन वाजल्यापासून पाणी येते आणि पहाटे सकाळी सहा वाजता जातं. मग लोकांनी पाणी कधी भरायच. आता सातला पाणी येतं ते पाणी सातला न येता आठ, नऊला कधी कधी दहा वाजता पाणी येतं आणि ते पाणी अर्धा तास ते एक तास राहतं. चढाच्या ठिकाणी पाणी येत नाही, ज्याठिकाणी उतार आहे त्याच ठिकाणी पाणी येतं. तुम्ही सांगीतलेल आहे की मोटारी उचलण्यासाठी, जर पाण्याला प्रेशर दिल तर लोक मोटारी लावणारच नाहीत. मोटारी लावण्याचा काही संबंधच येणार नाही. पाणी भरपूर मिळालतर लोक मोटारी कशाला लावतील. २४X७ चे काम केली नसतीतरी चाललं असतं. कारण पुर्ण रस्त्याची चाळणी केलेली आहे. पाणीपुरवठया मुळ काही गल्ल्यानी बिलकूल काम केलेली नाहीत. आता आमच्याकड डांबरीकरणाची काम करायची आहेत, ही जर पाणीपुरवठयाची काम अगोदर केली नाहीतर परत आम्ही रस्ते त्यांना खोदू देणार

नाहीत. याची जिम्मेदारी पाणीपुरवठा विभागाने घेतली पाहीजे एवढच बोलते आणि थांबते.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कालची आयुक्तानीं पत्रकार परिषद घेतली एक दिवसाआड पाण्याची ही खरच धक्कादायक बातमी होती. आज तारखेला शंभर टक्के धरण भरलेल आहे. जेव्हा ही बातमी नागरीकांपर्यंत पोहचली तेव्हा लोकप्रतिनिधी म्हणून आम्हांला सामोर जात असतांना लोकांच्या ज्या कल्पना आहेत, विचार आहेत ते जर तुम्ही ऐकलेतर आमच वॉर्डात राहणं मुश्किल होईल. शहरामध्ये पुर्वी दिवसातून दोनदा पाणीपुरवठा व्हायचा, सकाळी आणि संध्याकाळी. कालांतराने तो पाणीपुरवठा एक वेळ केला. एकवेळ केल्यानंतर जी वेळ होती ती सुध्दा बदलली. जो पाणीपुरवठा सकाळी व्हायचा तो काही भागात संध्याकाळी करण्यात आला. त्याच्यानंतर आताची परिस्थिती आपण पाहता आठवडयातून एकदा पाणीपुरवठा बंद करुन बाकी इतर वेळा पाणी सोडतात. आमच्या परिसरामध्ये जुन्या पाईपलाईन आम्ही बदलून घेतल्या, मोठया व्यासाच्या पाईपलाईन टाकल्या. टाक्यांची उभारणी केली. अशा परिस्थितीमध्ये जर व्यवस्थीत प्रेशरने आणि आवश्यक पाणी मिळत नसेलतर मग ते केलेलं सगळ काम शुन्य आहे. ते काम करुन आज हीच वेळ येणार असेलतर मग ते केलच नसतंतर बर झाल असतं अस वाटायला लागल. आम्हांला लोकांच्या समोर जाव लागत तेव्हा पाणी हा सगळयात महत्वाचा विषय आहे. शहरातील नागरीकांना मुलभूत गरजा दयायच्या असतीलतर त्यातल पाणी हि गरज सगळयात जास्त महत्वाची आहे. अशा रितीने तुम्ही समान वाटपासाठी कपात केलीतर खरतर त्यासाठी नियोजन करत असताना टाक्या सुध्दा ओव्हर फ्लो होवून वाहणार आहेत. कालच्याच पेपरला बातमी होती विठ्ठलनगरची टाकी पुर्ण वाहून चालली होती. स्टोअरेज करण्यासाठी एका कुटूंबात किती असणार आहे. तुम्ही म्हणताय दोन दिवसाच पाणी तुम्हांला एकदाच देणार आहे. पण ती कपॅसिटी त्या सोसायटीची असेल, त्या घराची असेलतर दोन दिवस कस साठवणार ते. आणि याच्यामुळ पाणी वेस्ट होणार आहे. तुम्ही पत्रकार परिषद घेतली तेव्हा तुम्ही पाणी चोरी, गळती किंवा बंद जलवाहीनी या गोष्टीवर काय काम केल आहे या पण गोष्टी दाखवायला पाहीजे होत्या. जेव्हा हा निर्णय घेतला जातो तेव्हा आपण पण काय कारणासाठी घेत असताना जेथे चाळीस टक्के चारी होते, गळती होते ती पण कमी केली पाहीजे. आज आमच्या परिसरामध्ये कॉंक्रीट रस्त्याच काम ऐन सणासुदीच्या काळात केलं. त्यामध्ये पाण्याच्या इतक्या पाईपलाईन फुटल्या त्याचा तो ठेकेदारही विचीत्र असल्यामुळे

वेळोवेळी तेथील पाणी खुप मोठया प्रमाणात वाया गेलं. मग अशा ज्या समस्या रस्त्याच्या कामामध्ये येतात त्याच शोधन आपण काय करतो त्याचाही तीतकाच विचार केला पाहीजे. तरी मी आयुक्तांना, महापौरांना विनंती करेल की तुम्ही ही कपात रद्द करा व जे नियोजन आहे त्याच्यामध्ये तुम्ही काहीतरी सुधारणा करा, काहीतरी प्लॅन करा जेणेकरुन या शहरातील नागरीकांना पाण्यासाठी त्रास होणार नाही. तसेच पाण्याची जी वेळ केली जाते तुम्ही जसं समान पाणी वाटप म्हणता तशी समान वेळ पण ठेवानां. गेल्या दहा वर्षे आम्ही संध्याकाळचच पाणी घेतो. अल्टरनेट दयानां तुम्ही. आज त्या परिसरामध्ये सुध्दा कामगार वर्ग आहे. त्यांना कामा निमीत्त बाहेर जाव लागतं, पाण्यामुळे सगळयांची अडचण होते. समान वाटपा बरोबर समान वेळ याच प्लॅनिंग केल पाहीजे. महापौर पदांची कारकीर्द कौतूकास्पद गेली आहे तरी माझी विनंती राहील की तुमची ही शेवटची सभा आहे, तुम्ही या सभेत आयुक्तांना आदेश दया की ही कपात रद्द करावी. शहरातील नागरीकांना पाणी कसं चांगल देता येईल याबद्दल त्यांना सुचना दयावी.

**मा.अश्विनी वाघमारे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेबांनी आता जो पाणीपुरवठयाचा निर्णय घेतला आहे तो चुकीचा आहे. आज माझ्या प्र.क्र. २५ मध्ये जवळपास आडीचशे ते तीनशे सोसायटया आहेत आणि प्रत्येकाला खुप कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्यामुळे त्यांना यासाठी सामोरे जावे लागते. तरी तुम्ही घेतलेला निर्णय चुकीचा असल्यामुळे तो तुम्ही निर्णय मागे घ्यावा असे सांगते. वाकडमध्ये आता सध्या पाणीपुरवठा विस्कळीत आहे. तेथे कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने माझ्या प्र.क्र. २५ मधील वाकड, ताथवडे आणि पुनावळे या ग्रामस्थानच्या वतीने मी अशी विनंती करते की आपण हा पाणीपुरवठयाचा निर्णय मागे घ्यावा आणि प्रशासनाचा मी जाहीर निषेध करते, धन्यवाद.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब, दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा आपण जो निर्णय घेतला आहे त्यामध्ये कदाचित आपला उद्देश चांगला असेल की या शहराला समसमान पाणीपुरवठा व्हावा. पुरेशा दाबाने पाणीपुरवठा व्हावा आणि पुरेशा वेळ पाणीपुरवठा व्हावा. परंतु याच्यामध्ये काही तांत्रीक अडचणी आहेत ज्या मोठमोठया सोसायटया आहेत, काही सोसायटयांमध्ये स्टोअरेज कपॅसिटी कमी आहे. त्यांना आपण नवीन टाक्या बांधायचा आदेश दिला. परंतु आदिच टॅंकरच्या खर्चामुळे या सगळया सोसायटयांच आर्थीक नियोजन सगळ बिघडलेलं आहे आणि आपण परत त्यांना भुर्दंड देतो.

कारण हे सोसायटीधारक वेळेत आणि प्रमाणिक कर भरतात आणि आपण त्यांनाच टार्गेट करतो, त्यांनाच गृहीत धरतो. त्यामुळे आपण या निर्णयाचा फेरविचार करावा. त्यापेक्षा पवना जलवाहीनी असेल, भामा-आसखेड असेल या प्रकल्पांवर आपण जास्त लक्ष केंद्रीत करुन या निर्णयाचा आपण फेरविचार करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. बारा महीन्यापैकी चार चार महीन्यांचे ऋतूमान असतात. त्यामध्ये पावसाळा, उन्हाळा आणि हिवाळा असतो तर सहा महीने आपल्याकड पावसाळा झालेला आहे. आपले धरण शंभर टक्केवरुन अधिक भरलेले आहेत. त्या अनुषंगाने महापालिकेच्या माध्यमातून जे नियोजन झालेल आहे ते अतीशय ढिल्ल नियोजन झालेल आहे. आपण भामा-आसखेड, आंद्र धरणातून जे पाणी उचलण्याच काम करणार आहोत त्याच्याबाबत जो विलंब होत आहे त्याच्यामध्ये ख-या अर्थाने आयुक्तांनी लक्ष घालून आपल्याला लवकरात लवकर या शहराला पाणी कसं सुरळीत देता येईल याच नियोजन होणं गरजेच आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की जी अमृत योजना आलेली आहे, अमृत योजनेला ख-या अर्थाने महापालिकेच्या माध्यमातून पांढरा हात्ती पोसण्याच काम करत आलेलो आहोत. कारण माझ्या प्रभाग क्र. ७ भोसरी येथे किती ठेकेदार असावेत, अमृत योजनेच्या माध्यमातून चार चार ठेकेदार दिलेले आहेत की जेणेकरुन कुठल्याही ठिकाणी त्यांचा धागादोरा लागायला नाही पाहीजे. यानी काम केल, त्यांनी काम केल, म्हणजे हात वर करायला मोकळे. आपले ३२ प्रभाग आहेत त्या प्रभागाच्या माध्यमातून एकाच एजन्सीला काम दिले पाहीजे. त्या एजन्सीन ते काम नियोजनबध्द केल पाहीजे. अमृत योजनेच काम २४X७ च आपण म्हणतो ते तर खुपच लांब राहील मी तर म्हणतो पुढच्या वर्षात होईल का नाही त्याची गॅरंटीच नाही. कारण की आज एवढ मुबलक पाऊस होवून ही आज आपण एक दिवसाआड पाणी दयायच म्हणतो. तरी हे नियोजन आता या स्थितीलातरी अयोग्य आहे. हाप्त्यामध्ये एक दिवस पाणी बंद ठरवल होत ते रास्त आहे. लोकांना त्यामुळे व्यवस्थितपणे पाणी पोहचत होतं. ज्या ज्या ठिकाणी पाणी कमी होतं त्याठिकाणी अधिका-यांना नियोजनबध्द पाणी देता येत होतं. पण आजच्या स्थितीला हिवाळा आहे आणि महीलाना पाणी साठवण्याची आवड असते. की बाबा आता एक दिवस पाणी येणार नाही मग साठवून ठेवायच. गेल्या हाप्त्यामध्ये आमच्याकडे दोन तीन घटना घडलेल्या आहेत. त्यामध्ये दोन तीन लोकांना मृत्यूला सामोर जाव लागलेलं आहे. स्वच्छ साठवलेल्या पाण्यामुळे डेंग्यू

होतो. त्याच्यामुळे जो साठवण्याचा प्रकार आपण चालवला आहे तो थांबवला पाहीजे. त्याच्यामुळ रेग्युलर सुरळीत पाणी योग्य राहील. अमृत योजनेसाठी जे काही ठेकेदार आहे त्या ठेकेदाराला एकच प्रभागामध्ये एकच ठेकेदार राहीला पाहीजे. माझ्या प्रभागामध्ये चारजण आहेत, प्रत्येकाला तीस टक्के, चाळीस टक्के, वीस टक्के, दहा टक्के अशा पध्दतीने काम दिलेले आहेत. त्या ठेकेदारांच कुठल्याच प्रकारच काम नियोजनात नाही. अतीशय निकृष्ठ दर्जाच काम ते त्याठिकाणी करत आलेले आहेत. पहीले बीटचे पाईप असायचे त्या बीटच्या पाईपला टॅपिंग केल जायच आणि त्यातून आपल्याला अर्धा ईंची, एक ईंची ज्या पध्दतीने कनेक्शन्स आहेत ते दिले जायचे. आता त्याठिकाणी पाण्याची चोरी होणारच. कारण की नागरीकांना पाणी कसंही मिळू दयात, पाणी चोरुन मिळू दयात किंवा कसही मिळू दयात. तरी जे टॅपींग होणार आहे ते न होता ते कशाही पध्दतीने होल करतील. त्यामुळे दुषीत पाणी येण्याचे चान्सेस जास्त आहेत. मा.महापौर साहेब, आपल्या शहरामध्ये वाढती लोकसंख्या पाहता ओनरशिपच मोठया जोमाने काम चाललेल आहे. त्या सोसायटयामध्ये त्यांच्या टाकीची क्षमता ही पाच ते सहा हजार ली. ची असते ते पाणी आपण कुठल्या पध्दतीने साठवणार. कारण त्यांची क्षमता पाच ते सहा हजार लीटरची असणार ते दिवसालाच संपणार आणि दुस-या दिवसाच पाणी अपण कस देणार. महापालिकेला दोनशे तीनशे टँकर घ्यावे लागतील का बाहेरचे त्यात धरणार याच नियोजन तुम्ही सांगा. प्रत्येक सोसायटीला पाणी साठवण्याची टाकीची क्षमता असते ती जर एक दिवसात वापरुन संपणार असेलतर दुस-या दिवसाच नियोजन कस करणार आहे. किंवा तुम्ही दोन टाईम पाण्याच नियोजन करणार का. सकाळी एकदा सोडणार, संध्याकाळी पुन्हा सोडणार. तुमच नियोजन आम्ही मान्य करु पण त्या सोसायटयांच नियोजन कस राहणार आहे. याबाबतीत आपण काय उपाययोजना केलेली आहे. मा.महापौर साहेब, पाण्याच्या बाबतीत शहराला वेठीस धरता कामा नये, प्रशासनान याठिकाणी चांगल काम करायला पाहीजे. पाणी आणि लाईट ही राष्ट्रीय संपत्ती आहे. त्याच नियोजन सगळयांना आहे आणि आपण सर्व सन्मा.नगरसेवक त्याठिकाणी लक्ष देतात पण आपण या सोसायटयाच्या बाबतीत किंवा पुढच्या आजाराला आळा बसवण्यासाठी आपण उपाययोजना शोधायच सोडून त्याठिकाणी पाणी साठवण्याच काम करतो. स्वच्छ पाण्यामध्ये डेंगी, मच्छरच्या आळया तयार होतात. त्याठिकाणी कोणी नागरीक दक्षता घेत नाहीत. बाहेरुन आलेली व्यक्ती त्याठिकाणी ड्रमवर झाकण ठेवते नाही ठेवत. याठिकाणी सर्वसामान्य कामगार वर्ग आहे याच्या बाबत आपण दक्षता घेणे

गरजेच आहे. मा.महापौरांनी आपल्या कारकीर्दीमध्ये चांगल कामकाज केलं आणि जाता जाता अजूनही चांगल काम करुन जावे, आपण जनहितासाठी, पिंपरी चिंचवड शहरासाठी, नागरीकांसाठी आपण चांगल नियोजन कराव, पाणी हाप्त्याला एक दिवस बंद आहे त्याप्रमाणेच राहू दयाव एवढ याठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौर साहेब, आयुक्त साहेब आपण काल दिवसाआड पाण्याचा निर्णय घेतला. मुळात प्रशासनाकडन कामामध्ये दिरंगाई झाल्यामुळ आज ही परिस्थिती आपल्यावर उदभवलेली आहे. पुणे महापालिका आणि आपल्याला माझ्या माहीती प्रमाणे एकाच वेळी मंजूरी मिळालेली होती. पुणे महापालिकेच भामा-आसखेड, आंद्र धरणातून पाणी उचलण्याच काम आतापर्यंत पुर्णत्वाला आलेलं आहे. आता जी आपण निवीदा काढली ती एकप्रकारच अपयश आपल्या प्रशासनाला आलेलं आहे आणि म्हणून ही परिस्थिती आज आपल्यापुढे आहे. लोकसंख्या वाढते या सगळया गोष्टीच आपल्या सगळयांनाच भान आहे परंतु येथून पुढच्या काळामध्ये आणखीन मोठया प्रमाणात लोकसंख्या वाढणार आहे. अशाच पध्दतीने चालू राहीलतर मला वाटतय अजून काही वर्षात आपल्याला खुप मोठया प्रमाणात पाण्याचा प्रॉब्लेम फेस करावा लागणार आहे. तुम्ही काल गटनेत्यांची बैठक घेतली आणि त्याच्यामध्ये दिवसाआड पाणीपुरवठयाचा निर्णय घेतला. आम्हांलाही लक्षात येत की आज पाणी मुळातच कमी आहे. धरणात पाणी आहे परंतु आपली जी मंजूरी आहे त्या मंजूरीपेक्षाही जास्त आपण पाणी उचलतो. मुळात आपली जी गळती आहे ती गळती थांबविण्याच्या दृष्टीकोनातून अजून कठोर पावल उचलण्याची आपल्याला गरज आहे. आम्ही वारंवार आपल्याला सांगीतल की अनेक ठिकाणी मुख्य जलवाहीन्यांना थेट पध्दतीने कनेक्शन घेतलेले आहेत. त्याच्यामुळे काही भागात खुप जास्त प्रमाणात पाणी दिल जातं आणि काही भागामध्ये खुप मोठया प्रमाणात पाण्याचा प्रॉब्लेम त्याठिकाणी लोकांना फेस करावा लागतो. तरी आयुक्त साहेब त्या गळतीच्या संदर्भात तुम्ही आणि तुमच्या पाणीपुरवठा विभागाकडून सभागृहाला खुलासा झाला पाहीजे की जी चाळीस टक्केची गळती आपण सांगतो त्याच्यातली किती गळती आपण आपल्याकडून थांबवलेली आहे. आपल नेमक टार्गेट काय आहे, येथून पुढे ती गळती आपण नेमकी किती दिवसात थांबवणार आहोत आणि किती टक्के गळती थांबेल. याच्यावरती आपल्या वॉटर सप्लाय डिपार्टमेंटन काय काम केल याची माहिती सुध्दा सभागृहाला झाली पाहीजे. गटनेत्यांच्याच बैठकीमध्ये आपण निर्णय

घेतला, मुळात हा प्रत्येक नागरीकांच्या अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. सगळयाना विश्वासात घेवून हा विषय सभागृहामध्ये व्हायला पाहीजे होता. आमच्या गटनेत्यांनी कालच्या बैठकीमध्ये विरोध नोंदवला आहे. आमच्या पक्षाची जी भूमीका आहे ती त्यांनी त्याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब तुम्ही त्या गळती संदर्भात सभागृहाला खुलासा झाला पाहीजे, नेमकी किती गळती आतापर्यंत थांबवण्यात यशस्वी झालेलो आहोत. मागे आम्ही भेटलेलो होतो त्यावेळेस त्या चर्चेतून तुम्ही सांगीतल होतं की जर आपल्याला पवना धरणातून काही पाणी वाढवून मिळालतर आपल्याला इमीजेटली सोल्यूशन मिळू शकतं. त्याद्दष्टीकोनातून आपण काही प्रयत्न केले आहेत का. राज्यशासनाकडे काही तसा पाठपुरावा आपल्याकडन झालेला आहे. मला वाटत तेच सोईच आहे तुम्ही सांगीतल त्याप्रमाणे केलतर निश्चितपणे आता जी पाण्याची टंचाई आहे ती दुर होवू शकते. त्याद्दष्टिकोनातून काय प्रयत्न झाले हे सुध्दा सभागृहात कळलं पाहीजे. आता तुम्ही नवीन निवीदा काढली त्याची वर्क ऑर्डर दिली काय दिली ती माहिती सभागृहाला कळली पाहीजे. तुम्ही ज्या इंद्रायणीच्या बेसीसवरती पाणी देण्याचा आता निर्णय घेतला, शॉर्टटर्म मध्ये आपल्याला जर पाणी मिळालतर त्याठिकाणच पाणी उचलणार अशा प्रकारची भूमीका प्रशासनाने घेतलेली आहे त्याचीही माहिती सभागृहाला झाली पाहीजे. आम्हांला नागरीकांपुढे जातांना सांगाव लागणार आहे की, नेमक हे किती दिवस एक दिवसा आड पाणी राहणार आहे. कारण अजून मे महीना यायचा आहे, भरपूर पाऊस झालेला असताना, धरणात पाणी असताना सुध्दा आपल्याकड पाणी देवू शकत नाहीत. तुम्ही सुध्दा नागरीकांना तशा प्रकारची उत्तर देत असतात परंतु आपल्याला नागरीकांना सांगाव लागणार आहे की नेमक कधी पासून रोज पाणी आपल्याला देता येणार आहे आणि त्याचा खुलासा याठिकाणी प्रशासनाकडन झाला पाहीजे मगाशी संतोष आण्णा बोलतांना त्यांनी अमृत योजनेचा उल्लेख केला. आयुक्त साहेब, २४X७ जे काम चालू आहे शहरामध्ये त्या कामाचा इतका बो-या वाजलेला आहे की ठिकठिकाणी काम करताना चार चार, पाच पाच, दहा दहा गल्ल्या खोदून ठेवायच्या आणि प्रत्येक्षात ते काम अर्धवट ठेवायच त्याच्यामुळ नागरीकांना खुप मोठया प्रमाणात त्रास होतो. म्हणजे एका बाजूला आपण लोकांना म्हणतो की अम्ही चोवीस तास पाणी देवू आणि दुस-या बाजूला आपण दिवसाआड पाण्याची भूमीका घेतली. त्याच्यामुळे निश्चितपणे फार मोठया प्रमाणात विसंगती आहे. ही सुध्दा गोष्ट नागरीकांपर्यंत पोहचण्याची गरज आहे आणि त्याद्दष्टिकोनातून प्रशासनाकडन या संदर्भातला खुलासा अपेक्षीत आहे.

आतापर्यंत जी दिरंगाई झाली ती येथून पुढे होवू नये त्याच दृष्टिकोनातून आपण लक्ष घालावा. भामा-आसखेडच पाणी आपल्याला लवकरात लवकर मिळवता आलतर निश्चितपणे आपल्या पाण्याचा प्रश्न सुटू शंकतो. पवना जलवाहीनीच काम बंद पडल खर म्हणजे ते जर झाल असतंतर आपल्याला अडचणीला सामोरे जाव लागल नसत. परंतु त्या कामाच्या संदर्भात सुध्दा नेमक आता त्याची काय स्टेज आहे, त्याच काय स्टेटस आहे याची सुध्दा माहिती सभागृहाने सगळया त्यांच्या नगरसेवकांना आणि पत्रकारांच्या माध्यमातून प्रत्येक नागरीकाला या संदर्भातील माहिती गेली पाहीजे अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि या सगळया गोष्टींचा आपण खुलासा करावा अशाप्रकारची मागणी करुन थांबतो.

**मा.ॲड.सचिन भोसले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली होणारी ही शेवटची सभा आहे. सर्वप्रथम मी महापौरांच याठिकाणी मनापासून अभिनंदन करतो. त्यांच्या कारकिर्दीमध्ये अतीशय चांगल काम आपण केलं. अनेक योजना असतील, अनेक दौरे असतील त्यामधुन निश्चितपणे शहरातील सर्व कार्यकर्त्यांना एक वेगळा आदर्श आपल्या कामातून मिळालेला आहे. त्यामुळे मी आपले आणि उपमहापौरांच दोघांचेही याठिकाणी मनपूर्वक अभिनंदन करतो आणि आपल्याला भावी कार्यासाठी शुभेच्छा देतो. खरतर पाण्यावर चर्चा चालू आहे आणि काल दुपारी झालेल्या बैठकीनंतर ज्यावेळेस सर्व न्युजपोर्टलवरती न्यूज आल्या की सोमवार पासून दिवसाआड पाणी देण्यात येणार आहे. सर्वप्रथम मी शिवसेनेच्या वतीने हा जो काही निर्णय झाला आहे त्याची अंमलबजावणी होण्याच्या अगोदरच मी त्या निर्णयाचा याठिकाणी जाहीर निषेध व्यक्त करतो. मा.आयुक्त साहेब मी तुम्हांला या जनतेच्या वतीने या सभागृहाच्या माध्यमातून अगदी स्पष्टपणे सांगतो की आपली जी काम करण्याची पध्दत आहे तुम्ही प्रशासकीय यंत्रणा राबविण्यात अकार्यक्षम आहात हेच तुमच्या या कालच्या बैठकीतून समोर येतं. मा.महापौर साहेब, हा चांगला योगायोग आहे की आपला हा शेवटचा दिवस आहे आणि आपल्या धरणाच जलपुजन आपल्या हस्ते झाल होतं. आपण त्या धरणामध्ये जलपुजन केलं होत आणि ते जल संपुर्ण शहराच्या नागरीकांना मिळाव म्हणून कदाचित आजची ही सभा हा योगायोगा म्हणाव लागेल. आयुक्त साहेब, जे काही आपल्याला सांगतात की आपण ४९० एमएलडी, ५२० एमएलडी जे काही पाणी उचलतो आणि त्यामध्ये त्यांच म्हणण असं आहे की ४० टक्के पाणी हे पाणी गळती आणि पाणीचोरी होते. तुम्ही ज्या बेसीसवर सांगताय की ४० टक्के पाणी चोरी आणि पाणी लिकेजस होत तर तुम्ही हे कुठल्या बेसवर

सांगता की शहरामध्ये आपला ४० टक्के पाण्याचा लॉस होतो. माझ्या अनेक सहकारी मित्रांनी त्याच्यावरती बोललेले आहेत की आयुक्त साहेबांनी याच्यावरती कुठल्या कुठल्या ऍक्शन घेतल्या आहेत. आजपर्यंत जे काही पाणी चोरी किंवा लिकेज होतय हे प्रिव्हेन्ट करण्यासाठी, मा.आयुक्त साहेब आपल्या मार्गदर्शनानुसार जेव्हा पासून आपण या महापालिकेत आलात तेव्हा पासून आजतागायत तुम्ही अशी कुठली योजना राबवली किंवा कुठले डायरेक्शन तुमच्या अधिका-यांना दिलेत, की त्याच्यावरती त्यांनी काम केल आणि ही जी काही गळती आहे ती त्यांनी कंट्रोलमध्ये आणली. थोडस तरी आम्हांला स्पष्टीकरण दया की तुम्ही या या स्टेप्स घेतल्या होत्या आणि तरी देखील ते तुमच्या कंट्रोलच्या बाहेर आहेत. मला वाटतय की जनतेला सांगायला कारण आहे की लोकसंख्या वाढली. लोकसंख्या वाढली अस तुम्ही जर म्हणत असालतर लोकसंख्या जीतक्या प्रमाणात वाढली तीतक्याच प्रमाणात आपण धरणातून पाणी जे काही उचलतो त्या पाण्याची क्षमता वाढवण्यासाठी तुम्ही काही हालचाली केल्या आहेत का. तुम्ही सरकारला वरती कळवलं आहे का की आम्ही जे पाणी उचलतो ते कमी पडतय, कारण आज जी काही लोकसंख्या वाढली ती कुठल्या बेसीसवरती तुम्ही म्हणताय आणि त्या अनुषंगाने तुम्ही आजपर्यंत काय पाठपुरावा केला आहे. आयुक्त साहेब मी माझ्या प्रभागापुरत आता बोलेल की माझ्या प्रभागामधल्या मी अनेक पाणीटंचाईच्या आणि दुषीत पाण्याच्या तक्रारी केल्या. एक दिवस तुम्ही सांगा की तुम्ही अधिकारी समवेत कुठला दौरा असा आयोजीत केला आहे आमच्या प्रभागातला. संपुर्ण शहरामध्ये आयुक्तानी जावुन जो काही नागरीकांना पाण्याचा प्रॉब्लेम होतो त्या प्रॉब्लेम मधुन बाहेर येण्यासाठी आपण कुठल्या स्टेप्स घेतल्या पाहीजेत. मला नाही वाटत आजपर्यंत आयुक्त साहेबांनी तशा कुठल्या उपाययोजना केल्या आहेत नाहीतर आजचा दिवस आपल्याला हा पहावा लागला नसता. सगळया लोकांना समजल आहे की धरण शंभर टक्के भरलेल आहे. लोकांना हेच वाटणार की धरण जर शंभर टक्के भरलेल असेंलतर मग पाणी का येत नाही. आम्हांला लोकांच्या समोर जायच आहे, लोकांच्या प्रश्नांना उत्तर दयायची आहेत त्यावेळेस आमची अडचण होते. सर्व सहकारी मित्रांची देखील हीच अडचण आहे की आपण सांगणार काय, लोक तर म्हणतात धरण पुर्ण भरलेली आहेत. पण त्यावेळेस जो काही प्रॉब्लेम येतो तो नागरीकांना सांगण्याचा आम्ही प्रयत्न करतो. तो प्रॉब्लेम सॉल्व्ह करण्याचे काही बरेचसे मार्ग सन्मा.आयुक्तांच्या अखत्यारीत आहेत, त्यांच्या हातामधले आहेत. हा जो त्यांचा काही कालावधी आहे त्यामध्ये आयुक्तांनी कधीही कुठल्याही स्टेप्स

घेतलेल्या नाहीत. कधीही त्यांच्या अधिका-याना त्यांनी प्रॉपरली गाईड केलेल नाही की याच्यावर कंट्रोल करण्यासाठी हे हे कराव लागेल. असं कुठही आजपर्यंत त्यांनी केलेल नाही. त्यामुळे शंभर टक्के अकार्यक्षम आयुक्त असं म्हणाव लागतय. कारण की काम करण्याची जी पध्दत आहे किंवा काम करुन घेण्याची जी पध्दत आहे ती आपल्याकड नाही. मा.आयुक्त साहेब मी आमच्या प्रभागातील तीन तारखेच्या मिटींगला दुषित पाण्याची तक्रार केली होती. तक्रार केल्यानंतर मला सांगीतल की अमृत योजनेच काम चालू आहे आणि अमृत योजनेच काम हे आज चालू नाही, मला वाटत की ते एक दिड वर्षापासून चालू आहे असे सांगतात. ज्यावेळेस अमृत योजनेच काम पुर्ण होईल त्यावेळेस दुषित पाणी येणार नाही, पाणी प्रेशरने येईल ही फक्त मोघमची उत्तर आहेत, याच्यामध्ये कुठलही तथ्य नाही. ज्यावेळेस आम्ही बोलतो त्यावेळेस ते सांगतात की अमृत योजनेच काम चालू आहे. अमृत योजनेच काम अतीशय हाळू चालू आहे त्यामध्ये कुठलाही स्पिड नाही. पाण्याच्या टाकीच काम एक वर्षापासून चालू आहे फक्त टाकी पाडून ठेवली आहे. तेव्हापासून आजतागायत त्याच्यावरती कुठलही प्रॉपरली काम होत नाही. त्याच्याकड सुध्दा दुर्लक्ष होतं. मी ग प्रभागाच्या मिटींगमध्ये सुध्दा दुषीत पाण्यावरती बोललो त्यावेळेस सांगीतल आहे. तीन तारखेला प्रभागाची मिटींग झाली त्यावेळेस तांबे साहेब तीथ हजर होते. त्यावेळेस त्यांनी सांगीतल होत की आम्ही पंधरा दिवसामध्ये हा प्रॉब्लेम सॉल्व्ह करतो. मी म्हणालो पंचवीस दिवसात करा, त्यादिवशीही मी सांगीतल होतं आणि आजही सांगतो की पंधरा दिवसाच्या ऐवजी पंचवीस दिवस घ्या पण पंचवीस दिवसानंतरही दुषीत पाणी माझ्या प्रभागातील नागरीकांना प्याव लागलतर तेच पाणी या पालिकेत आणुन मी आयुक्त साहेबांना आणि तांबेना पाजल्या शिवाय राहणार नाही. या शहरामध्य नागरीक फक्त आजारी पडतात ते पाण्यामुळे पडतात. पाणीपुरवठा दुषीत म्हणजे तुम्ही या नागरीकांच्या जिवीताशी खेळ खेळताय आणि आज जे जबाबदार आहेत ते दोघेही सभागृहात नाहीत. आयुक्त साहेब आपले जे अधिकारी आहेत ते लोकांविषयची जी मागणी आहे ती कॅज्युएली घेतात. आपण त्या अधिका-यांना सुध्दा ताकीद दिली पाहीजे की आज पुर्ण शहरामध्ये डेग्युंचे प्रचंड रुग्ण आहेत. कारण कायतर दुषीत पणी दुषीत पाणी असं सांगीतल जातय. याच्यावरती जातीन लक्ष देण्याची गरज आहे. याठिकाणी मी शिवसेनेच्या वतीने जो काल तुमचा निर्णय झाला त्या निर्णयाला जाहीर विरोध करतो आणि भविष्यात जर तुम्ही या निर्णयाची अंमलबजावणी केलीतर आम्ही आंदोलन केल्या शिवाय राहणार नाहीत. या पालीकेवरती शंभर

टक्के आम्ही आंदोलन करणार कारण की पाणी देण्याची जबाबदारी ही महापालिकेची आहे. तुम्ही जर त्यांना पाणी वेळेत, व्यवस्थित, मुबलक देणार नसालतर आम्ही जनतेला अवाहन करतोत की कुणी देखील पाणीपट्टी भरायची नाही. हे सांगायच कारण असं आहे की तुम्ही जितका खर्च पाणी नियोजनावरती करतानां मला असं वाटतय तेवढे पैसे जर गोळा होत नसतीलतर तुम्ही मोफत पाणी दिल या शहराला तरी चालेल, सर्व नागरीक खुष होतील. त्यामुळ तुम्ही यावरती जातीन लक्ष घालाव. मला बोलण्याची संधी दिली मा.महापौर साहेब, आपले मनपुर्वक आभार.

**मा.नितीन (आप्पा) काळजे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता पाणीप्रश्नावरती जो विषय चालू आहे त्याबाबतीत बोलायच म्हणलतर सगळयात जास्त प्रमाणामध्ये आमचे काही प्रभाग नवीन गावामध्ये आहेत ते शेवटच्या भागामध्ये असल्यामुळे सगळयात जास्त परिणाम आम्हांला भोगावे लागतात. परंतु हे करत असताना हा विचार पण केला गेला पाहीजे की ही वेळ आली का. तस पाहीलतर या गोष्टीना अधिकारी जबाबदार आहेतच आहेत पण ज्यावेळेस काही भागामध्ये पाणी आल नाहीतर तेथील नागरीक विचारतात की आम्हांला पाठीमाग पाणी आल नाही. काही लोक काय विचारतात की आहो ज्यावेळेस पाणी येत त्यावेळेस आम्ही मोटार बसवलेली आहे अस आम्हांलाच सांगतात की लाईट गेलेली आहे लाईट लावा म्हणून. पन्नास टक्के आपल्या शहरामध्ये निश्चितच अनधिकृत नळ कनेक्शन्स असतील. व्यावसायाला पाणी वापरणारे लोक असतील याचा आपल्या सर्व नागरीकावर परिणाम होतो. आपण सुध्दा या गोष्टीला जबाबदार आहोत. कारण की ज्यावेळेस नागरीक आपल्याला फोन करतात आमची लाईट नाही मोटार चालू करा, त्यांना पण आपण सांगीतल पाहीजे की तुम्ही मोटार लावू नका. आज एवढे जर नागरीक आपल्या अंगावर आलेतर आपण पण त्यांना सांभाळू शकणार नाहीत. अधिकारी पण आणि नगरसेवक पण सांभाळू शकणार नाहीत. हा पण विचार केला गेला पाहीजे, आता आपण म्हणतो की पाणी मिळत नाही, पाणी का मिळत नाही एक दिवसाची आपली पाणी टंचाई आहे का मगाशी काही वक्त्यांनी सांगीतल या काळात पाणी टंचाई होती त्या काळात पाणी टंचाई नव्हती. आम्ही सुध्दा २०१२ पासून या महापालिकेमध्ये नगरसेवक आहोत. तेव्हापासून आमच्या गावात पाणी टंचाई होती. तुम्ही पाठीमागच्या महापौरांच्या काळातील सुध्दा प्रोसिडींग काढा. आपण असंच भांडत बसणार का यांच्या काळामध्ये पाणी नाही आल त्यांच्या काळामध्ये पाणी नाही

आलं. परंतु यावर आपण एक उपाययोजना केली पाहीजे. २०१६ मध्ये आपण ४८० एमएलडी पाणी उचलत होतो आणि आज पाहीलतर २०१९ मध्ये आपल्या शहराची लोकसंख्या पाच लाखानी वाढलेली आहे. तुम्ही नुसतच अधिका-यांना धोपाटे घालून पण जमणार नाही. आपण सत्य परिस्थिती पण पाहीली गेली पाहीजे की आपल्याला निश्चित प्रॉब्लेम काय आहे. मला वाटत पाच लाख लोकसंख्या ज्यावेळेस वाढते त्यावेळेस ४८० एमएलडीच पाणी निश्चित आपल्याला पुरणार नाही. बंद पाईपलाईनमधुन पाणी आपल्याला उचलायच होतं तो पण प्रश्न आपला प्रलंबीत राहीला आहे. त्यासाठी पण आपण प्रयत्न करायला हावे होते. हे पुर्वीच्या पण सरकारने करायला पाहीजे होते आणि आम्ही पण करायला पाहीजे होते. ही प्रत्येकाची जबाबदारी होती आणि सगळे जण या गोष्टीला कमी पडलेलो आहोत. मला म्हणायच नाही की कोणाला दोष दयायचा. दोन महीन्यापुर्वी आपण चिखलीमध्ये डब्ल्यूटीपीच उदघाटन केलं आपल्याला देहू वरुन पाणी उचलायच ठरलं त्यावर आपण काय पाठपुरावा केला. आपण इथे बोलण्यापेक्षा पर्सनल जावून आयुक्तांना भेटल पाहीजे, बोलल पाहीजे. सभागृहात बोलल की झाल का निश्चित या गोष्टीच काय केल गेल पाहीजे याचा पाठपुरावा केला गेला पाहीजे. आमच्या भागामध्ये पाण्याची खुप मोठी अशी अडचण आहे. आम्ही या गोष्टीसाठी रोज फॉलोअप करत असतो आयुक्त साहेबांना भेटत असतो. दोन्ही आमदारांच्या माध्यमातून बोलत असतो. आता देहूमधुन पाणी उचलण्यासाठी आपल्याला काही गोष्टीच्या अडचणी आहेत त्याला सुध्दा सामोर गेल पाहीजे. मला तर वाटत एक दोन वर्षात पाणी आल नाहीतर आपल्याला पुढच्या वेळेसच्या निवडणूकीला सामोर जाण सुध्दा आवघड आहे. परंतु यासाठी आपण सगळयांनी प्रयत्न केले गेले पाहीजेत. ज्या देहूमधुन पाणी उचलतो ज्या जॅकवेलमधुन पाणी उचलायच त्या जागेचा सुध्दा प्रश्न प्रलंबीत आहे. आपल्या कामामध्ये अडचणी आहेत, पाईपलाईनमध्ये अडचणी आहेत. देहू ग्रामपंचायतीमधुन सुध्दा आपल्याला व्यवस्थित परवानग्या मिळाल्या गेल्या पाहीजेत, त्यांच्या पण काही अडचणी आहेत. त्यामुळ मी आपणा सर्वांना विनंती करतो की आपण भांडत बसू नका याच्यावरती काहीतरी आयुक्तांना उपाययोजना करायला सांगा. मुळातच पाणी कमी आहे त्यामुळे कितीही ओरडलतरी काही होणार नाही मला वाटत नाही पाणी पुरणार म्हणून. त्यापेक्षा दोन वर्षात ही पाणीपुरवठा योजना पुर्ण करावी असे मी आवाहन करतो. आपण पाणी दिवसाआड केल, मी पुर्वी म्हणल होत पाणी दिवसाआड करा प्रेशरनी पाणी येईल, माझ्या प्रभागामध्ये मी सांगतो दिवसाआड पाणी केल तरी

चालेल पण प्रेशरन पाणी दया. कारण रोज पाणी सोडलतर शेवटच्या टोकापर्यंत पाणी येत नाही अगोदरच्या लोकांना पाणी येतं. आणि जोपर्यंत अगोदरचे लोक भरतात तोपर्यंत मागच्या लोकांना पाणी जात नाही नंतर पाणी संपत जात. तरी आयुक्त साहेब, महापौर साहब आपणा सर्वांना विनंती करतो की याच्यावरती आपण कुठलही भांडवल न करता, भांडण न करता याच्यावरती मार्ग काढावा आणि महापौर साहेब आपल्या कार्यकालासाठी शुभेच्छा देतो जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौर साहेब, सर्वात प्रथम तुमच्या कारकीर्दीला मी हार्दीक शुभेच्छा देतो. तुमच्या पुढच्या जीवनाला व राजकीय कारकीर्दीला शुभेच्छा देतो कदाचित ही मिटींग तुमची शेवटची असेल. पण तुम्ही महापौर व्हायच्या अगोदर माझे एक चांगले मित्र आहात त्याबद्दल मनापासून तुमच्या कारकीर्दीला हार्दीक शुभेच्छा आहेत. तुमचे अभिनंदन सुध्दा, कारण तुमच्या कारकीर्दीमध्ये तुम्हांला चांगल काम करता आलं. परंतु एक गोष्ट मला खटकली की मे महीन्यामध्ये आपण सांगीतल होतं की पाणीकपात अजीबात होणार नाही. पण ऐन पावसाळयामध्ये आपल पाणी कपात झाल. त्याच्यानंतर तुम्ही जाता जाता केला ईशारा आसा कार्यक्रम झाला आपला आणि एकदम ठोकाच दिला आम्हांला की डायरेक्ट एक दिवसाआड पाणी म्हणजे मला तुमच्याकडन ही अपेक्षा नव्हती. तुम्ही देखील या गोष्टीला विरोध केला पाहीजे अशी माझी मनापासून अपेक्षा आहे. निकम साहेबांनी पंचवीस दिवसापुर्वी पेपरला स्टेटमेंट दिलं की शहरामधली पाणी तक्रार राहीलेली नाही. मग आज ही वेळ कशाला. निकम साहेब तुम्हांला माहिती आहे का आपल्या शहरामध्ये २४X७ च किती काम झाल आहे. कुठल्या कुठल्या वॉर्डामध्ये किती किती टक्के काम झाल आहे. आता आमची भाषण झाल्यानंतर सांगा. मी माझ्या प्रभागाच सांगतो माझा प्रभाग टोटली २४X७ ला तयार आहे. फक्त एक रुपेश कॉलनी जर सोडलीतर तीही सुपेकर साहेब कार्यकारी अभियंता होते त्यांची बदली होणार होती त्यांनी तरतूदीवरती व्यवस्थित लक्ष दिल नाही आणि त्या कारणामुळे आमच्याकडे जुंधारे साहेब आहेत त्यांच्यावर ताण आलेला आहे. माझ्या वॉर्डामध्ये इतरही भरपूर कामासाठी आम्हांला प्रॉब्लेम आहे त्याच्यासाठी तुम्हांला नंतर भेटता येईल ती तरतूद मला करुन दयाव. परंतु तुमचे जे २४X७ चे ठेकेदार आहेत ते ठेकेदार नक्कीच कुणाचे आहेत हेच कळत नाही आम्हांला. कारण त्यांच्या करारनाम्यामध्ये जेव्हा तुम्ही २४X७ च काम करताय त्यावेळेस तुम्हांला ब्लॉक असतील, किंवा काँक्रीट असतील किंवा डांबरीकरण असेल ती जागा त्यांनी जशीच्या तशी करुन देणें बंधनकारक आहे.

परंतु कुठेही काम सुरु करायच असेलतर अजीबात नगरसेवकांना विश्वासात घेत नाहीत. कुठली गल्ली पहीली घ्यायची आणि कुठली नंतर घ्यायची आमचे सहकारी प्रमोद कुटे बसले आहेत त्यांना विचारा. अक्षरशः आमच्या दोघांचे मिळून त्या ठेकेदारा बरोबर दहा-दहा, पंधरा पंधरा वेळा भांडण झालेली आहेत. कुठही खड्डा करायचा आणि तो खड्डा बुजवण्यासाठी त्यांच्या माग वारंवार वारंवार लागून देखील त्यांनी खड्डा बुजवलेला नाही. जवळ जवळ स्थापत्य विभागाचा माझ्या प्रभागामध्ये पंधरा-एक लाख रुपयाचा खर्च स्थापत्याच्या अंगावर पडलेला आहे. आता ठेकेदाराचा डायरेक्ट फायदा झालेला आहे. त्यांच्यावरती काहीही नियंत्रण नाही. तुम्ही मला सांगा, आज तुम्ही एक दिवसाआड पाणी करताय आज तुमच्या पंपींग स्टेशनची काय हालत आहे हो. एमएसईबीची काय हालत आहे आज. आज शहरामध्ये कुठल्याना कुठल्या ठिकाणी कंटिन्यू लाईट जाते. एक मिनीटासाठी जरी लाईट क्लिक झालीना आपल्या पंपस्टेशनला तर आपले आठरा पंप आहेत आठराची आठरा पंप डायरेक्ट बंद पडतात आणि ते आठरा पंप ऑन करण्यासाठी पुन्हा लाईट आल्यावरती आपल्याला पुर्णपणे अर्धा तास लागतो. आणि त्या अर्धा तासामध्ये ४० एमएलडी पाणी कमी पडत. आता विचार करा दिवसातून चार पाच वेळा जरी लाईट क्लिक झाली तरी काय नागरीकांची हालत होणार आहे. मी तुम्हांला मनापासून विनंती करतो की तुम्ही जर एक दिवसाआड पाणी देणार असालतर फ्रि दया. आज तुमची क्षमता नाही की तुम्ही सव्वीस सत्तावीस लाख लोकांना पाणी पुरवू शकत नाहीत. तुम्ही आख्ख्या लोकांना पाणी देणार आहेत. मग चोवीस तास पाणी त्यांना दयानां. आमचा ८० टक्के भाग २४X७ ला रेडी पण आहे. शेवटच्या दोन तीन तासामध्ये त्यांना जो काही स्टॉक करायचा असेलतर स्टॉक करतील. आहो, एवढ २४X७ च काम कशाला केल आपण. एवढा महापालिकेचा पैसा कशाला आपण बरबाद केला आहे. मागे लागून लागून त्या २४X७ च काम केल. आम्हांला विचारल नाही इथले बॉक्स बसवले तीथले बॉक्स उखडले. आम्हांला विचारल नाही, कुठल्या गल्लीमधल आमचा रिपेअरींगच आहे कुठल काय आहे नगरसेवकांना विचारायच नाही का डायरेक्ट काम करायच. आहो, ही कुठली पध्दत आहे. महापौर साहेब, मी तुम्हांला सांगतो आता सुदैवाने आमच्या पाठीमागे एक आमदार आला आहे. माझ्या प्रभागामध्ये तुम्ही डॉ. रॉय यांना विचारा कमीत कमी ३५ ट्रक कचरा काढला या पंधरा एक दिवसामध्ये. एवढा केरकचरा माझ्या वॉर्डामध्ये जमा झालेला आहे. कुठली पध्दत आहे ही, जोपर्यंत आमच्या माग कोणी नाही याचा अर्थ आमच्या वॉर्डात कामच करायच नाही का.

तरतूद बघा आख्ख्या अ प्रभागामध्ये सगळयात कमी तरतूद १४ नंबरच्या वॉर्डला आहे. मोठे प्रोजेक्ट वेगळे आहेत तो भाग वेगळा आहे. परंतु नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न छोटया कामामध्ये आहे. काल तुमचा मॅसेज आला की सगळे सोसायटयाचे मुख्य मुख्य पदाधिकारी संध्याकाळी आमच्या ऑफिसला. कारण माझी चार पाच दिवसापुर्वीच पाणी टंचाईवर त्यांच्या बरोबर मिटींग झाली. मी डेप्यूटी आणि वडके साहेब यांना घेवून बसलो होतो. लडकत साहेबांना वेळ नव्हता. ते कुठल्यातरी कामासाठी बाहेर गेले होते ते आले नाहीत मिटींगला आणि लगेच दोन चार दिवसानी डायरेक्ट एक दिवसाआड पाणी. लोक म्हणायले आम्ही करायच काय, का आम्ही घर सोडून जावू का. ही परिस्थिती त्यांच्यावरती निर्माण झालेली आहे. मग याच्यावरती काय तोडगा आहे तुमचा. याच्यासाठी काय उपाययोजना केलेली आहे. माझा वॉर्ड ८० टक्के तयार आहे तुम्ही मला २४ तास पाणी दया. नाहीतर माझा या गोष्टीला पुर्णपणे विरोध आहे. माझ्या भागामध्ये सोसायटया कमी आहेत, बैठा भाग जास्ती आहे आणि डेंग्यूचे इतके पेशंट झाले की चार ते पाच मयती झाल्या आमच्याकड. औषध फवारणीसाठी गेलोना लोक पाणी फेकत नाहीत त्याच्यामध्ये आळया दिसल्यातरी कारण आम्ही काय वापरायच, आम्हांला धुणं धुण्यासाठीतरी पाणी होत अस म्हणतात. बळ बळ भांडून त्या ड्रममध्ये औषध फवारणी करावी लागते. अक्षरशः आम्ही पन्नास एक ड्रममध्ये बळबळ औषध टाकल. त्याच्यामध्ये आम्हांला आळया दिसतात. पण लोकांचा जीव आडकला पाण्यामध्ये. आता एक दिवसाआड झाल म्हणल्यास अजून प्रॉब्लेम वाढणार आहे. अजून डोक्याला ताप होणार. तुम्हांला जो निर्णय घ्यायचा आहे तो व्यवस्थितपणे घ्यावा. तुमच्या चांगल्या कामामध्ये आम्हांला विरोध करायचा नाही. तुम्हांला मी सांगीतल आता एक मिनीटासाठी लाईट गेलीतरी ४० एमएलडी पाणी कमी पडतं. समजा उदया माझ्याकड पाणी येणार नाही आणि परवाच्या दिवशी तुमच्या पंपींग स्टेशनच काम निघालतर आम्ही काय करायच. आमच्याकडच्या सोसायटयाला पावसाळा लागल्यापासून प्रत्येक सोसायटयाला साठ ते सत्तर हजार पाण्याच्या टँकरच बील आलेली आहेत. मग एक दिवस खाडा झालातर त्याच्या दुस-या दिवशी अचानक पंप पडला, काहीबी होवू शकतं ते यंत्र आहे. तुम्ही मला सांगा तो पॅचअप काढण्यासाठी तुम्ही तुमच्या काळामध्ये काय केलं. तुम्ही का नाही एखाद यंत्र आणल, की त्याच्यामधन त्याला इलेक्ट्रीक सप्लाय दिला जाईल जरी लाईट क्लिक झालीतरी पंप बंद पडणार नाही. याचा विचार का केला नाही. मला पक्षनेत्यांना विचारायच आहे की पक्षनेते साहेब याच्यावरती आपण का लक्ष दिलं नाही.

याच्यामध्ये परिपुर्ण लक्ष दयायच काम होत तुमच. आज जगामध्ये चांगले चांगले यंत्र आहेत. आपण परदेशातले दौरे करतो, इकडे जातो तीकडे जातो आज पाणी हा आपल्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. अर्ध्या तासासाठी आपले सगळे पंप बंद पडतात काही एमएलडी पाण्याच नुकसान होतं. माझ्या वॉर्डात २४ तास पाणी दया नाहीतर माझा या प्रकल्पाला विरोध राहील, धन्यवाद.

**मा.राजू बनसोडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, आम्ही वारंवार कम्प्लेन्ट केली. अजून आमच्या भागाकड तुम्ही जाणीवपुर्वक दुर्लक्ष करता. दापोडी पासून रावेत पर्यंत आमचा हा एण्डचा भाग आहे. सहा महीने झाले आमच्या भागाला पाणी नाही. कितीवेळा आम्ही प्रभाग समितीमध्ये विषय घ्यायचा. नंदीबैलाची कहाणी ऐकलीना तुम्ही, त्यांना त्यांच्या समोर सांगायच ऐकतात, मुंडक हालवतात झाल, तीथच विषय संपला. महत्वाचा पाण्याचा विषय चालला आहे आणि तांबे साहेब कुठे आहेत. निकम साहेब तुम्हांला एक फोन केलेला होता. मी मोर्चा संदर्भात तीकड पोलीस चौकीमध्ये गेलो होतो तीकड मला बोलावल होतं. मोर्चा काढू का म्हणलतर तुम्ही म्हणाले की तुमच्या भागातील पाणी मी सुरळीत करतो. निकम साहेब तुम्ही पण आमच्या भागात आले नाहीत. आमच्या भागात सगळा स्लम ऐरीया आहे कितीवेळा आम्ही सांगीतल आहे. आमचा ७५ टक्के हा स्लम भाग आहे. आमच्या भागामध्ये सगळे लोकांच हातावरच पोट आहे. आमच्याकडे सहा सेक्शनमध्ये पाणी सोडतात. एकच पाणी आम्हांला किती वाजता मिळायला पाहीजे तुम्ही सांगा, दोन, तीन, चार आहो दहा-दहा वाजता पाणी येत. रात्री दहा वाजता पाणी येत आणि दहाच पाणी तीन वाजता येतं. नागरीकांनी झोपायच नाही का, का पाण्यासाठी डयूटया सोडायच्या. आयुक्त साहेब, तुम्हांला आम्ही पाण्याच्या संदर्भात निवेदन दिलं होतं. आमच्याकडच पाणी सुरळीत करा म्हणून. ठिक आहे तुम्ही एक दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय घेतला. पण कुणाला विश्वासात घेवून हा निर्णय घेतला. ज्या ज्या भागात पाणी कमी येत, ज्या लोकांनी तुम्हांला निवेदन दिलं आहे त्या ठिकाणच्या प्रतिनीधीला तुम्ही का विश्वासात घेतल नाही. मनमानी कारभार का करताय तुम्ही. आमच्या भागातील काय अडचण आहे हे विचारण्यासाठी प्रतिनीधीला विश्वासात घ्यायच होतनां. साहेब, याच्यासाठी तुम्ही जबाबदार आहेत. आज बिस्लरी प्लॉन्टला पाणी मिळतय, हॉटेल लाईनला पाणी मिळतय, बांधकामाला पाणी मिळतय. सगळया भागाला पाणी मिळतय मग आमच्या भागाला पाणी का मिळत नाही. आम्ही दापोडी सोडून इकडे रहायला यायच का. ते झाल म्हणजे तुम्हांला मार्ग मोकळा

होईल. त्या कुलकर्णी यांची बदली करा म्हणून सांगीतल प्रभाग समितीमध्ये. त्या मॅडम आमच्या भागामध्ये नाही काम करु शकत. त्यांना गोळया खायला लागतात, घाम येतो. फोन केलातर त्या उचलत नाहीत. त्यांची बदली करा म्हणून तुम्हांला किती वेळा निवेदन दिलं आहे. आम्ही चारही नगरसेवकांनी किती वेळा तुम्हांला सांगीतल की त्यांची बदली करा म्हणून. त्याना रात्री-अपरात्री लोक फोन करतात. त्यांना किती त्रास होतो. त्यादिवशी महिलांनी घेराव घातला होता. विचारा त्या कुलकर्णी मॅडमला. आयुक्त साहेब, तुम्ही हा प्रश्न खरच सिरीएसली घ्या. आमच्या भागातील पाण्याची लई अडचण आहे. पाणी रात्री तीन तीन वाजता येत कोण लोक जागत राहणार. का पक्षपात होतो आमच्या भागावर. महापौर साहेब, तुमची आजची ही शेवटची सभा आहे. आयुक्त साहेब, तुम्ही थोड लक्ष दया. साहेब तुम्ही एक दिवसा आड पाणी देण्याचा निर्णय घेतलेला आम्हांला मान्य आहे पण आम्हांला पाणी प्रेशरनी मिळाल पाहीजे. आम्हांला आमच्या भागात पाणी व्यवस्थित मिळाल पाहीजे एवढीच तुम्हांला मी विनंती करतो. तुमच्या कारकीर्दीमध्ये बरेचसे आंदोलन बघीतले असतील, कुणी कचराच केल असेल, कुणी काही केल असेल पण आमच आंदोलन वेगळया प्रकारे असेल त्याला सगळे जबाबदार तुम्ही असताल. एवढ बोलून मी थांबतो.

**मा.संदिप वाघेरे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्त साहेब आपण दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आयुक्त साहेब माझ्या प्रभागात आता अशी परिस्थिती आहे की, ६ एमएलडी पाण्याच्या टाकी आहे आणि प्रभागामध्ये दररोज १३ ते १३.५० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. आताच माझ्या प्रभागामध्ये जे पाणी येत आहे ते पुरत नाही दोन वेळा टाक्या भरतो सकाळ आणि संध्याकाळी रात्री आणि दुपारी आणि संध्याकाळी पाणी सोडतो. आम्ही तशी ॲडजेस्टमेंट केली होती. मागच्यावेळेस सुध्दा याच विषयावर ९ तास चर्चा झालेली होती. याच्या आगोदर सुध्दा २/३ वेळा चर्चा झालेली होती. मागच्यावेळेस आपण दिवसाआड पाणीपुरवठा केला त्यानंतर पाऊस पडला त्यानंतर सांगण्यात आलं की, आपण दररोज पाणीपुरवठा करु परत सांगितलं की, आठवडयातून एक दिवस पाणीपुरवठा बंद करु, परत दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हणजे २४ बाय ७ हे तर लांबच राहीलं आता साडेतीन बाय ७ असंच झालं कार्यकारी अभियंता तांबे म्हणून व्यक्ती आहे या व्यक्तीकडं गेल्या साडे पाच वर्षापासून पाणीपुरवठा विभाग आहे तेंव्हापासून ही बोंबाबोंब चालू आहे. सुरुवातीला थोडी ओरड कमी होती परंतु अडीच वर्षापासून

बीजेपीची सत्ता आल्यापासून पाण्याची जास्त बोंबाबोंब चालू झालेली आहे. म्हणजे तांबेनी भारतीय जनता पार्टीची सुपारी घेतलेली आहे का? महापौर साहेब, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. कारण एकाच ठेकेदाराला नळ जोडायचं आणि काढायचं सुध्दा काम दिलेलं आहे. आयुक्त साहेबांना मागच्या वेळेस सांगितलं की,सगळी कामं तांबे साहेबांनी ॲडजेस्ट करुन,मॅनेज करुन एकाच ठेकेदाराला दिलेले आहे त्या ठेकेदाराला हे पार्टनर आहेत की काय याचीही चौकशी करा. तांबेना निलंबीत करुन सक्तीच्या रजेवर पाठवा त्यांना दुस-या जागेवर सुध्दा पाठवू नका कारण तिथं सुध्दा काही तरी करतील आयुक्त साहेब तुमच्याकडे सहा महिन्यापूर्वी १२/१३ ठेकेदारांनी येऊन तक्रारी केलेल्या होत्या त्यावर तुम्ही काय कारवाई केलेली आहे. साहेब,हे असंच जर का चालू राहील तर आंधळ दळतंय आणि कुत्र पीठ खातयं अशी परिस्थिती चालू राहील तर ही महापालिका भिकेला लागेल. आणि ठराविक अधिकारी असेच करणार असतील तर नगरसेवकांच्या नावाने मार्केटमध्ये बोंब होईल की, नगरसेवकांनी हे असे,असे उद्योग केले म्हणुन हे असं झालं आहे मुळात हे अधिकारी आणि ठेकेदार मिळून करतात.मी दिड वर्षापुर्वी लडकत आणि निकम साहेबांना घेऊन तिथं देहूला गेलो होतो त्याठिकाणी डब्ल्यूटीपी ची जागा आहे आणि ही जागा घेतली तर विषय पटकन मिटेल असे म्हणले होते. माझं फक्त एकच म्हणणं आहे की, पिंपरी चिंचवड शहराचा पाण्याचा प्रश्न संपला पाहिजे. गेल्यावर्षी पण हाच विषय झाला होता. तुम्हांला हे ही म्हणलं होतं की, रावेत येथे जे पंपींग करतो त्याठिकाणी जनसेट बसविणेत यावा लाईट गेली तर जनसेट ॲटोमॅटीक चालू होतील. म्हणजे २ मिनीटांच्या आत ते पंप चालू होतील. एक,दोन मिनीटे पंप बंद झाले तर ३०/४० एमएलडी पाणी कमी येते असेल आणि त्यामुळे सभासदांची ओरड होत असेल तर ती ओरड बंद होईल. आपण इतर कामाचे कोटयावधी रुपयांचे टेंडर काढतो पण जनसेट घेण्याच्या संदर्भात टेंडर का काढत नाही. रावेत मधील पाईपलाईनचा जो विषय आहे मी त्यांना मगाशी बोललो होतो ते म्हणाले तुम्हांला धरणाच्या आतलं पाणी घ्यायची गरज काय आहे तुम्ही धरणाच्या इथ संप करा, तेथून पंपींग करा आणि पाणी पण चांगल येईल आणि सेक्टर २३ ला पण पाणी आणु शकतो. या अधिका-यांनी चुकीचं फिल्डींग तयार केलं आणि मग हा सगळा उद्योग वाढला. आज १० वर्ष झाली आहेत त्यावेळेस आपण २०० कोटी रु.खर्च केलेले आहेत जागा ताब्यात नसताना टेंडर काढलं कशाला महापालिकेचे पैसे आहेत नां आता भामा आसखेड मधुन म्हणतात की, आपल्याला १८०० डायमीटरचे पाईप लागणार आहेत का, १५०० डायमीटरचे पाईप लागणार

आहेत. ते जर पाईप इकडे वापरता आले तर ते करु शकतात म्हणजे जे २०० कोटी रु.चे पाईप घेतलेले आहेत ते भंगारमध्ये विकणार आहेत का? या परिस्थितीच्या बाबतीत मी आयुक्त साहेब तुम्हांला वारंवार भेटलेलो आहे. आणि दत्ता काका साने मगाशी म्हणले की, बिल्डरांचा पाणी पुरवठा बंद करा. ठिक आहे मी बांधकाम व्यवसायीक आहे. कोणी जेव्हा मध्ये बांधकाम करणारा असेल किंवा पार्टनर असेल किंवा कोणी डायरेक्ट बिल्डर असेल महापालिकेला या बिल्डरकडुन ७०० ते ८०० कोटी रु. उत्पन्न मिळते. म्हणजे महापालिकेच्या एकुण उत्पन्नापैकी २० टक्के उत्पन्न हे बांधकाम परवानगी विभागाचं आहे लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे कुठलाही बिल्डर स्वत:चा एसटीपी बांधतो जे पाणी घेतो तो परत वापरात आणतो त्या पाण्याचं तो रिसायकलींग करतो म्हणजे ३५ टक्केच तो पाणी वापरतो. इथे विषय आला की, टँकर लॉबी, बिल्डर लॉबी याच तुम्ही काय करणार आहात थोडया दिवसांनी बिल्डरच्या एनओसी बंद करा, अमुक करा,तमुक करा असं काही पडद्यामागचं काही तरी काळबेरं करणार मागच्या वेळेस या विषयावर चर्चा झालेली होती नां आता म्हणताय की, २७ टाक्या बांधणार अहोत मुंबई महापालिकेमध्ये एकही पाण्याची टाकी नाही तरी प्रेशरनी पाणी देतात ना आपल्या इथं ही सिस्टीम का नाही. निकम साहेब मुंबई मध्ये पाण्याच्या टाक्या आहेत का? मग आपल्या इथंच का ? त्यांचा जरा अभ्यास करा त्यांचे रुल्स आपण फॉलो करतोत ना तसंच टाकीचं पण करा नां आयुक्त साहेब या विषयावर विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आयुक्त साहेब तुम्ही बदली होऊन जाल पण आम्हांला अजुन इथं रहायचं आहे तांबेनी भारतीय जनता पार्टीची सुपारी घेतलेली आहे का? महापौर साहेब, तांबेची चौकशी लावा म्हणजे लावाचं तुम्हांला तांबेचे सगळे प्रताप माहित आहेतच एवढं बोलून थांबतो.जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे–** मा.महापौर साहेब,.आयुक्त साहेब,न्मा.सभागृह मा.महापौर साहेब तुमच्या अधिपत्याखाली होणारी ही शेवटची महापालिका सभा, मागच्या जेवढया महापालिका सभा झाल्या त्यामध्ये आपण सर्वांना बोलण्याची संधी देवुन या शहराच्या विकासामध्ये तुमच्या माध्यमातून एक महापौर म्हणुन एक चांगल्या पध्दतीचे कामकाज केलेले आहे. आपली कारकीर्द खुप चांगल्या प्रकारची पार पडलेली आहे. मी या सभागृहाच्या वतीने आपले आभार मानते. तुमच्या कामाचं कौतूक करते की, आपण सर्वांना सामावून घेऊन काम केलं पुढच्या काळातील आपली राजकीय वाटचाल चांगली असो. तुमच्या मनोकामना ज्या आहेत त्या पूर्ण होवो अशी अपेक्षा व्यक्त करते परंतु आज सभागृहामध्ये सुरुवात झाली आहे ती

पाणी पुरवठयाच्या विषयावर बोलायला कालपासून पाणीपुरवठयाच्या विषयावर बातम्या येण्यास सुरुवात झाली की, दिवसाआड पाणीपुरवठा होणार आहे हे ऐकलं आणि व्हॉटसअप, फेसबुक या माध्यमातून वेगवेगळया बातम्या कोणाचं काही म्हणणं असेल तर ते आपआपल्या पध्दतीने मांडण्यास सुरुवात झाली. आणि आज आपण पेपरमध्ये बघतोय की, खरंच झालं की नाही पेपरला जाहीर झाल्यानंतर कळेल, आणि सोमवार पासून दिवसाआड पाणी पुरवठा चालू झाला. ख-या अर्थाने दिवसाआड पाणी पुरवठा करण्यास सर्व नगरसेवकांचा विरोध दिसत आहे. सर्वांना माहिती असेल मागच्या काळामध्ये जितक्या दिवस दिवसाआड पाणीपुरवठा चालू होता त्या काळामध्ये आम्ही शहरातील पाणीपुरवठयाच्या तक्रारी कमी असतील मग अनेकांना प्रश्न पडतो की, आपले धरण पूर्णपणे भरलेलं असताना आपण दररोज पाणीपुरवठा का करीत नाही याचे टेक्नीकल कारण कोणाला सांगता येत नाही. महापौर साहेब,सकाळी महिलांचे फोन येतात म्हणतात की, ताई झाली का झोप, बोला की म्हणल्यानंतर अहो ताई एवढा पाऊस झाला, माणसे वाहून गेली तुम्हांला आमच्या घरात पाणी देता येत नाही का? मग त्या वहिनींना सांगायचं की, ताई असं,असं होत आहे आपली धरणातून पाणी उचलण्याची यंत्रणा कमी आहे आणि ती कशी वाढवायची यासाठी प्रयत चालू आहेत अशी उत्तरे द्यावी लागतात. इतक्या सकाळी,सकाळी बोलणं शक्य नसत तेंव्हा महापौर साहेब, आयुक्त साहेब आपल्याला एक विनंती आहे की, याठिकाणी दिवसाआड पाणीपुरवठा करणार आहात तर त्याचवेळेस पेपरला हे ही जाहीर करा यावर्षी खरचं पाऊस चांगला झालेला आहे धरणामध्ये मोठया प्रमाणात साठा असला तरी दरवर्षी आपल्याला जितकं पाणी उचलणं शक्य असतं तेवढी यंत्रणा आपण सेक्टर २३ ला केलेली आहे आणि तसं असल्यामुळे कितीही पाणी आलं तरी आणि तुमची इच्छा धो,धो पाणी उचलावं आणि ते वापरावं हे शक्य नाही. हे प्रत्येक नागरीकाला सांगण शक्य नाही. हा झाला पहिला महत्वाचा भाग तुम्ही हे ही क्लीअर करा तुम्ही दिवसाआड पाणी द्यायचं ठरवलच आणि सगळया पक्षाची बैठक घेतली असेल, गटनेते असतील, महापौर, पक्षनेते असतील या सगळयामुळे दोनदा निर्णय झालेला आहे आणि ह्या निर्णयानंतर तुम्ही परत पुन्हा ढळू देवु नका कारण काय होतं कोणताही निर्णय तुम्ही ५/६ जण मिळून घेतात आणि यामुळे आमच्या सारख्या सर्व नगरसेवकांना वॉर्डामधील नागरीकांना फेस कराव लागतं. कारण त्याच असे आहे की, तुम्ही म्हणता दिवसाआड तर दिवसाआड तुम्ही म्हणता रोज पाणीपुरवठा तर रोज पाणीपुरवठा तुम्हांला वाटल की, आठवडयातुन एक दिवस पाणीपुरवठा बंद

करायचा ते ही केलं तुम्ही  तोपर्यंत आमच्या लोकांना सवय लागायची या सगळयामध्ये ४/५ महिन्याचा कालावधी जातो आणि हा निर्णय तुम्ही आमच्या लोकांवर लादता आयुक्त साहेब तुम्हांला जे काही करायचे आहे त्याच्यावर तुम्ही ठाम रहा. शहरामध्ये किती पाणी आहे किती देवु शकता, कशा प्रकारे वितरण करु शकता की जेणेकरुन आमच्या १३३ लोकांना ज्या नागरीकांनी  आम्हांला निवडुन दिलेलं आहे त्या माझ्या नागरीकांना त्रास होणार नाही अशा प्रकारचं नियोजन करा. आयुक्त साहेब, तुम्ही आता बोलता,बोलता म्हणले की, मी माझ्या  अधिका-यांना ठामपणाने सांगितल आहे की, हे काही बाराही महिने आम्हांला दिवसाआड पाणी नाही परंतु हे होत असताना तुम्ही सांगा ना साहेब, हे पाणी तीन महिन्यासाठी दिवसाआड देणार आहोत आणि या तीन महिन्यामध्ये माझ्या अधिका-यांनी असा,असा बदल करायचाच आहे असा का तुम्ही निर्णय घेत नाही, जसं आम्ही मोघम बोलतो, पॉलटीक्सच्या भाषेत बोलतो तसे तुम्ही बोलता. आम्ही तुम्हांला सहकार्य करतो पण तुम्ही २/३ महिन्यामध्ये काय बदल करणार आहात हे सांगावे. तुमच्या बोलण्यातून आलेलं आहे की, आपण पाणी बायपास करणार आहोत बायपासमुळे पाणी प्रेशर हाय होतो हे सुध्दा माहिती आहे. आणि मग तुम्ही निर्णय घेतल्यानंतर तुम्हांला  काम करायला  किती कालावधी लागेल जसं आज तुम्ही पेपरला ठामपणाने  सांगितलं आहे की,  सोमवार पासून आम्ही दिवसाआड पाणी सोडणार  तुम्ही सांगा की, येथून पुढं तुम्हांला किती दिवस लागेल हे पण सांगावे. धरणातील पाण्याची अडचण नाही, आता धरण भरलेलं आहे मला वाटतं पुढच्या जुलै,ऑगष्टला सुध्दा पाणी डिस्ट्रब होणार नाही असं मला माझ्या अल्प बुध्दीला वाटतं. परंतु जर का तुमच्या सगळया यंत्रणांनी तुमच्या मार्गदशनाखाली काम केलं तर निश्चितपणे तुम्ही आम्हा सर्वांना सभागृहाला सांगा की, तुम्ही आम्हांला ३/४ महिन्याचा कालावधी द्या त्याच्यामध्ये आम्ही या,या लाईन्स टाकणार आहे जे काही तुम्हांला करायचं आहे आणि हे सगळं केल्यानंतर आपण पुन्हा एकदा यापुढे आपण कधीही दिवसाआड पाणीपुरवठा करणार नाही. सुरळीत पाणीपुरवठा अशा पध्दतीने पाऊस झाला तर करु शकू असं ठामपणाने तुम्ही उत्तर द्या. आज तुम्ही दिवसाआड पाणी देता आमचं काहीही म्हणणं नाही जर आमच्या नागरीकांना त्रास होणार नसेल तर आम्ही तुमच्या बरोबर आहोत. पण नाहक्क त्रास देऊ नका. मोठया बिल्डींगमध्ये पाण्याचा साठा करण्यासाठी मोठया टाक्या असतात पण माझा प्रभाग हा ६० टक्के स्लमचा भाग आहे त्यांना रहायलाच  दिड बाय दिड ची खोली असते आणि त्यामध्ये पाण्याची टाकी ठेवायची, त्यावर ड्रम ठेवायचा अशा पाण्यामध्ये

आळया घुसतात हे असल्या सगळया गोष्टी आपल्याला पुढच्या काळामध्ये पहायला मिळतील. पण ठिक आहे २/३ महिन्यांचा प्रश्न आहे आम्ही लोकांना सांगू की, पाणी भरुन ठेवा पण आयुक्त साहेब तुम्ही याला डेड लाईन द्या. मोघम कोणी बोलू नका इथे आम्ही सगळे बोलतो आणि आम्ही बाहेर सांगतो की, असं होणार आहे, तसं होणार आहे. आयुक्त साहेब असं करणार आहेत, महापौर असं करणार आहेत असं आम्ही सगळं सांगतो याच्यापेक्षा पलीकडं आपण केलं पाहिजे. मगाशी तुम्ही सांगितलं की, वॉशिंग सेंटर बंद करणार, हॉटेलचं पाणी बंद करणार ज्या ज्या ठिकाणी आपण पिण्याचं पाणी वापरतो. समजा माझं अधिकृत वॉशिंग सेंटर आहे. झाले सांगुन, आज या शहरामध्ये तुमचं कसलंही नियोजन नाही. या शहरामध्ये अनेक आयुक्त आले, अनेक सत्ता आल्या परंतु आम्ही नियोजन करण्यात कुठं तरी कमी पडलो आहे. हे आम्ही सुध्दा कबुल केलं पाहिजे. झालेला उशिर खुप झाला पण यापुढच्या काळात उशिर होऊ नये म्हणुन तुम्ही सांगा की, शहराच्या या भागात वॉशिंग सेंटर टाकता आलं पाहिजे आणि त्याठिकाणी आमचे एसटीपी प्लँन्ट आहे तेथून आपण जे काही पाणी ट्रिट केलेलं आहे त्याची लाईन टाकलेली आहे का? हे पाहिलं पाहिजे. फक्त वॉशिंग सेंटरच कनेक्शन तोडणार एवढं म्हणुन भागणार नाही. त्याच्या बाबतीत सुध्दा एक ठाम निर्णय घेतला पाहिजे. आणि साहेब, तुम्ही सांगा २ दिवस, ४ दिवस, ८ दिवस आपल्याकडे खुप यंत्रणाही पाहिजे. तुम्हांला जर हे करायचं असेल तर एकदम डिसीजन घ्या आणि त्यावर आपण ठाम राहीलं पाहिजे. जे अनधिकृत हॉटेल्स आहेत ते रात्रभर चालू असतात त्यांना पाणी लागत नाही का? कोणीही टॅब मारतं आणि पाणी घेतात, पण त्याच्यावरुन होतं काय तुम्ही आपलं जाणार चाळीमध्ये आणि गरीबांच नळकनेक्शन तोडणार पण ते कनेक्शन तोडू नका असं मी म्हणणार ही नाही. पण जे व्यवसायीक लोक आहेत जे आमचं पाणी चोरुन वापरतात त्यांना तुम्ही २/३ दिवसाची मुदत द्या आणि त्यानंतर एकही वॉशिंग सेंटरला तुमचं पाणी जाणार नाही, एकाही हॉटेलला पाणी जाणार नाही.हे तुम्हांला शक्य आहे का? या सगळया गोष्टीवरती तुम्ही टारगेट करा ज्याचं व्यवसायिक कनेक्शन आहे ते नक्की तोडा त्यांनी रितसर तुमच्याकडे जास्तीचे पैसे भरुन जी काही रितसर परमीशन आहे त्याची अंमलबजावणी करावी. एक तर अनधिकृत टप-या चालतातच का? अनधिकत झोपडया कशा टाकतात हे तुमच्या अधिका-यांना दिसत नाही.आम्ही याठिकाणी कोणत्याही अधिका-यांच नांव घेणार नाही. तुम्ही इतके सक्षम आहात पण तुम्हांला सांगावस वाटतयं की, आपण जो निर्णय घेतला आहे तो आमच्या शहरावर लादत आहात. जर का तुम्ही या

शहराला, नागरीकांना सुरळीत पाणी देणार असाल तर आम्ही हे ऍक्सेप्ट करु तुम्ही आम्हांला सांगितलं आहे की, हे दोन महिन्यासाठी आपण करणार आहोत पण तुम्ही त्याची डेड लाईन सांगा, तुम्ही जाहीर करा की,तुम्हांला लोकांकडुन प्रश्न येतात की, जर का धरणामध्ये एवढं पाणी आहे मग तुम्हांला ते उचलता का येत नाही तुम्ही पेपरला जाहीर करा की, पाणी उचलण्याची यंत्रणा आपली एवढीच आहे यावर्षी आपलं नशिब खुप चांगल आहे की, आपल्या शहरात पाऊस खूप चांगला पडला म्हणुन पाणी मागते आहे.महापौर साहेब तुम्ही आम्हांला सांगावे की, हा दिवसाआड पाणीपुरवठा २ महिने किंवा ३ महिने राहील. मग आमचं म्हणणं काही नाही. दापोडी हा या शहराचं शेवटचं टोक आहे मग त्यांना पाणी देण्याचा आपला अधिकार नाही का? साहेब ते लोक पिण्यासाठी पाणी घेतात,धुण्या भांडयासाठी पाणी घेतात व्यवसायासाठी घेत नाहीत. हे पण तुम्ही लक्षात ठेवलं पाहिजे. त्यांना पाणी द्या त्यांचा पण अधिकार आहे पहाटे ५.०० पासून माझ्या प्रभागातील बायका फोन करतात. मागच्या वेळेस तर पहाटे ३.०० वा. फोन करीत होत्या त्या म्हणल्या की, आताची आता या इथं पहाटे ३.०० वा. पाणी येण्याची ही वेळ असते का? ५/६ तास लोकांना झोपा येत नाहीत. पण हे सगळे गरीब लोक असतात हे फक्त माझ्या वॉर्डामध्येच नाही तर संपुर्ण शहराची अवस्था **आहे**. साहेब मला आपल्या टाकीवरील कर्मचा-यांच्या बाबतीत बोलायचं आहे दिवसा आपल्या टाकीवर महापालिकेचा कर्मचारी असतो आणि रात्रीच्या वेळेला जे ठेकेदारांची माणसे असतात त्यांचा पगार १० हजार रु.असतो आणि त्या लोकांनी लोकांच्या शिव्या खायच्या, आमची बोलणी ऐकायची आमची फोन उचलायची आणि फोन केला की त्यांनी म्हणायचे ताई आमची डयुटी नाही ना. साहेब दिवसा काही असो पण रात्रीच्या वेळेला पाण्याच्या टाकीवर हा पगारी माणुस पाहिजे.आणि त्याच्या मदतीला ठेकेदाराचा माणुस ठेवु शकतो. आणि जो पगार घेतो त्यांनी घरी जायचं आणि पगार घ्यायचा बघा तुम्ही पाण्याच्या टाक्या जर फिरुन या, पाण्याच्या टाकीखाली गादया,कॉट हे तुम्हांला सगळं बघायला मिळेल. आम्ही या गोष्टी बोलू नये म्हणजे या सगळयांनी आराम केला म्हणुन त्रास नाही आमचं म्हणणं आहे की, पाणी द्या आणि आराम करा त्यांनी पाणी द्यायचं नाही आणि सगळया लोकांनी पहाटे ४.०० वा.पासून उठायचं आणि आम्हांला सांगायच. त्यांना पाणी देण्याची ही बेसिक गरज आहे. आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, वॉशिंग सेंटर चालतात आणि टाकीवरच्या माणसांबद्दल तुम्ही खरंच काही तरी निर्णय घ्या. आमच्या प्रश्नांची उत्तरं आम्हांला घरापर्यंत पाठवा. सभागृहात यायचं

बोलायचं आणि पेपरमध्ये बातमी छापुन यावं अशी अजिबात इच्छा नाही. त्यापेक्षा वेगळा काही बदल या शहरामध्ये घडवल्यास आम्हांला निश्चितपणे आवडणार आहे.नंतर महत्वाचा प्रश्न येईल पाण्याची गळती आपण याच वॉटर ऑडीट का करीत नाही जे मोठ,मोठे वॉल असतात त्याठिकाणाहून पाणी वाहतांना दिसत. आपण वॉर्डातले १०/१५ लाखांचे छोटे,मोठे टेंडर काढतो त्या टेंडरमध्ये ते वॉल रिपेअर होऊ शकत नाहीत का? इतकी अवघड गोष्ट आहे का? वॉल रिपेअर करायची. मागच्या वर्षी टेंडर काढलं होत की, जमीनीखालची जी गळती आहे ती शोधायची,अहो जे डोळयासमोर धो,धो पाणी वाहतयं, गळती दिसते ती तुम्ही थांबवू शकत नाही. साहेब ही गळती किती दिवसात थांबवणार हे सांगा आणि मग पाणी कपात करावी. तुमची यंत्रणा पहिली प्रॉपर करा त्यानंतर पाणी कपात करा साहेब दुर्दैवाने सांगावे लागते की, गढुळ पाणी येत, घाण पाणी येत या तक्रारी आम्ही तुमच्यापर्यंत सांगितल्या आहेत आणि अधिका-यांनी सांगितल की, २४ बाय ७ ची लाईन टाकली तरी सुध्दा आमच्या लोकांना घाण पाणी प्यावं लागतय. साहेब एक विचार करा तुमच्या घरात गढुळ पाणी आलं तर तुम्ही काय करता एक दिवस सुध्दा तुम्हांला सहन होणार नाही मला वॉर्डातली बाई म्हणते ताई पाणी गढुळ येत आहे ती बाई रोज गढुळ पाणी पिते ती बाई म्हणते पाणी आल्यानंतर रोज मला अर्धा तास पाणी सोडून द्यावा लागतो. काळं पाणी येत हे अधिका-यांना सांगुन झालं एक महिना, २ महिने नाही तर ६,६ महिने झालेले आहे. गढुळ पाणी येत असल्यास ते काम किती प्रायोरिटीने केले पाहिजे. आज पाणी आले तर उद्या हा विषय संपला पाहिजे. याबाबतीत तुम्हाला काय ऑर्डर द्यायचे आहेत ते द्या. तुम्ही काम करत नाही असं म्हणण्याच काही कारण नाही परंतु तुम्हांला विनंती की.करते की, तुम्ही जाहीरपणे सांगा की, एक दिवसाआड पाणी यावर तुम्ही ठामपणे रहा पण पुढच्या कामाचं काय जे पगारी अधिकारी आहेत त्यांच्याकडन तुम्हांला काम करुन घ्यायचं आहे. घ्या ना साहेब तुम्ही काम करुन आमच्या वॉर्डामध्ये २४ बाय ७ ची लाईन टाकली त्याच्या आधीची लाईन आहे ती पण चालू आहे,त्याच्या आधीची एक लाईन होती ती पण चालू आहे. हा एक या शहरातला सगळयात मोठा प्रश्न आहे. एखादी नवीन लाईन टाकल्यानंतर जुनी लाईन काढणेत यावी हे आम्हांला का सांगाव वाटत आम्हांला त्यांच्या मागे लागावे लागते की, ती लाईन तोड ना पहिली आणि मग कळते की, त्याच्यावर सगळयांचेच अनधिकृत नळकनेक्शन आहेत. एका एरियामध्ये एका गल्लीमध्ये ४/४ ठिकाणच्या पाईपलाईनचे पाणी जात आहे आणि म्हणुन ख-या अर्थाने पाण्याची तुट दिसुन

येत आहे. असा माझा एक अंदाज आहे. आयुक्त साहेब, प्रत्येक वॉर्डामध्ये जे जेई,डेप्युटी इंजिनियर आहेत त्यांना सांगा की, त्यांनी आपआपला एक मॅप तयार करावा कोणत्या ठिकाणी किती इंची लाईन टाकलेली आहे जुन्या लोकांशी चर्चा करा लाईन कुठून चालू करायची आणि कुठं बंद करायची याच्यावरती एक ठाम निर्णय घ्या.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की,आमचे जे काही प्रश्न आहेत त्याची उत्तरं या सभागृहाला देण्यात यावी. पुढच्या किती दिवसासाठी आम्हांला दिवसाआड पाणी देणार आहात आम्ही तर तुम्हांला सांगितल होतं की, एक दिवसाआड पाणी देण्याला लोक नाराज आहेत. परंतु शेवटी शहरातील नागरीकांना प्यायला पाणी हवं आहे अस सांगा ते ही करणं गरजेच आहे परंतु हे किती दिवसासाठी ठेवणार आहात हे या सभागृहामध्ये सांगावे. धन्यवाद

**मा.मंगला कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह एका पेपरमध्ये असं आलेलं आहे की, कमीशनर साहेब आता बस्स झालं साहेब आता सर्वांनी मुद्दे भरपूर मांडलेले आहेत. सर्वांनी भरपूर बोलले आहेत मी परत तेच बोलून खूप वेळ घेणार नाही. आज पत्रकारांना सुध्दा वाटत आहे की, कमीशनर साहेब आता बस्स् झालं त्याचा अर्थ आपण अंतरमनातन बघितलं पाहिजे की, आपण कुठं तरी चुकतोय का? आणि जर चुकत असेल तर दुरुस्ती करण्यास काहीच हरकत नाही. आणि म्हणुन मा.महापौर साहेब मी तुमच्या जागी असते ना एक तर हा असला निर्णय घेऊच दिला नसता अजिबात चालणार नाही, असंच बोलले असते.आणि मला वाटत की,माझ्यापेक्षा तुम्ही जास्त डॅशिंग आहात,यंग आहात, स्मार्ट आहात सगळं,सगळं जे काही आहे ते आज इतक्या महिला बोलल्यानंतर उद्या पेपरला बातमी हीच येणार आहे की, घरचे आहेर इतके भरपुर मिळाले.महापौर साहेब, तुम्ही सांगुन टाका की, उद्यापासून एक दिवसाआड पाण्याचा निर्णय बंद, पाण्याचा तुटवडा होईल त्यावेळेला बघु. आता महिना हा २० नोव्हेंबर आहे. एप्रिल,मे पर्यंत पाणी पुरतं जुन महिन्यामध्ये पाऊस पडणार नाही असं कधी होईल का? जुलै मध्ये तरी पाऊस पडेल. साहेब पावसाळा सुरु व्हायला फक्त ६ महिनेच राहिलेले आहेत. आणि खरं सांगते साहेब, या तांबे आणि लडकतची तेथून बदली कराच या दोघांना काम जमत नाही लडकत साहेब २००५ पासून २४ बाय ७ या योजनेचे काम करीत आहेत. २००५ ते २०१९ किती वर्ष झालेली आहेत. २००५ साली हैद्राबादला २४ बाय ७ साठी कॉन्फरन्स झाली त्या कॉन्फरन्सला मी लडकत,पाणीपुरवठयाचे काही लोक,आमचे काही नगरसेवक म्हणजे सगळे आताचे भाऊ आमदार पण होते. हे अधिकारी २००५ पासून २४ बाय ७ साठी नाचतात

आज साल कोणतं आहे १४ वर्ष झालेली आहेत. १४ वर्षामध्ये २४ बाय ७ ची तयार होणारी  योजना आज तुम्हांला सांगतात की, एक दिवसाआड पाणी पुरवठा करावा. विचार करा ना साहेब तुम्ही, आता माझी भगिनी महिला म्हणाली की, तुम्ही २ महिन्यांनी तरी आमचं पाणी कपात करु नका १४ वर्षानंतरही या अधिका-याना काम करता येत नसेल तर त्यांना म्हणावं व्हीआरएस घ्या आणि खरंच साहेब व्हीआरएस घ्यायला लावा. पहिल्यांदा यांना कामाची सवय काय होती सकाळी ८ वा.आलेला माणुस रात्री १२ वा.घरी जायचा इतकं सिनसरली काम असायचं पण हे काम होतं का काय होतं हे माहित नाही आम्ही इतक्या खोलात गेलो नाही कोणाच्या पर्सनल लाईफ मध्ये आम्ही तो माणुस संध्याकाळी ६.०० नंतर तो कुठे जातो याच्याशी आम्हांला काही घेणं देणं नाही. परंतु जेंव्हा आम्ही ऐकिवात होतो की,हे तिथं रात्री १२ वाजेपर्यंत तिथं काम करीत होते. असे हे लडकत साहेब आहेत. मग मला सांगा आज त्यांना गेल्या १४ वर्षापासून या शहराचा प्रश्न सुटत नाही. साहेब, मी मागे तुम्हांला विनंती केली होती की, लाज वाटायचं कारण नाही, माझ्या पेक्षा लहान वय असलेल्या नगरसेवकाना जर काही चांगल्या गोष्टी येत असतील तर मी त्याच्याकडनं शिकलं पाहिजे. तुम्ही आधुनिक काळामध्ये जाताय़ माझ्या काळामध्ये माझ्या भगिनी असेल, किंवा एखादा नगरसेवक असेल तर त्याच्याकडनं शिकणं गरजेचं आहे म्हणुन मी तुम्हांला असं सांगितल होतं की, आजपर्यंत जेवढे काही पाणीपुरवठयाचे अधिकारी आले होते त्यांची मिटींग लावा तीन वर्षापुर्वी पाणीपुरवठा व्यवस्थित सुरळीत होता  आताच काही खुप लोकसंख्या वगैरे वाढलेली नाही. आपण नागरीकांना वारंवार सांगतो की, तुम्ही नळकनेक्शन अधिकृत करुन घ्या हा तर या शहरातील प्रामाणिक नागरीकांचा खरं तर अपमान आहे. किती वेळा आव्हान करायचं की, अनधिकृत नळकनेक्शन अधिकृत करुन घ्या म्हणुन यानंतर जर जाणुनबुजून करत असतील तर आपले अधिकारी / कर्मचारी तिथे काय करतात हे बघायला नको का?  साहेब, रोज पाण्याच्या तक्रारी आहेत आणि तुम्ही धाडस करु नका की, दिवसाआड पाणी सोडण्याचं म्हणजे कुठल्याही शहरात तुमचा अपमान झाला नाही आणि तुम्ही तुमचा अपमान या पिंपरी चिंचवड शहरातून करुन घेवुन जाऊ नये अशी माझी तुम्हांला विनंती आहे.कारण आजपर्यंतच्या अधिका-यांनी कधीही धाडस केलेलं नाही दिवसाआड पाणी करण्याचं, पाणी कपात अहो साहेब तुम्ही नियोजन करा नां आज मला सांगा तीन वर्षापुर्वी संध्याकाळी ७.०० ते सकाळी १०.०० पर्यंत पाणी दिलं जायचं त्याच्यानंतर पाणी कपात चालू झाली ७ ते ९ झालं,नंतर रात्री ९ ते १.०० झालं त्यानंतर पहाटेचा ४ ते ५ झालं,

त्यानंतर सकाळी ६ ते ७.३० असे पाणी आलेलं आहे. आता दिड तासावर पाणी आलेलं आहे. या अधिका-यापेक्षा खालची जी लोक आहेत ती भयंकर हुशार आहेत साहेबांनी सांगितल तेवढंच आम्ही काम करणार खालच्या लोकांना पण विश्वासात घेतलं गेलं पाहिजे. त्यांना माहिती आहे की, कुठं पाणी मुरतंय आणि माझ्या नगरसेविका भगिनी सांगत असतील की,एकाच ठिकाणी दोन,दोन इंचीच्या दोन लाईन आहेत अधिका-यांना आम्ही सांगायचं आणि मग अधिका-यांनी कारवाई करायची याला काय अर्थ आहे का? पहिलं कनेक्शन बंद करुन टाक आम्ही तुझ्याकडे येणार आहे ही परिस्थिती सगळीकडे आहे अक्षरशा शहर घाणेरडं, बकाल,असुरक्षित झालेलं आहे कमीत कमी आपल्या हक्काचं जे पाणी आहे ते तरी द्या. माझ्या वॉर्डाबद्दल सांगायचं झालं तर सगळीकडे तक्रार आहे शाहूनगर मध्ये म्हणलं तर एमआयडीसीचे पाणी आहे एक दिवस पाणी नसेल तर त्याठिकाणी चार दिवस आम्हांला सफर करावा लागतो आणि तुम्ही तर दिवसाआड पाणी देणार म्हणल्यानंतर आम्ही काय करायचं. आपण लोकांना कच-याच्या डस्टबीन दिलेल्या होत्या त्याप्रमाणे लोकांना ५,५ हजार लिटरच्या टाक्या पण देऊन टाका. महापौर साहेब, जाधववाडीमध्ये बैठी घरे खुप आहेत ती लोक टॅक्स देतात त्यांना पाणी देण्याची जबाबदारी तुमची नाही का? त्यांना पाणी व्यवस्थित दिलं पाहिजे. ५,५ हजार लिटरच्या टाक्या देण्याचं टेंडर काढा त्यामुळे तरी लोक खुष होतील. आणि म्हणुन कमिशनर साहेब आपण जो निर्णय घेतलेला आहे तो अजिबात योग्य नाही. कमिशनर साहेब, तुम्हांला पुर्वी लडकत साहेब काही सांगत होते की,नाही. ज्यादिवशी पाणी बंद करतो ती लाईन भरायला दोन ते अडीच तास लागतात. २४ बाय ७ ही योजना का आणायची तर प्रदुषित पाणी आत मध्ये जाऊ नये. आणि लोकांना पाणी देण्यासाठी जो अडीच तासाचा वेळ लागतो.तो होऊ नये कॉक बंद झाल्यानंतर पाईपमध्ये जेवढं पाणी आहे तेवढं येतं का? आपलंच पाणी वेस्टेज जाते तरी सुध्दा आपण दिवसाआड पाणी करणार आहात मग हे कुठल्या तत्वात बसतं मग पहिलं सांगता ते खरं का आता सांगताय ते खरं कमिशनर साहेब, आम्ही लोकांना कितीही सांगण्याचा प्रयत्न केला तरी लोक तुम्हांला घराच्या बाहेर येऊ देणार नाहीत तुम्ही मगाशी म्हणले पाणी कपात करणार नाही. कमिशनर साहेब, दोन दिवसाचं जेवण तुम्ही एकदाच जेवण करता का हो, मगाशी पाणी पिताना सुध्दा तुम्ही इतक्या स्टाईलने पित होता की, एक घोट पाणी पिलं की, थांबायचं, एक घोट पाणी पिलं की, थांबायचं मला बरं वाटलं, मला काही वाईट वाटलं नाही म्हणजे पाणी सुध्दा इतक्या स्टाईलनं पितो म्हणल्यानंतर लोकांना

सुध्दा चांगल्या स्टाईलनं पाणी दिलं पाहिजे नां हे कुठल्या तत्वात बसतय  दोन दिवसांच पाणी एकदाच देणार दोन दिवसाचं जेवण तुम्हांला करायचे असेल तर ते एकदाच करा  पण आपण जो निर्णय घेतला आहे तो काही या शहरात  लागू होणार नाही. मा.महापौर साहेब, मी सभागृहाच्या वतीने विनंती करते की, कमिशनर साहेबांनी जो काही निर्णय घेतला आहे तो बदला तुमच्या कारकीर्दीतील ही सुवर्ण संधी आहे  शहराने तुम्हांला लक्षात ठेवण्यासाठी, उद्यापासून माई आहेतच आम्ही त्यांच्याकडनं कस काम करुन घ्यायचं ते बघु पण आज तुम्हांला सुवर्ण संधी आहे आणि म्हणुन तुम्ही कमिशनर साहेबांना सांगावे  हे काही होणार नाही. आज आख्खं सभागृह सांगतय की,  होणार नाही. मग कोणाचा हट्ट आहे फक्त आशाताई म्हणाल्या की, दोन महिने लिहुन द्या आम्हांला की, दोन महिन्यानंतर पाणी कपात होणार नाही २१ वर्षात जे झालं नाही ते २ महिन्यात काय करणार आहात आणि लडकत आणि तांबे यांना ज्या कामासाठी नेमलेलं आहे त्यांना काढून टाका दुसरे लोकं आणा नाही तर पुर्वीचे जे लोक होते त्यांना बोलवा बघा पाणी पुरवठा कसा सुरळीत होतो. यांना साईडवरती काम करण्याची सवयच नाही आणि म्हणुन महापौर साहेब, मी तुमच्या जागेवर असते ना तर एवढया सदस्यांना बोलूच दिलं नसत शहरामध्ये असं काही होणार नाही तुम्हांला दररोज पाणी मिळेल असा निर्णय महापौर साहेब तुम्ही निर्णय द्या. एप्रिल, मे महिन्यामध्ये आपण बघु त्यावेळेस लोकांचीही मनाची तयारी असते. ४० टक्के धरणात पाणी असतांना सुध्दा आम्ही पाणी कपात कधी केलेली नाही.  आणि म्हणुन तुम्हांला सांगते आज १०० टक्के धरण भरलेलं आहे त्यामुळे तुम्ही पाणी कपातीचे आदेश  रद्य करणेत येत आहे असे आदेश द्या. तुमचा आजचा सुवर्ण अक्षरातील दिवस आहे. सगळेजण टाळया वाजवणार आहेत, पेपरवाले तुम्हांला डोक्यावर घेतील,नागरीक सुध्दा तुम्हांला डोक्यावर घेतील हे कौतुक करण्यासाठी नाही तर या महिला भगिनींसाठी  तुम्हांला हा निर्णय घ्यावा लागेल. मगाशी माझे एक बांधव म्हणाले की, तांबेला कोणी सुपारी दिली आहे का?  किंवा कसं, तस सुध्दा आसु शकतं आताच्या निवडणुकीमध्ये सगळीकडे तेच वातावरण आहे. यांना काय निवडुन द्यायचे अशी सगळीकडे चर्चा आहे पण तो विषय याठिकाणी काढायचा नाही. मा.महापौर साहेब, हे जे काही चाललंय ना ते आमच्या भल्यासाठी आहे पण त्यासाठी आम्हांला संपुर्ण शहराला वेठीस धरायचं नाही. माणसाला माणुसकी कुठे तरी असते. चांगल काम केल्यानंतर जनताही विसरत नाही. आणि म्हणुन महापौर साहेब, तुम्हांला सांगते निर्णय बदला एवढीच मी विनंती करते. आज दुपारी १.३० वाजल्यापासून बोलय

आता ४.३० वाजले आहेत ही काय पाण्याच्या विषयावर चर्चा करण्याची पहिली सभा नाही. म्हणुन तुम्ही हा निर्णय बदलावा एवढीच मी तुम्हांला विनंती करते. नाही तर पुढच्या काळामध्ये महापौर साहेब आणि आयुक्तांचही काही खरं नाही. एवढचं सांगते जयहिंद, जयमहाराष्ट्र

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह महापौर साहेब, आजची आपली ही शेवटची सभा आहे. खुप चांगल काम केलेलं असल्यामुळे आपण महापौर म्हणुन या पदावर बसलात मागच्या पंचवार्षीक मधला भांडणाचा अनुभव असल्यामुळे खाली कितीही भांडण झाले तरी तुम्ही तुमचा धीर सोडत नव्हता चांगल्या प्रकारे आपण सभागृह चालविले त्याबद्दल तुमचं मनापासून अभिनंदन करते आणि तुमच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देते. आता मंगलाताई ज्या म्हटल्या त्यावर सिरीयसली विचार करण्याची वेळ आलेली आहे. पुढील निवडणुका या पाण्यावरतीच होणार आहेत आणि ती यासाठी होणार आहे की, गेली अनेक वर्ष त्यावर कुठल्याही प्रकारचं नियोजन न झाल्यामुळे जशी या महापालिकेची स्थापना झाली,ज्यावेळेस ही महापालिका अस्तित्वात आली तेंव्हापासून नियोजन झालेलं नाही. भारतातील सर्वात फास्टेस्ट ग्रोईंग सिटी म्हणुन या शहराची नोंद आहे. दरवर्षी २५ हजार मिळकती या शहरामध्ये वाढत आहेत आणि तरीही त्यावर नियोजन नाही. आणि म्हणुन मंगलाताई म्हणतात त्यामध्ये सुध्दा तथ्य आहे परंतु काळाची पाऊल ओळखून निश्चितपणे आपण योग्य ती पाऊले उचलणार आहात यातलं पहिलं पाऊल उचललं आहे कमिशनर साहेबांनी एक दिवसाआड पाणी देण्याचा जो निर्णय घेतला आहे. जे काही देणार असाल ते चांगल द्या, जास्त वेळ द्या, लोकांच्या तक्रारी येऊ देवु नका, तुमच्या अधिका-यावरती वचक ठेवा,त्यांना कामाला जुंपा,त्यांच्याकडनं काम करुन घ्या ते खरंच जागेवरती आहेत की नाही हे बघा जी काही स्काडा योजना कामाला लावली त्यावेळेस आम्हांला सांगितलं गेलं की, हे तुमच्या मोबाईलवरती दिसणार आहे मी नगरसेविका आहे माझ्या मोबाईल वरती दिसणार की, माझ्या भागातील पाण्याची टाकी किती टक्के भरलेली आहे वॉर्डातली सफाई चालू आहे की नाही, लाईट नसल्यामुळे पाणी येत की नाही असं सगळं आम्हांला स्वप्न दाखवलं स्काडा योजना आणली आम्ही प्रशासनाला कुठंही आडवलं नव्हतं.या सभागृहामध्ये पाण्यासाठी अनेक वेळा आरडाओरड झालेली आहे. आंदोलने झालेली आहेत, रस्त्यावर आंदोलने झालेली आहेत. सगळी नाटकं झालेली आहेत हे सगळं करीत असताना आमची फसवणुकच झालेली आहे. साहेब, आम्ही त्या विषयातले तज्ञचं

नाही,आम्हांला कळतंच नाही. पाणी किती प्रेशरनी येते, किती वेळात टाकी भरते,पाईप भरण्यास किती वेळ लागतो चढावरती पाणी कसं जात, उतारावरती कसं जातं अधिकारी जसं सांगतात तसं आम्ही याठिकाणी पोपटासारखं बोलतो. एका वेळी चढावरती पाणी जात नाही म्हणतात आणि दुस-या वेळेस सांगतात की, पाणी धो-धो वाहतंय आणि आम्ही विचारल्यानंतर सांगतात की, पाईपलाईन भरली म्हणुन पाणी धो-धो वाहत आहे. आम्हां लोकांना पण कळून चुकलेलं आहे की, नगरसेवकांना काही कळत नाही. तुमच्या या निर्णयाचं स्वागत कराव की निषेध कराव या द्विधा मनस्थित आहे. पण चांगल काही तरी करणार यावर विश्वास आहे. आणि म्हणुन तुम्ही जो निर्णय घेतलेला आहे तो पुढे काही तरी चांगल करु शकाल अशा हिशोबानीच घेतलेला आहे. आणि म्हणुन मी तुमच्या पाठीशी उभी रहाते. तुम्ही हे किती दिवस ठेवणार आहात याची एक डेडलाईन देण्यात यावी. उन्हाळा होता त्यावेळेस पाण्याची टंचाई होती हे सगळं आम्ही समजुन घेतल आहे. कोणी तुमच्यावरती नाराज नाही. परंतु आता पाणी असताना सुध्दा  आपण एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचं धोरण आखलेलं आहे पण या आखलेल्या धोरणामुळे लोक म्हणतात की, यावर्षी लोक वाहून गेली तरी सुध्दा तुम्ही लोकांना पाणी देवु शकत नाही का? मग काही ठिकाणी खरंच आपलं पाण्याचं नियोजन चुकतंय का? ज्या अधिका-याच्या भरवशावर इतकी दिवस महापालिकेच्या पाण्याचा गाडा हाकत होता प्रामुख्याने यामध्ये तांबे असतील,लडकत असतील त्यांना आम्ही तज्ञ समजतो. लडकतला तर आम्ही तज्ञच समजतो. आणि मला असं वाटत की, एखादा माणुस चांगला काम करीत असेल  तर आपण त्याच्या पाठीशी उभं राहू ते ही आम्ही बघीतलं आहे. पण हे सगळं करुन यंत्रणा सुधारण्यासाठी खरंच काय प्रयत्न केले आहेत आणि ते प्रयत्न  दिसले पाहिजेत. २४ बाय ७ योजनेला सगळया नगरसेवकांनी त्यावेळेस आम्हांला खरंच काही कळत नव्हतं आणि आजही आम्ही सांगतो की,आम्हांला त्यातल कळत नाही.  तुम्ही सांगितलं योजना चांगली आहे २४ तास पाणी असणार आहे त्यावेळेस दिलीप बंड असतील, श्रीकर परदेशी असतील,आशिष शर्मा असतील जे,जे आयुक्त ते आमच्यापेक्षा जास्त शिकलेले असतात, हुशार असतात त्यांना वेगळं काही तरी करु शकतात यावर आम्ही विश्वास ठेवतो. तुम्ही २४ तास पाणी देणार म्हणुन ही योजना आणली ती योजना आणताना २०१६ साली त्याची वर्कऑर्डर झाली आज ती योजना आणल्यानंतर ती पूर्णपणे कार्यान्वीत होत नाही. अनेक नगरसेवक त्याठिकाणी खोडा घालतात,त्रास देतात जेसीबी लावला नाही तोपर्यंत तर नगरसेवक येऊन थांबतो काम थांबवतो

आणि हे प्रशासनाला सगळयांना माहिती आहे त्याची काय इच्छा आहे हे ही माहिती आहे. याच्यावर आपण कारवाई करीत नाही. मग ही योजना आणली कशाला कोणी आणली हे महत्वाचं नाही. पण ज्या शहरासाठी आणली होती आणि ही योजना जर बंद होत असेल, ते काम अनेक दिवस रखडत असेल तर मग त्या खोडा घालणा-या नगरसेवकांना आपण जे सामाजिक कार्यकर्ते आहेत सामाजिक कार्यकर्त्याच्या नावाखाली जे,जे दादागिरी करतात, काम थांबवतात त्याच्यावर तुम्ही उपाययोजना का करीत नाही. एकदा कोणाबरोबर तरी तुम्हांला भांडण घ्यावच लागेल. आख्ख्या शहराला तुम्ही वेठीस धरलेलं आहे. गटनेत्यांच्याच बैठकीत तुम्ही निर्णय घेतला आहे पाण्याचा प्रश्न हा त्यांच्याच प्रभागात होता का? सगळया नगरसेवकांना ऍटो क्लस्टरला बोलवायला पाहिजे होतं. त्यांच काय मत आहे हे समजुन घ्यायला पाहिजे होतं. ज्यावेळेस तुम्ही एखादा पॉलीसी डिसीजन घेता त्यावेळेस त्या भागातील प्रतिनिधीत्व करणा-या सगळयांचा अधिकार आहे. त्यांच्या माथी तुम्ही काय लादता. आणि ते जर तुम्ही कोणाला माहितीच पडू दिलं नाही. आम्ही तर फक्त पेपरलाच वाचलं तुम्ही जे करता तेच आम्ही पाहतोय. आम्हांला सुध्दा कळतंय पण केवळ तुमचा मान ठेवायचा म्हणुन आम्ही कुठे वादात पडत नाही. तुम्ही निर्णय घेतला आहे ठिक आहे १/२ महिने यासाठी घेतला आहे पण तो कशासाठी घेतला आहे ते सांगा. आणि किती दिवसासाठी घेणार आहात ते सांगा. आणि कायम ठेवणार असाल तर मग २४ बाय ७ योजनेचं काय करणार आहात १५० ते १७५ कोटीचं टेंडर केलेल होतं ते करायचं कारण काय? त्या कामाची मुदत संपलेली आहे आजही ते काम रखडलेलंच आहे ते काम पूर्ण होत नाही. द्या ना त्या कामाला टारगेट, कोण नगरसेवक आडवा आला तर त्याला दंड करा एखादा उघडा पाडा काय फरक पडतो. म्हणजे एक तर काम तरी पूर्ण करा. यात भर म्हणुन की काय मागच्या ८/१० दिवसापुर्वीचा विषय वाचा सगळे पाईप गोळा करुन आणायचे त्याच ८०/८५ लाखाचं टेंडर करतो आहे. म्हणजे तुम्ही ऑलरेडी वर्कऑर्डर दिलेली होती. जिथं पर्याय संपलेले आहेत तिथं १५० ते २०० कोटी रु.वाया गेलेले आहेत ते पाईप सडलेले आहेत अनेक वर्ष पडून आहेत ते उपयोगात येतील किंवा नाही हे माहित नाही पण त्या पाईपची लॅब मधुन टेस्टींग करुन घ्या. आणि याच्यामध्ये जे,जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्याकडुन पैसे वसुल करा. आता ते पाईप गोळा करण्यासाठी टेंडर काढायचं त्या पाईपचं काय लोणचं घालायचं आहे का? आणि हे पाईप कुठं वापरणार आहात तर दुसरीकडे कुठल्या योजनेवर वापरणार असाल तर ज्यांना नव्याने पैसे दिलेले आहेत त्याच काय? नेमकं काय

करायचं बंद पाईपलाईनमधुन पाणी आणायचं, शेतक-यांचा प्रश्न सुटला पाहिजे. निश्चितपणे प्रश्न सुटला पाहिजे. तुम्हांला जे काम करायचं आहे त्याच्यावरती काम करायच्या आधी पाईप गोळा करायचे कशासाठी कोणच उचलून नेत नाही त्याला गोळा करायची घाई कशाला करता ते समजत नाही. आणि का करतोय ते कळत नाही करतोय कशासाठी ते तरी आम्हांला सांगा. खरंच योजना बंद करणार आहात का? मा.महापौर साहेब,आयुक्त साहेब अनधिकृत नळकनेक्शन आपण तोडणार आहात जे अनधिकृत नळकनेक्शन आहेत त्यांच्यावर कारवाई करा किंवा कारवाई करायची असेल जे काही करायचे असेल तुम्हांला ते करा माझी तुम्हांला विनंती आहे की, लोक अनधिकृत बांधकाम अधिकृत करुन घेण्यासाठी येत नाहीत. तुम्ही जा, त्याठिकाणचे स्थानिक नगरसेवक बोलवा,अधिकारी न्या, त्याठिकाणचा सर्व्हे करा आणि एक,एक प्रभाग घ्या ज्यांचे अनधिकृत बांधकाम आहेत त्यांना नोटीसा द्या,लोकांना जागृत करा, लोकांना सांगा, काही तरी सांगा एवढी चांगली योजना आणली त्याचीही वाट लागली. ते ही होत नाही. जर का तुम्ही अनधिकृत नळकनेक्शन तोडलं तर तो काय पाणी पिणार नाही का? तो कोणाच्या तरी घरुन पाणी घेणारच आहे नां, याला पर्याय काय आहे. पर्याय जर चांगला असेल तुम्हांला जे योग्य वाटतं, जे सुटसुटीत वाटतं ते तरी करा. आपण काहीच करीत नाही. अनधिकृत नळकनेक्शन अधिकृत कसे होतील, त्यांनी तर पाणी वापरलेलंच आहे त्यांच्याकडून रेव्हीन्यु कसा जमा येईल यासाठी प्रयत्न करावा. ज्यांना माझं अधिकृत नळकनेक्शन झालं पाहिजे असे वाटते त्यांना तुम्ही अधिकृत करुन घेण्यास सांगा नां. प्रत्येक प्रभागातील ४ नगरसेवकांना बोलवून १/२ महिन्यामध्ये अधिकृत नळकनेक्शन करुन घ्या. जितके अनधिकृत नळकनेक्शन आहेत त्याची यादी तुमच्याकडे आहे त्यांना नोटीसा द्या आणि त्यांना या,या तारखेपर्यंत अधिकृत नळकनेक्शन करुन घेण्यासाठी त्यांना डेडलाईन द्या याच्या उपरही ते आले नाही तर त्यांच्यावर कारवाई करावी. पण आपण म्हणतो त्यांनीच यावं असं होत नाही. कोणी तरी पुढं जावं. जर का वर्षाला २५ हजार मिळकती वाढत असतील आणि वर्षाला १ लाख लोकसंख्या वाढत असेल तर पाण्याचा प्रश्न याच्यापेक्षा जटील होणार आहे. कारण नवीन आपण काहीच करीत नाही. वॉटर युजसाठी आपण काहीच केलेलं नाही आणि वॉटर युजसाठी आपण ज्या,ज्या योजना आणणार म्हणत होतो त्याच्यावर आज कारवाई चालू आहे. मगाशी म्हटले की, आम्ही सगळे बिल्डर लोक एसटीपी चालवितो. किती ठिकाणी एसटीपी चालू आहे बघा बरं. बिल्डींग परमीशनचे सिटी इंजिनियर कुठे गेले आहेत ज्या,ज्याठिकाणी तुम्ही

एसटीपीची पॉवर डेलीगीट केली होती त्याठिकाणी एकही एसटीपी चालू नाही जाऊन बघा तुम्ही,आणि मग त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात. काहीच नाही नां, नुसताच आपण कारवाईचा धडाका लावणार असु तर तेही चालत नाही. तुम्ही चुकीचं करताय असंही आमच म्हणणं नाही.यामध्ये सगळयात महत्वाचं म्हणजे आपण ज्या २४ बाय ७ च्या ज्या लाईन टाकलेल्या आहेत याचे नकाशे आपल्याकडे आहेत. तुमच्या,आमच्या इथं ऑफिसमध्ये वॉटर प्युरीफायर मागवा,वॉटर प्युरीफायर मागवा असे अनेक ऑफिसमध्ये मागवतात. याचे जेवढे कारखाने असतील ते चेक करा आपण त्यांना खरंच पाणी बील हे कर्मशियल दराने लावतो का? ज्याठिकाणी गाडया धुवतात त्याठिकाणची परिस्थिती काय आहे ते बघा माझ्याच वॉर्डामध्ये ५/६ ठिकाणी वॉशिंग सेंटर चालू आहेत. त्याठिकाणी पिण्याचं पाणी वापरतात एका रात्रीत नळकनेक्शन होतं त्यांच्यावर कारवाई करायची म्हणले तर ते ही होत नाही. त्याच्यावर आपण काही तरी कारवाई केली पाहिजे. आणि कारवाई करायची म्हणजे पोलीस कारवाई होईल काही तरी कारवाई करावीच लागेल नां. मा.महापौर साहेब, मा.कमिशनर साहेब एकदा लाईट गेली की, २/३ दिवस पाणीपुरवठा विस्कळीत होतो. तुम्ही समसमान पाणीपुरवठा करताय पण एका लाईनसाठी दुसरीकडचा पाणी पुरवठा विस्क्ळीत करणात आहात का? दुस-या दिवशी पाणी देण्याची वेळ आहे त्याठिकाणी पाणी जाणार नाही. आणि मग विस्कळीतपणा येतो. त्याच्यासाठी काय करता येईल. म्हणजे आपले रावेतला पंपींग स्टेशन आहे त्या पंपींग स्टेशनला आपल्यासाठी २४ तास १२ महिने लाईट गेली नाही पाहिजे. एका मिनीटांसाठी सुध्दा गेली नाही पाहिजे. तर तशी काय यंत्रणा आपल्याला करता येईल का? तुमचे अधिकारी ओळखीचे आहेत, त्यांच्याकडे जा, त्यांना भेटा मग काय करता येईल का ते बघा आणि मग तुम्ही करणार असाल तर आमचे काहीही म्हणणे नाही. जेणेकरुन तुम्हांला या रोषाला बळी पडावं लागणार नाही. काही ठिकाणी रात्री १२ वा., १ वाजता पाणी येत. साहेब, कुठल्याही परिस्थितीत एक हयुमन लिग म्हणुन आपण त्याच्याकडे पाहिलं पाहिजे. त्याच्याकडे लक्ष दिलं पाहिजे किती वाजता पाणी सोडायचं आणि ते आपण पहात नाही आणि म्हणुन त्याच्याकडं सिरीएसली लक्ष देण्याची गरज आहे. आपण एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याच्या संदर्भात आंद्रा धरण, देहुगावचा धरण बांधतोय मला माहित नाही की,त्याला किती दिवस लागणार आहेत. एकीकडे पाणी येणार आणि दुसरीकडे लोकसंख्या वाढणार म्हणजे जे शहर सुजलाम सुफलाम होतं ते पिंपरी चिंचवड शहर एका वेगळया दिशेनं जाणार आहे. कारण याच्यामध्ये नियोजन

नाही. नियोजनाचा अभाव आपण सगळं निर्माण करु शकतो पण पाणी निर्माण करु शकत नाही. सिरीयसली कोणच विचार करीत नाही. नवीन बांधकाम १०० टक्के बंद करता येणार नाहीत. कारण त्यांनी तुमच्याकडे डेव्हलपींग चार्ज भरलेला असतो. कसं बंद करणार सांगा आपल्याकडे फिनिक्सचा मॉल येतोय त्याला कुठून पाणी देणार सांगा. माझी पक्षनेत्यांना विनंती आहे की, तुम्ही जो काही निर्णय घेतलेला आहे तो पूर्णविचाराअंती घेतलेला असेल त्यावर आम्ही विश्वास ठेवतो पण या पाण्यासाठी तुम्ही हे करणार असाल तर अधिका-यांनाही सक्त ताकीद द्यावी आणि कायमस्वरुपी असंच ठेवणार असाल तर तशी मानसिकता नागरीकांची आणि नगरसेवकांची पण करा. आणि कुठं चुकतंय याच्यावर एकदा रेट्रीफाईड करा. अधिका-यांना विनंती आहे की, नवीन काही करता येईल का ते बघा जुने जे लोक रिटायर्ड होऊन गेलेले आहेत ते ही बघा त्यांना खुप गोष्टी माहिती होत्या. मला मान्य आहे की,२००७ ला जी लोकसंख्या होती ती २०१९ ला वर्षाला एक लाख म्हणजे १० वर्षात १० लाख लोकसंख्या म्हणजे जवळपास १३ लाखांनी लोकसंख्या वाढलेली आहे. त्यामुळे नियोजन हे कोलमडणारच आहे पण तरीही त्यातल्या त्यात आपल्याला किती चांगल करता येईल याच्याकडे लक्ष द्या जास्त पैसे असल्यानंतर उधळल्यानंतर संपत असतात पण पाणी जास्त आहे आणि ते उधळणार असाल तर ते सुध्दा संपणार आहे याचं भान आम्हांला आहे म्हणुन आम्ही तुमच्या बरोबर काही अंशी तुमच्याबरोबर आहोत. काही अंशी हा शब्द परत एकदा यासाठी वापरते की, याच्यावरती तुम्ही जर योग्य नियोजन नाही केलं तर लोकांच्या रोषाला आम्हांला बळी पडावं लागणार आहे मगाशी मंगलाताई म्हणल्या की, आमच्यासाठी चांगलंच आहे तसं जर म्हटलं तर राजकीयदृष्टया ते योग्यच आहे. कारण पुढचं इलेक्शन हे फक्त पाण्यावरतीच होणार आहे. आणि पाणीटंचाई ही कृत्रीम आहे. हे मी आज नाही बोलत गेली अनेक दिवसापासून बोलत आहे. ही कृत्रिम पाणी टंचाई आहे ती मुद्यामहून केली जात आहे. मुद्यामहून पाण्याची वेळ कमी जास्त केली जात आहे. जो वॉल्व्ह आहे त्याच्या आटया वेगळया प्रकारे फिरवल्या जातात काही नगरसेवक दांडगाई करतात. काही लोक दांडक घेऊन बसतात. इंद्रायणीनगर भागातील पाणी वेगळया भागामध्ये घेऊन जातात. नेलं नाही पाहिजे असं नाही ज्यांच्यासाठी टाक्या बांधलेल्या आहेत तशा टाक्या त्या त्या भागात सुध्दा बांधण्याचा प्रयत्न करावा. आणि त्या त्या भागातील नागरीकांसाठी त्या त्या नगरसेवकांनी टाक्या बांधण्याचा प्रयत्न करावा. कारण त्यांना त्या भागातील नागरीकानी लोकप्रतिनिधी म्हणुन निवडुन दिलेल आहे. परंतु त्यांच्यासाठी तुम्ही

दुस-या ठिकाणचं पाणी हे देणार असाल आणि त्या दादागिरीला प्रशासन जर बळी पडतं असेल तर गाठ आमच्याशी सुध्दा आहे. आणि मग इलेक्शन जसं त्यांच आहे तसं आमचं पण आहे. आम्ही पण काय गप्प बसणा-यापैकी नाही. आमच्याकडंच पाणी पळवून दुसरीकडे नेणार असाल तर आम्ही सुध्दा रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. ज्या भागात टाक्या आहेत त्या भागातील नागरीकांची गरज ओळखून आपण टाक्याचं बांधकाम करतो. तुमच्या भागात तुमच्या अधिका-यांना सांगा. प्रत्येक वॉर्डातले नगरसेवक असतात. एखादया वॉर्डात पाईपलाईनचं काम असेल,टाकीचं काम असेल तर त्या वॉर्डातील चारही नगरसेवकांना विचारा. सांगा, विचारा की, ताई असं,असं ठरतंय करु का? करता येईल का? सकाळी १० वा.सांगणार ११ वाजता उद्घघाटन आहे हे बंद करा. त्यांना समजुन सांगा नगरसेवक विरोधी पक्षाचा असला तरी त्याला मान द्या लोकांनी निवडुन दिला आहे त्याचं मान राखणं तुमचं काम आहे. त्यामुळे त्याच्याकडे लक्ष द्या मा.महापौर,मा.पक्षनेते असतील या सभागृहाचे पदाधिकारी असतील आणि सगळयांना आपल्याला विनंती असणार आहे एकदा कमिशनर साहेबांनी निर्णय घेतलेला आहे १/२ महिने काय करतात ते बघु. तुमचं काय मत आहे ते ऐकु द्या,बघु द्या त्याच्यावर काय अंमलबजावणी होते कारण आम्ही तुमच्या बरोबरच आहोत तुम्ही या शहरासाठी काही तरी चांगलच करणार म्हणुन आम्ही तुमच्या सोबत आहोतच आणि जी काही सोशल मिडीया तुमच्याबद्दल वाईट बोलतात ऐकुण पण सहन होत नाही त्याच्यावर देखील आपण सिरीयसली विचार करावा. आणि चांगल काय करता येईल याचा आपण निश्चित विचार करावा. तुम्ही जे काही करणार आहात त्याची डेडलाईन ठरवून द्यावी एक दिवसाआड पाणी किती दिवस देणार आहात. आणि रेग्युलर देवु शकणार नसाल तर डायरेक्ट सांगा. लोकसंख्या इतक्या पटीने वाढलेली आहे आज पाणी इतके उचलतो यापेक्षा जास्त परवानगी घेतली नाही असं म्हणण्यापेक्षा मागणी केलेली नाही किंवा पुढच्या ३० वर्षापर्यंत आपण इतकंच पाणी उचलू शकतो असंच राहणार आहे आणि असंच मी करणार आहे माझ्याकडे पर्याय नाही असं ठणकावून सांगा तुम्हाला २/४ दिवस लोक वाईट बोलतील पण हळूहळू स्विकारायला लागतील. कारण चांगल काही करायला आणल तर स्विकारायला वेळ लागतो. आणि निश्चितपणे या शहराची जनता हुशार आहे की, आपल्याला निश्चितपणे वेळ देईल. याबाबतीत माझ्या मनात मात्र तिळमात्र शंका नाही. परत एकदा सांगते आपण एक दिवसाआड केलेल्या पाणीपुरवठयासाठी पाठींबा देत पण तो कधीपर्यंत असणार आहे आणि करु शकत नसाल तर एकदा त्यांच्याकडनं

विचारुन घ्या. नसल तर जे आहे ते तर स्विकारावं लागेल. नवीन बांधकाम तुम्ही रोखू शकत नाही. अनधिकृत नळकनेक्शन तुम्ही कितीही मनात आणलं तरी तोडू शकत नाही. कारण तुम्ही आजपर्यंत अनधिकृत नळकनेक्शनच्या बाबतीत एकही पाऊल उचललेलं नाही. तुम्हांलाच उचलावं लागणार आहे त्यांचे जे अनधिकृत नळकनेक्शन आहेत ते अधिकृत करुन घ्या. जे काही कर्मशियल पाणी वापरतात,इंडस्ट्रीयल मध्ये वापरतात त्यांच काय म्हणणं आहे ते ऐकुण घ्या आणि खरंच चोरुन पाणी वापरतात की, काय हे बघा आणि वापरत असेल तर कनेक्शन तोडून टाका आम्ही अजिबात पाठीशी घालणार नाही. आम्ही तुमच्या बरोबर थांबू पण बदनामी होत आहे म्हणुन आम्ही तुमच्या पाठीवरचा हात काढणार नाही. आम्ही तुमच्या बरोबर थांबणार आहोत. पण तुम्हांला जो काही निर्णय घ्यायचा असेल त्या निर्णयावर ठाम रहा.धन्यवाद.

**मा. बापु उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह गेली ३.३० तास या पाणीपुरवठयावर चर्चा चालू आहे. या पाण्यामुळे शहरातील राजकारण पेटलेलं आहे. गेल्या अडीच वर्षामध्ये सभागृहामध्ये जास्तीत जास्त पाण्याच्या विषयावर चर्चा झालेली आहे. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट बद्दल बोलले असेल,कधी नागरीकांच्या प्रश्नाबद्दल बोलले गेले असेल, अनधिकृत बांधकामाबद्दल बोलले असेल,शिक्षण विषय असेल, क्रीडा विषय असेल त्याच्यावर देखील कधी चर्चा झालेली नाही. कारण हा एकदम महत्वाचा प्रश्न आहे. याच्यामध्ये आतापर्यंत तरी मागच्या वेळेस पण सत्ताधारी होते,आता पण सत्ताधारी आहेत हा विषय नाही. याला सर्वस्वी जबाबदार पाणीपुरवठा विभाग आहे. हे तर तुम्हांला मान्य करावंच लागेल. गेली ४ महिने आम्ही सगळे सदस्य या विषयावर वारंवार चर्चा करीत आहोत. प्रत्येक वेळेस सांगितलं गेलं की, नगरसेवकांना घ्या त्यांची एक कमिटी तयार करण्यात यावी त्यांच्यापर्यंत काही गोष्टी तुम्ही मांडणार काही बदल होत नाही आपल्याकडे बरेचसे अधिकारी असे आहेत की, आपण जर त्यांना म्हणले आमच्याकडे पाणीपुरवठा चांगला करा तर पाणीपुरवठयाच्या कुठल्याही अधिका-याने निर्णय घेतलेला नाही. यामध्ये आपण निर्णय घेतला पाहिजे. मागच्या वेळेस आपण काय निर्णय घेतला होता की,बांधकाम परवानगी विभागातील काही डेप्युटी इंजिनियर, जे.ई. स्थापत्य विभागाचे काही अधिकारी यांना पाणीपुरवठा विभागामध्ये घेण्यात यावे पण असं झालेलं नाही. आपण काल जो निर्णय घेतलेला आहे शहरात पाणी टंचाई नाही पाणीपुरवठयाचे इक्वल डिस्ट्रीब्युशन होत नाही म्हणुन तुम्ही हा निर्णय घेतलेला आहे. आम्ही तुम्हांला पूर्ण पाठींबा दिलेला आहे.

महापौर साहेब, पाणीपुरवठयाची परिस्थिती ही दोन महिन्यात सुधारली पाहिजे. नाही तर आम्ही विषय तुमच्याकडे मांडतोय लोकांनाही वाटतंय की, धरण १०० टक्के भरलेलं आहे त्यामुळे पाणी कपात होणार नाही. नगरसेवकांनी तुम्हांला सांगण्यापेक्षा अधिका-यांनी याचा अभ्यास करावा. याच्यामध्ये तुम्ही ब-याचशा चुका सांगितलेल्या आहेत. साहेब, आजपर्यंतची अनधिकृत बांधकाम असतील, नळकनेक्श असतील, कुठल्या नगरसेवकांनी सांगितल आहे की, कारवाई करु नका म्हणुन ज्याठिकाणी इललिगल कनेक्शन घेतो, कुठलाही व्यक्ती ५०० स्के.फुटाचा बांधकाम करीत असेल तर तो त्याचा मॅप कशाला आणुन देतो. यामध्ये कुठल्या जे.ई.डेप्युटीवर तुम्ही कारवाई केली. शहरात कितीही पाणी आलं तरी काही होणार नाही माझ्या माहितीप्रमाणे काल तुम्ही सांगितले आहे की, ५१ हजार कनेक्शन असे आहेत की, ज्या कुटूंबाला ५४० लिटर पाणी पाहिजे असेल तर त्याला १५०० लिटर पाणी मिळतयं आणि ते कुटूंब तुमच्यापर्यंत येत नाही. हे जर तुम्हांला माहित असेल तर तुम्ही का कारवाई केली नाही.आता तुम्ही दोन महिने दिवसाआड पाणी सोडणार आहात यानंतर तुम्ही अधिका-यावर काय कारवाई करणार आहात. आम्ही अधिका-यांना अतिक्रमणवर कारवाई होणार का अस म्हणल्यानंतर अधिकारी म्हणतात की, पोलिस यंत्रणा नाही, गाडी नाही असं म्हणल्यानंतर तुम्ही काय ऍक्शन घेणार साहेब, माझी आपल्याला एक सूचना आहे की, आपण स्थापत्य विभाग असेल, ड्रेनेज विभाग असेल, बांधकाम परवानगीचे अधिकारी असतील त्यांना आपण ऍडीशनल चार्ज म्हणुन पाणीपुरवठयाचा दिला पाहिजे. जोपर्यंत मुबलक पाणीपुरवठा होणार नाही तोपर्यंत त्यांना सोडू नका. मा.महापौर साहेब, माझ्या काही सूचना आहेत गेली ४ महिन्यापुर्वी तुम्ही हेच सांगितलं होत त्याच्यामध्ये काही बदल झालेला नाही. तुम्ही निकम साहेबांना, तांबे साहेबांना विचारा एक महिन्यापासून सकाळी ७ ते ८ पर्यंत ते कधीच फोन घेत नाहीत. एक तर दुपारी १२ ते १२.३० पर्यंत झोपेतच असतात त्यानंतर फोन घ्यायचे. साहेब यांना काम करायचं नसेल तर यांना घरी बसवा. यामध्ये खरंच बदल हवा असेल तर दोन महिन्यात हा प्रॉब्लेम सोडवावा लागेल. याच्यानंतर तुम्हांला जे करायचं आहे ते करा या शहराचा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे तो पाण्याचा याच्यामध्ये तुम्ही आम्हांला काही आश्वासन दिलेले आहेत त्यामुळे खूप बदल होतील असे वाटत नाही. माझ्या माहितीप्रमाणे गेल्या अडीच वर्षामध्ये एकाही अधिका-यावर कारवाई केलेली नाही. प्रत्येक वेळेस ते तुम्हांला काही तरी सांगतात आणि आम्हांला काही तरी अडचणी सांगतात आपल्या काही अधिका-यांना वॉल सुध्दा माहित नाहीत. आता

याबाबतीत मला काही खोलात जायचं नाही ते तुम्हांला माहिती आहे.त्याबाबतीत तुम्हांला भरपूर माहिती आहे. मंगलाताईंनी सांगितले की, धरणात ४० टक्के पाणी असताना सुध्दा कधी पाणी कपात केलेली नाही. हा सत्ताधारी आणि विरोधकाचा विषय नाही. हा सगळयांचा विषय आहे. शहराला मुबलक पाणी मिळालं पाहिजे, नागरीकांना पाणी मिळालं पाहिजे. यासाठी तुम्हांला जी काही मदत लागेल त्यासाठी आख्खं सभागृह तुमच्या बरोबर आहे. आणि मग यामध्ये अनधिकृत बांधकाम असतील, अनधिकृत नळकनेक्शन असेल याच्यावर कारवाई करावी. आयुक्त साहेब आम्ही तुम्हांला २ महिन्याचा अवधी देतो या दोन महिन्यामध्ये परिस्थिती सुधारणेत यावी धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आयुक्त साहेब मगाशी आम्ही सांगितले की, आम्ही तुमच्या बरोबर आहे. परंतु आमच्या दापोडीच्या एवढयाशा छोटया विषयावर बोलायच नसतयं परंतु सांगतेय माझ्या दापोडीमध्ये एकच टाकी आहे खाली संपात पाणी येऊन वर पीकअप होऊन पाणी टाकतो. ही आमची दिवसभराची यंत्रणा चालू आहे. तुमच्याकडचं आता सुध्दा एकावेळचं पाणी येणं सुध्दा ऍटोमेटीक बंद झालं काय झालं माहित नाही. आणि नंतर लाईट गेली पण आम्ही काय केलं पाहिजे. त्याठिकाणी जनरेटर बसवायला पाहिजे. जनरेटर बसवा म्हणुन नगरसेवकांनी पत्र द्यायला पाहिजे का? तिथं आधी संपवेल तयार करा म्हणुन आम्ही सांगायचं का? संपवेल तयार केल्यानंतर त्याठिकाणी पाणी साठा तयार होईल. या दोन गोष्टीसाठी जर तुम्हांला टाकी बांधता नाही आली तरी चालेल कारण टाकीसाठी पाणी पाहिजे परंतु दापोडीसाठी त्वरीत नियोजन कसं करता येईल यासाठी प्रयत्न करावा यासाठी विनंती करते. आणि पुढच्या ८ दिवसांमध्ये दापोडीचे दोन्ही विषय विचारात घेऊन संपवावे.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, महापौर साहेब खरं तर तुमचं अभिनंदन करतो की, तुम्ही महापौर झाल्यापासून खुप चांगल्या पध्दतीने सभागृहाचं कामकाज चालविले आहे. शहरातील सर्व प्रश्नांना आपण न्याय दिलेला आहे. कुठं तरी मी तुम्हांला मतदान केल्याचं सार्थक झालं याच समाधान वाटते. परंतु तुम्ही जाता,जाता जो निर्णय घेतलेला आहे त्यामुळे या शहरातील जनता नक्कीच खुष नसणार आहे. कुठं तरी सर्वसामान्य नागरीकांचा नक्कीच विचार केला पाहिजे. आज शहरामध्ये जर का तुम्ही पाहिलं तर सर्वांनी तेच सांगितलेलं आहे त्यामुळे परत तेच,तेच बोलण्यात काय अर्थ नाही. पण कुठं तरी नगरसेवकांच म्हणणं ऐकुण घ्या नां आपले सगळे मित्र आहेत आणि प्रमुख

नेते म्हणुन आपण ज्या खुर्चीवर बसलेले आहात या सर्व गोष्टीचा विचार करुन नक्कीच आयुक्त साहेबांनी जो काल निर्णय दिलेला आहे तो निर्णय मागे घेण्याची गरज आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशी आहे की, काल जेंव्हा तुम्ही सर्व गटनेत्यांची बैठक बोलावली त्यावेळेस मला अस वाटलं की, हृस्यातून एक दिवस पाणी बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे तो निर्णय मागे घेतला असेल असे वाटले होते. परंतु तुम्ही आम्हांला सांगितलं की, परत एक दिवसाआड पाणीपुरवठा करणार आहे सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशी आहे की, दूरदृष्टी असताना ज्यावेळेस पवना बंद जलवाहिनीचं काम चालू झालं होतं मी माजी महापौर नितीन काळजे आप्पा यांचे अभिनंदन करीन की,त्यांनी जी गोष्ट झाली नाही ती ॲक्सेप्ट केली. मी तुम्हांला नक्कीच सांगू इच्छितो की, जेंव्हा आपण नगरसेवक झालो तेंव्हापासून भविष्यामध्ये पाणीटंचाई होणार आहे याविषयी तुम्ही संबंधित अधिका-या बरोबर एक मिटींग घेऊन त्यावर काय उपाययोजना करता येईल याबाबतीत आपण कधीच काही सांगितलेलं नाही आज आपल्या अक्षरशा गळयाला फास लागला त्यानंतर आपण मिटींग घेतली आहे आणि ती मिटींग दोन वेळा कॉल केली पहिल्यांदा मिटींग कॉल केली त्यावेळेस सांगितलं की, पाणी टंचाईला सामोरे जाताना आपण कपात करु  कालच्या मिटींगमध्ये आयुक्तांनी सांगितलं की, दोन महिने आगोदर कपात करावी लागेल. त्याच कारण असं की, थंडीच वातावरण चांगलं असल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होईल. आणि पुढं आपल्याला पाणी टंचाईला सामोर न जाता आपल्याला पाणी सेव्हींग करणं खुप गरजेचं आहे. आयुक्त साहेबांच जर म्हणणं असेल तर आम्हांला ही गोष्ट मान्य नाही. शहरातील सर्व नागरीकांना दररोज व्यवस्थित पाणी देणं आणि ते शुध्द देणं हे आपले कर्तव्य आहे. आपण दरमहा लाईट बिलं भरतो दर महिन्याला जरा इकडचं तिकडं झाल आणि बिल दिलं नाही  तर त्याचं कनेक्शन कट करतात.सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशी आहे की, येणा-या दिवसामध्ये लवकरात लवकर त्यावर काम करणं गरजेचं आहे. माझी आपल्याला सूचना आहे की, तुम्ही रोज पाणी द्या, भले दोन तास पाणी द्या पण दररोज पाणी द्या. याच कारण असं आहे की, एक दिवसाआड पाणी केलं आणि परत दुस-या दिवशी तो पाणीपुरवठा ५/६ तास ठेवला त्याऐवजी  दररोज पाणी दिलं तर काय फरक पडणार आहे. धरण व्यवस्थित भरलेलं असताना सुध्दा नागरीकांमध्ये चर्चा आहे की, नगरसेवकांनी पाणी कपात केलेली आहे  सत्ताधारी पक्षाचे अथवा विरोधी पक्षाचे नगरसेवक असु द्या. पाणी कपात म्हणजे काय सोशल मिडीया असो की, आजच्या पेपरला बघा सगळयांनी विरोध केलेला आहे.  आज मला

तुमच्याकडुन निर्णय पाहिजे आजच्या आज पाणी कपातीचा निर्णय मागे घ्याल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आणि या शहरावासियांच्या वतीने चांगला निर्णय घ्या. एवढंच सांगतो जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आयुक्त साहेब जेंव्हा आपण बोलत होता तेंव्हा सांगितलं की, शहराला चांगला पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी आहे. दुस-या बाजुला आपण ४८० एमएलडी पाणी उचलतो. आपली मागणी ३०० एमएलडी आहे म्हणजे आपण आजही या शहराला लागणा-या गरजेपेक्षा १५० एमएलडी पाणी जास्त उचलतो. असं असताना आपण हे किती दिवस करायचं साहेब, तुम्ही पण याचे आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. तुम्ही सर्व गटनेत्याची बैठक बोलावली सकाळी निरोप आला मला एका ठिकाणी जायचं असल्यामुळे मला या बैठकीला येता आलं नाही आणि मी त्या बैठकीला असतो तर विरोध केला असता आणि आजही विरोध करतो. साहेब, वेगवेगळे प्रयोग करण्याचे आता दिवस नाहीत. ज्यावेळेस पाणी टंचाई होती त्यावेळेस आम्ही तुमच्या बरोबर होतो. कारण त्यावेळेस पाणी कमी होतं म्हणुन दिवसाआड पाणीपुरवठा करीत होतो.तुम्हीच सांगत आहात की, पाणी टंचाई आहे म्हणुन हे करीत नाही तर समसमान पाणीपुरवठा करण्याच्या नावाखाली दिवसाआड पाणीपुरवठा करीत आहात. हे असले प्रयोग करण्याचं थांबवावं भरपूर प्रयत्न केलेले आहेत आता आपण ठोस निर्णयावर यावे. आणि महापौर साहेब, त्यांनी जे निर्णय घेतलेले आहेत तसे आपण पण आपल्या पध्दतीने निर्णय घेतले पाहिजेत नां आयुक्तांनी निर्णय घेतला की, आपण सगळे हां म्हणतोय म्हणजे साहेब, तुमचे अधिकारी तुम्हांला मिसगाईड करतात, तुम्ही आम्हांला करता आणि आम्ही जनतेला करतो. अशा प्रकारचं वातावरण या शहरामध्ये आहे. पण पाणी भरपूर आहे पाऊस धो,धो पडतोय लोक वाहून जातात. मगाशी मंगलाताईंनी सांगितलं आहे की, डस्टबिन देण्याची निविदा रद्य केली आहे त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद द्यायला पाहिजे. परंतु आता तुम्ही ही निवीदा काढा द्या ५ हजार लिटरच्या टाक्या सर्वांना काढा याचं टेंडर आपण या शहरात किती प्रयोग पाहिलेले आहेत दोन टाईम पाणी देत होतो तिथं एक टाईम पाण्यावर आलं आणि आता दिवसाआड पाणी देण्याचे नियोजन आहे. एका बाजुला तुम्ही म्हणताय की, ज्याप्रमाणे बांधकाम व्यावसायिक हजारो कोटी महापालिकेला भरतो ज्या दिवशी बांधकाम सुरु होते ५/५ वर्षानी पझेशन मिळतंय आज तो तुम्हांला पैसे देतोय आज पण तुम्ही त्याला पाणी देत नाही. म्हणजे शहरात एवढे प्रश्न पडलेले आहेत आणि दुस-या बाजुला तुम्ही म्हणताय की, तीन गोष्टी आहेत

एक गळती, दुसरी चोरी आणि अनधिकृत वापर. अनधिकृत वापर असेल तर तुम्ही काय म्हणताय  इललिगल बांधकाम आहे, टॅक्स भरलेले आहेत आणि गळतीला तुम्ही सांगताय की, नागरिकांना बरोबर घेऊन आव्हान करायचं म्हणताय साहेब, आम्ही अडीच वर्षापासून गळती,गळती हे ऐकतोय. ही नक्की गळती कसली आहे. यामध्ये आम्हां सगळयांना शंका येत आहे कोणी तरी तुमच्या खांदयावर बंदुक ठेवत आहे. एका बाजुला म्हणायचं इललिगल बांधकामांना परवानगी देऊ नका आणि दुस-या बाजुला म्हणायचं इललिगलचं नळकनेक्शन तोडा दुस-या बाजुला म्हणताय विहीर,बोअरवेल ताब्यात घ्या  ही कुठली पध्दत आहे. धरणात पाणी आहे, आताच्या दृष्टीने पाण्याची कुठलीही टंचाईची परिस्थिती नाही ही परिस्थिती का तर समसमान पाणी डिस्ट्रीब्युशनच्या नावाखाली तुम्ही हे करीत आहात. ४ महिन्यापुर्वी सांगितलं होतं की, धरणांत पाणी नाही. आज नांव काय देताय इक्वल डिस्ट्रीब्यूशन साहेब, या शहरातील जनता एवढी पण मुर्ख नाही  तुम्ही जे नियोजन करीत आहात त्याला आमच्या शिवसेनेतर्फे पूर्णपणे विरोध आहे. तुम्ही सांगताय रावेतमधुन ॲडीशनल पाणी उचलायचं, दुसरीकडे तुम्ही आंद्रा धरणाचं सांगताय, आता तुम्ही भामा आसखेड सांगताय. जसं आता अंबादास कांबळे यांनी सांगितले आहे की, नको आम्हांला ५००,६०० कोटीचे टेंडर काढू नका. आम्हांला पाण्याची गरज नाही तर उपसूचना आल्यानंतर करायला पाहिजे. एवढी धमकी मिळाली तरी त्यांचा आवाज दबला नाही. का आवाज दबला नाही तर नागरीकांना उत्तर दयायचे आहे. वॉर्डात गेल्यानंतर नागरीकांना सांगायचं आहे पाणी देवु शकत नाही. नागरीक म्हणतात पाणीही देत नाही आणि तिकडं जाऊन तोंडही उघडत नाही. संदीपनंही सांगितलं तुम्हांला चांगल्या सूचना केल्या तर त्या तुम्ही घ्या नां. मंगलाताईनी ५ हजार लिटरच्या टाक्या नागरीकांना देण्याची केलेली सूचना अंमलात आणू. आयुक्त साहेब,तुम्ही पाणी कपातीचा निर्णया या शहरावर लादू नका. म्हणजे जेवढे प्रयोग करायचे होते तेवढे करुन झालेले आहेत. आता कुठं तरी थांबवा. आणि अधिका-यांवर कंट्रोल ठेवा. तुम्ही निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अधिका-याची  आहे. म्हणजे तुम्ही एक निर्णय घेणार आणि अधिकारी एक निर्णय घेणार ही काय पध्दत आहे.आयुक्त साहेब,एका पत्राचं उत्तर दयायला तुम्हांला १०/१० दिवस  लागतात. मी तुम्हांला  साधा प्रश्न विचारला होता  चार ओळीचं पत्र होतं कोणाकडे चार्ज होता याचं अजुन  उत्तर दिलं नाही.  आता निकम साहेब म्हणतात तुमच्या सहीला पत्र ठेवलं आहे म्हणतात. ते म्हणतात त्यांच्याकडे चार्ज होता, ते म्हणतात यांच्याकडे चार्ज होता. म्हणजे साहेब, तुम्ही कुठं तरी

रिमोट कंट्रोलवरती थांबा. तुम्ही तुमच्या बुध्दीनं काम करावं अशी आमची अपेक्षा आहे. तुम्हांला वाटल पाहिजे तुम्ही निर्णय घ्यावा आम्हांला काय वाटतयं तुम्ही निर्णय घ्यायचा नाही. आम्हांला काय कळत नाही का? आम्ही काय खेळायला येत नाही इथं म्हणजे साहेब,तुम्ही तुमचा निर्णय घ्या. तुम्ही प्रशासक आणि प्रशासन अधिकारी घ्या ना तुम्ही निर्णय तुम्हांला कोणी अडवलय अडीच,अडीच वर्ष आपण एक निर्णय घेवु शकत नाही. ज्या दिवशीपासून महापालिका ताब्यात आहे त्या दिवसापासून पाण्यावरती चर्चा चालू आहे. आणि अजुनही पाण्यावरती जीबी चालू आहे. महापौर साहेब,माझी तुम्हांला विनंती आहे की, तुम्ही घेतलेला निर्णय रद्द करावा जो निर्णय घेतलेला आहे त्यावर ठाम रहावं या शहरात कोणावरही अन्याय नको आहे. आणि तुम्ही घेतलेल्या निर्णया बरोबर आम्ही नाही. आमच्या त्या निर्णयाला विरोध आहे असे सांगतो.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह काल जरी सर्व गटनेत्यांची मिटींग घेतली असली तरी हा रोष पहाता सर्व नगरसेवकांना आपआपल्या वॉर्डात ज्या समस्येला फेस करावे लागत आहे ते आता तुमच्या समोर जवळपास २ ते २.३० तास चर्चा चालू आहे. काल जो निर्णय झालेला आहे त्याला आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे विरोध करीत आहोत. मी आपल्याला दोन महिन्यापुर्वी निवेदन दिलं होतं की,आपण जन सभेचे आयोजन करुन सर्व नागरीकांच्या किंवा नगरसेवकांच्या भावना समजून घ्या. आपल्याला भविष्यातील पाण्याचे नियोजन करणे गरजेचं आहे. याच्यावरती आपली एकही सभा झालेली नाही. आम्ही जे निवेदन दिलेलं आहे ते फक्त नामधारी दिलं का? तुमचा प्रशासनावर अंकुश नाही का? तुमचं अधिकारी ऐकत नाहीत का? धरणांमध्ये पाणी असताना देखील आपण नागरीकांना पाणी देवु शकत नाही. नक्की काय प्रॉब्लेम आहे. जाणुन बूजुन ही कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे का? म्हणजे नक्की काय चाललंय म्हणजे नक्की कोण कोणाला फसवतंय आम्ही का नागरीकांचा रोष घ्यायचा. तुमचं जर अधिकारी ऐकत नसतील तर त्यांच निलंबन करा, त्यांच्या बदल्या करा कारण याबाबतीत नियोजन होणं गरजेच आहे. रात्रं असो की,पहाट असो लोक तक्रार करण्याचं थांबत नाहीत. रेग्युलर फोन चालू आहे गढुळ पाण्याच्या सुध्दा तक्रारी आहेत. आणि काही भागामध्ये चार,चार दिवस पाणीच जात नाही. आता काल परवा माई काटे असेल, अप्पा काटे असतील सर्व मंडळी तुमच्याकडे आली होती. दापोडी भागामध्ये पाणी येत नाही ही समस्या आपण का सोडवू शकत नाही. धरणांत पाणी असताना सुध्दा काय अडचण आहे. तांबे

साहेबांना विचारल्यानंतर ते वेगळंच उत्तर देतात. निकम साहेब म्हणतात पाणी पुरवठा सुरळीत होईल. कधी होणार आहे. तुम्हांला याच्यावर जो काही निर्णय घ्यायचा आहे तो योग्य निर्णय घ्यावा. रोज पाणीपुरवठा करणेत यावा अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करतो.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह गेली चार तासापासून या विषयावर चर्चा करीत आहोत. आणि पाण्याच्या संदर्भातील या सभागृहामध्ये ही चर्चा गेल्या अडीच वर्षामधली ही ७ ते ८ वेळा झालेली आहे. आणि सगळे जण मी किती चांगला वक्ता आहे, मी किती विरोध करु शकतो, मी किती चांगलं बोलू शकतो अशा पध्दतीचं भाषण हे पाण्याच्या संदर्भात सगळेजण करतात. आणि कधी,कधी सगळया सन्माननीयांनी म्हणजे कुठल्या पक्षाचा असं मी म्हणणार नाही. धरण भरलंय पण आम्हांला पाणी देत नाही. अशी भावना व्यक्त केली. खरं आहे, पण उचलण्याची व्यवस्था का केली नाही. पाणी उचलायचं,त्याचं शुध्दीकरण करायच आणि लोकांना द्यायचं हे सगळं करायला पाहिजे नां आपण सरळ म्हणतो धरण भरलंय ना. अरे,धरण भरलंय ना बाबा पण आणुन द्यायची कोण व्यवस्था करणार आणि ज्यावेळेस एखादा आरोप करतो म्हणजे पाण्याच्या प्रश्नावर पुढची निवडणुक होण्याची शक्यता आहे की काय, ही कृत्रिम टंचाई आहे की काय असे म्हणले आहे. खरंतर आपण एखादा निर्णय करत असतो खरंतर माझी पहिल्यापासून मागच्या २/३ जीबीच्या माध्यमातून या शहरातील पाण्याच्या प्रश्नावर चर्चा झाली. मी हात जोडून विनंती केली की, पाण्याच्या प्रश्नावर कुठल्याही राजकीय पक्षान राजकारण करता कामा नये. परंतु सगळयांनाच राजकारण करायचं आहे सगळीकडे सत्तेची गणितं बदलली की, आम्ही कशा पध्दतीनं बोलू शकतो अशा पध्दतीच्या अविर्भावामध्ये भाषणं करतात. खरं तर पाण्याच्या संदर्भामध्ये सर्व सन्मा.सदस्य करीत असतात. पण पाण्याच्या प्रश्नावर सगळया पक्षांनी एकत्रित येऊन पुढच्या २५/३० वर्षाचं नियोजन का करत नाही. याच्यावर खरंतर या सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. ज्यावेळेस आपण अशा पध्दतीचा विचार करतो की, पुढील २५ वर्षाच नियोजन केलं पाहिजे. पाण्याच्या प्रश्नावर आपण भामा आसखेडचं काय करतोय हे गेल्या २५/३० वर्षापुर्वीचा जर का आपण विचार केला तर खरंतर या शहरावरती आज ही परिस्थिती का निर्माण झाली. आपल्या शहरासाठी मुबलक पाणी साठा वाढविण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. पवना जलवाहिनीच्या संदर्भामधुन दुसरे पर्याय आपल्यासमोर होते. ताई सांगत होत्या की, २४ बाय ७ ही योजना २००५ सालापासूनची आहे म्हणजे १४ वर्षाच्या काळात

नाही झाली, आता ही योजना झाली नाही म्हणुन आपण करायचीच नाही का? खरंतर याची कल्पना आपल्या सगळयांना आहे. हे अधिकारी काय करतात, प्रशासन काय करते यासंदर्भात खरंतर मला जायचं नाही. प्रशासनानं त्यांच काम निश्चित केलं पाहिजे. काही अधिकारी त्या विभागामध्ये काम करीत नाहीत.पण त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. पण एखादी गोष्ट कधी,कधी शहरवासियांच्या संदर्भामध्ये पुढच्या १० वर्षाचा विचार करायचा आहे कधी,कधी कटु निर्णय घेण्याची गरज आहे. आपल्याला माहिती आहे की, पाण्याच्या प्रश्नावर एवढे सगळे नगरसेवक बोलले आहेत ते माझ्याच याच्यावर बोलले आहेत. अशा परिस्थितीत तो नगरसेवक बोलला की, तो चुकीच्या पध्दतीने बोलला म्हणजे पाण्याची समस्या तिथल्या वॉर्डामध्ये राहील. पाण्याची समस्या आहे म्हणुनच आपण हा कटु निर्णय घेत आहोत. म्हणजे एखादया निर्णयाच्या संदर्भामध्ये कमिशनरसाहेबांच्या संदर्भात टिका करायची,महापौरांवर करायची सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक म्हणुन किंवा पदाधिकारी म्हणुन ही आनंदाची गोष्ट आहे का ही एक दिवसाआड पाणी करतोय ही काय आनंदाची गोष्ट आहे का? पण कधी,कधी या शहरवासियांना खरं बोलण्याची गरज आहे. आम्ही पुढच्या २५ वर्षाचं पाण्याच नियोजन करु शकलो नाही. म्हणुन आज आपल्या सगळयावर ही वेळ आलेली आहे. आपल्याला पुढील २५/३०वर्ष लोकांना फसवायचं नसेल,आपण लोकांना सांगायची गरज आहे की,आपल्याला पुढच्या काळामध्ये पाण्याची समस्या सोडवण्यासाठी भामा आसखेड तुमचं जरी असलं काका तरी भामा आसखेडचं भूमीपुजन आम्ही केलं आहे

**( गोंधळ )**

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, पाण्याच्या संदर्भात तुम्ही राजकारण करु नका पुढच्या २५/३० वर्षाचं पुढच्या नियोजन करायचं नाही, खोट बोलायच आणि या शहरावासियांची फसवणुक करायची. पवना जलवाहिनीच्या संदर्भातील प्रश्न असेल, भामा आसखेडच्या संदर्भातील प्रश्न असेल या शहरवासियांना मुबलक पाणी देण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करतो आहे. कमिशनर साहेब आम्ही तुमच्या मागं आहे आम्हांला शहरवासियांना फसवायचं नाही, तुम्ही जो निर्णय घेतला आहे दोन महिन्याच्या काळामध्ये किती अनधिकृत नळकनेक्शन आहेत,किती अनधिकृत बांधकामांना नळकनेक्शन दिलेले आहेत वॉशिंग सेंटर असतील, हॉटेल असतील अशा अनेक ठिकाणावर किती कारवाया केलेल्या आहेत पुढच्या महासभेच्या वेळेस आम्हांला अहवाल द्या की आम्ही ५० ठिकाणावर कारवाया केल्या, एवढया पोलीस कम्पलेन केले,यानंतर ठेकेदाराच्या माध्यमातून पाणी चोरुन वापरतात त्या पध्दतीनं

प्लॅनिंग करण्याची गरज आहे. खरं तर ज्या पध्दतीनं मागच्या काही जनरल बॉडीच्या आधी आपण सांगितलं होतं की, स्थापत्य विभागाच्या अधिका-यांना पाणीपुरवठयाच्या अधिका-या बरोबर जोडून दिले जाईल.

**( गोंधळ )**

**मा.एकनाथ पवार –** पाणीपुरवठा विभागामध्ये काम करणारे अधिकारी असतील तर अशा अधिका-यां बरोबर सुध्दा आम्ही काम करु. माझी या सन्मा.सभागृहाला विनंती आहे की, पाण्याच्या प्रश्नावर राजकारण करु नका, पाण्यासाठी पुढच्या २५/३० वर्षासाठी काही नियोजन करायचं असेल तर राजकारण करु नका. एका बाजुला आपण म्हणायचं की, लोकसंख्या वाढत आहे त्याप्रमाणात पाणी दिलं पाहिजे. भामा-आसखेडचं पाणी आल्यानंतर ज्यावेळेस आपण बांधकाम व्यवसाय करतो तोपर्यंत पाणी देण्याची जबाबदारी आहे. आणि बांधकाम झाल्यानंतर त्या लोकांना आपल्याला पाणी पुरवठा करावयाचा आहे.

**( गोंधळ )**

**मा.महापौर** – ताई तुम्ही खाली बसा, विषय चालू झाल्यानंतर बोला.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की,कुठल्याही दबावाला बळी न पडता याठिकाणी प्रशानाने जो निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयाच्या बरोबर आपण राहू आपण पुढच्या काळामध्ये लोकांमध्ये जनजागृती करुन पाणी जपुन वापरा आणि म्हणुन आपण या निर्णयाच्या बरोबर असण्याची गरज आहे. महापौर साहेब, आपण पाण्याच्या संदर्भात जास्त चर्चा न करता आपली ही शेवटची सभा आहे मला अपेक्षित होतं एखादा महापौर त्याच्या सव्वा वर्षाच्या कालावधीमध्ये चांगले कामकाज करतो त्याच्याबद्दल गौरव उदगार काढले पाहिजे. कधी कधी एक चांगला महापौर चांगल्या पध्दतीनं काम केलं आहे त्यावर १/२ तास चर्चा व्हायला पाहिजे होती. मा.महापौर साहेब, तुमच्या या सव्वा वर्षाच्या कालावधीच्या कामकाजाबद्दल खुप,खुप अभिनंदन करतो. आणि मला खात्री आहे की, आज एक सर्वसामान्य कुटूंबातील कार्यकर्ता आज या शहराचं नेतृत्व करतो आहे त्याचा आम्हांला अभिमान आहे मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, ज्या पध्दतीनं दोन महिन्यापर्यंत आपण या एक दिवसाआड पाणीपुरवठा करतोय याच्याबद्दल कमिशनर साहेबांनी सांगितलं आहे की, या,या गोष्टी आम्ही करणार आहोत हे आपण सभागृहाच्या पटलावर मांडाव एवढी विनंती करतो आणि थांबतो. जयहिंद जयमहाराष्ट्र.

**( गोंधळ )**

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक- २०/११/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पअक/५/कावि/१४८/२०१९दि.२९/०५/२०१९

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५१ दि.१२/०६/२०१९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२९ दि.७/९/२०१९

४) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५६ दि.२०/९/२०१९

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालयतर्फे "बांधकाम साहित्य व राडारोडा यांच्यातील टाकाऊ घटकाच्या विल्हेवाट लावणे" या नियम २०१६ नुसार [C & D Waste Management Rule 2016] महानगरपालिकेने व्यवस्थापकाची जबाबदारी पार पाडावयाची आहे. पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालयाच्या नियमांनुसार महानगरपालिकेने सदर यंत्रणेसाठी उपविधी [By laws] मंजूर करून सदर व्यवस्थापन खर्च राडारोडा निर्माण कर्त्याकडून वसूल करणे प्रस्तावित आहे. तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून बांधकाम राडारोडयाचा पुर्नवापर करण्याच्या व टाकाऊ वस्तूचे प्रमाण कमी करण्या-या बांधकाम व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सवलती व सूट देणे याकरिता महानगरपालिकेतर्फे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

पूर्वपिठीका: भारत देशातील बांधकाम व्यवसायाचा वृद्धी दर वार्षिक ७-८ टक्के आहे. पुढील वर्षात नीती आयोगाच्या अनुमानानुसार सध्याच्या बांधकामाच्या तिप्पट गृहनिर्माण प्रकल्प, रस्ते, व्यावसायिक व संस्थात्मक आस्थापना व मुलभूत सुविधा प्रकल्प भारतात प्रस्तावित आहेत. या प्रकल्पातून वाळू, खडी, दगड, चुनखडी, माती यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या प्रकल्पाच्या बांधकाम साहित्यातून निर्माण होणा-या राडारोड्यातून अनेक संसाधानाचे वर्गीकरण करून पुर्नवापर केला जाऊ शकतो. यासाठी दिल्ली व अहमदाबाद येथे पथदर्शी प्रकल्प गेली ५ ते ६ वर्षापासून कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील व आजूबाजूच्या

परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकाम प्रकल्प कार्यरत आहेत. शहरांतर्गत अनेक विकास प्रकल्पाचे बांधकाम शासन व महानगरपालिकेतर्फे व खाजगी स्वरुपात केले जात आहेत. शहरातील मध्यम वर्गामध्ये सातत्याने गृह दुरुस्ती करिता व सुधारणा करिता घरा अंतर्गत बांधकाम साहित्यांचा वापर होत आहे. सद्यस्थितीत शहरात सदर टाकाऊ बांधकाम साहित्य नदी, नाले, ओढे, तळे इत्यादींच्या काठावर व इतर ठिकाणी अयोग्य पद्धतीने टाकण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक स्त्रोतांचे प्रदूषण होत आहे. तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्या मुळे नागरिकांना त्याचा त्रास होऊन अनारोग्य परिस्थिती निर्माण होते.

उद्दिष्ट: Construction and Demolition Waste Management Rule 2016 नुसार शहरात निर्माण होणा-या बांधकामाचा राडारोडा सुयोग्य पद्धतीने गोळा करून त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे. शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियेतून वेगळ्या झालेल्या बांधकाम संसाधानाचा पुर्नवापर महानगरपालिकेतर्फे केल्या जाणा-या बांधकाम प्रकल्पामध्ये करणे तसेच खाजगी प्रकल्पामध्ये सदर साहित्याचा पुर्नवापर करणेसाठी प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे.

कृती आराखडा: १. शहरातील बांधकाम साहित्य वापर करण्या-या सर्व व्यावसायिक कंत्राटदार व नागरिक यांना पर्यावरण मंत्रालयातर्फे बांधकाम व दुरूस्ती निष्कासनातून निर्माण होणा-या राडारोड्याच्या महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम अंतर्गत भाग १८ तील २९०,२९१,२९२,२९३नियम बंधनकारक असतील. २. बांधकाम व दुरूस्ती मधून निर्माण होणा-या राडारोडा व्यवस्थापनासाठी राडारोडा निर्मितीदाराचे वर्गीकरण पुढील प्रमाणेआहे.

श्रेणी क्र.१ : i शासनाच्या व महानगरपालिकेतर्फे नेमणूक केलेले कंत्राटदारामार्फत विविध विकासकामातून निर्माण होणारा राडारोडा. : ii खाजगी बांधकाम व्यावसायिक, संस्था व नागरिकांकडून करणेत येणारी बांधकामे ज्यांना महानगरपालिकेतर्फे खाजगी बांधकामासाठी प्राधिकृत वा परवानगी वितरीत बांधकामातून निर्माण होणारा राडारोडा. श्रेणी क्र.२ : i शासनाची व महानगरपालिकेची परवानगी आवश्यक नसलेले कोणतीही घरगुती आस्थापना अंतर्गत, संस्था अंतर्गत बांधकाम व दुरुस्ती श्रेणी १ मध्ये अंतर्गत समाविष्ट नसलेले सर्व घटक : ii मनपा किंवा कोणत्याही प्राधिका-याकडून परवानगी न घेता करणेत येणा-या बांधकामामधून निर्माण होणारा राडारोडा.

श्रेणी क्र.१ अंतर्गत येणा-या घटकांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित असेल.

१. शासकीय/निमशासकीय विभागाच्या विविध विभागामार्फत किंवा महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून कार्यादेश वितरीत झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत अथवा आपत्कालीन परिस्थितीत काम सुरु केल्या नंतर तीन दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडे कामाचे स्वरूपानुसार निर्माण होणारे राडारोडाच्या अंदाजित प्रमाण व प्रकार कामाचे ठिकाण विहित नमुन्यात शासकीय/ निमशासकीय किंवा मनपाच्या संबधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकां-यांकडून प्रमाणित करून सादर करावे. सदर राडारोडा ५०० किलो पेक्षा जास्त असल्यास आवश्यक कंटेनरची संख्या निश्चित करून अंदाजित प्रक्रिया व वाहतूक खर्च तसेच महानगरपालिकेतर्फे साठवणूक कंटेनरसाठी आवश्यक ठेव रक्कम निश्चित करण्यात येईल.

२. राडारोडाचे दैनिक प्रमाण जास्त नसल्यास निर्मितीदार स्वतःचे कंटेनर वापरू शकतात व महानगरपालिकेच्या कॉल सेंटर मधिल यंत्रणाना राडारोडा उचलण्यासाठी संपर्क करू शकतात. महानगरपालिकेच्या यंत्रणांना टोल फ्रि क्रमांकावर राडारोडा उचलण्यासाठी संपर्क केल्यानंतर त्वरीत राडारोडा उचलण्याची व्यवस्था मनपाने नेमलेल्या कंपनीतर्फे करेल परंतु कोणत्याही परिस्थितीत राडारोडा नैसर्गिक जमिनीवर किंवा रस्त्यावर व इतरत्र टाकता येणार नाही याची जबाबदारी सबंधित संस्थावर व नागरिकांवर राहील.

३. अंदाजित प्रक्रीया खर्चाच्या कमीतकमी २५ टक्के रक्कम व साठवणूक कंटेनरकरिता ठेव रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल. श्रेणी १ मध्ये येणा-या महानगरपालिकेच्या कंत्राटदाराच्या वतीने संबधित विभागाचे अधिकारी विभागाचा Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात.

४. सध्या अस्तिवात असलेल्या राडारोडाच्या व अनाधिकृत बांधकामाच्या राडारोड्याच्या वहनासाठी व प्रक्रिया करण्यासाठी प्रभाग प्रमुखांना Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात. या करिता छायाचित्रसहित केलेली कार्यवाही व राडारोडा अंदाजित प्रमाण यांची नोंद करणे आवश्यक असेल.

५. महानगरपालिकेतर्फे राडारोडा व्यवस्थापनासाठी निर्माण करण्यात येणा-या मोबाईल ॲप व संकेतस्थळा मध्ये Login व Password संबधित संस्था यांना अग्रीम रक्कम जमा झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

६. सदर अॅप व संकेत स्थळावर अंदाजित राडारोडाचे प्रमाण व जमा अग्रिम रक्कम खात्यामध्ये दिसेल.

७. सदर संस्थाने कंटेनर भरल्यानंतर अथवा सदर संस्थेने संपर्क केल्यानंतर राडारोडा उचलण्यासाठी वाहन पाठविले जाईल. सदर वाहनातील संगणक यंत्रणेव्दारे उचलण्यात आलेला राडारोडा त्याचे छायाचित्र व त्यांचे वजन तसेच सदर साठी आकारण्यात येणारी रक्कम महानगरपालिकेच्या समन्वय कक्षाकडे व मोबाईल अॅप वर दोन्ही कडून नोंदवण्यात येईल व अग्रिम रक्कमेतून वजावट करण्यात येईल.

८. राडारोडा उचलण्यात येण्यासाठी मोबाईल अॅपमधील शिल्लक रक्कम हि अंदाजित प्रमाणाच्या ५% पेक्षा जास्त असणे आवश्यक राहील.

९. सदर रक्कम ५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेने तात्काळ पुढील २५% टक्के भरणा करणे आवश्यक राहील.

श्रेणी २ अंतर्गत येणा-या घटकांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. श्रेणी २ अंतर्गत घटकांनी जमा झालेला राडारोडा, गनी बॅगमध्ये भरणे आवश्यक राहील. श्रेणी २ अंतर्गत सदर राडारोडा महानगरपालिकेच्या मोशी येथील Construction & Demolition पर्यंत स्वखर्चाने नेऊन देऊ शकतात. अथवा महानगरपालिकेच्या राडारोडा व्यवस्थापन केंद्रास टोल फ्रि क्रमांकावर संपर्क करून राडारोड्यासाठी वाहन Pickup साठी बोलवू शकतात.

२. राडारोडा मनपाच्या नजीकच्या ट्रान्स्फर स्टेशन पर्यंत नेल्यास श्रेणी १ व २ मधील घटकांना ट्रान्स्फर स्टेशन येथे वजनाप्रमाणे शुल्क भरणा करावा लागेल. सर्व श्रेणीसाठी पुढीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन शुल्क आकारणे प्रस्तावित आहे. राडारोडा गोळा करणे. श्रेणी १ व २ बांधकाम राडारोडा उचलणे व मोशी राडारोडा प्रक्रिया केंद्रापर्यंत वहन खर्च र.रु.१५/- प्रति किमी/प्रतिटन राडारोड्यावर प्रक्रिया करणे. श्रेणी १ व २ बांधकामराडारोडा प्रक्रिया शुल्क. रक्कम रुपये. २५०/- प्रति टन

नियम बाह्य राडारोडा व्यवस्थापनाकरिता दंड :-

१. वरीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन यंत्रणाशी संपर्क न करता अथवा अनधिकृत राडारोडा टाकणा-या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक, कंत्राटदार, नागरिक व इतर घटकावर टाकलेल्या राडारोडाच्या वाहनासाठी व प्रक्रियेसाठी येणा-या खर्चाच्या

१० पट शुल्क अधिक वहन व प्रक्रिया खर्च वसूल करण्यात येईल. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन २०१६ व C & D Waste Management Rule 2016 च्या अधिनियमनुसार कार्यवाहीस पात्र राहतील.

२. वरीलप्रमाणे कोणत्याही श्रेणीमधील घटकाने नैसर्गिक, नदी, नाले, ओढे, इत्यादी जलस्त्रोतांच्या बाजूने विनापरवाना राडारोडा टाकलेचे निदर्शनास आल्यास, तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून १० पट दंडाची रक्कम तसेच त्यांचेवर फौजदारी गुन्हा मनपाच्या वतीने दाखल करणेत येईल.

राडारोडा पासून पुनर्निर्मित घटकाच्या वापरास प्रोत्साहन :-

१. (i) प्रक्रियायुक्त राडारोडा वापरणा-या बांधकाम व्यवसायिकांना प्रोत्साहन देण्याकरिता बांधकाममध्ये ग्रीन बिल्डींग रेटींग अंतर्गत GRIHA किंवा LEED प्रमाणपत्र घेणा-या बांधकाम प्रकल्पांना मालमत्ता करामध्ये प्रचलित नियमानूसार जास्तीत जास्त ५% सूट तसेच मोठ्या प्रकल्पामध्ये (Large Development) अथवा परवडणा-या (Affordable Housing) (GRIHA) गृहा मानांकननुसार प्रकल्पामध्ये चार स्टार व पाच स्टार प्रकल्पामध्ये गृह प्रमाणपत्र अथवा (Leed) लीड प्रमाणपत्रामध्ये Platinum अथवा गोल्ड दर्जा प्रमाणपत्र मिळवलेल्या प्रकल्पांना मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाकडील ग्रीन बिल्डींग रेटींगच्या योजनेनूसार प्रचलित सुट देय राहील.

(ii) प्रक्रियायुक्त राडारोड्यापासून निर्माण झालेल्या बांधकाम साहित्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणा-या बांधकाम व्यवसायिक किंवा, खाजगी नागरिकांना तसेच शासकीय /निमशासकीय/मनपाच्या ठेकेदारांना सदरचे साहित्य त्या-त्या वर्षाच्या चालू बाजारभावापेक्षा २०% कमी दराने उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सींवर बंधनकारक राहील.

२. महानगरपालिकेतर्फे करण्यात येणा-या सर्व स्थापत्य, कामामध्ये राडारोड्यावर प्रक्रिया करून बनविलेल्या बांधकाम साहित्याचा वापर M२० grade पर्यंत Non structural भागासाठी वापर करणे बंधनकारक राहील त्यासाठी मनपाच्या शहर अभियंता कार्यालयाने आवश्यक साहित्याची मागणी प्रक्रिया केंद्राला तीन महिने आगाऊ पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे

माध्यमातून कळविणे आवश्यक आहे. सदर स्थापत्य विषयक बाबींचे प्रत्येक वर्षीचे दर, स्थापत्य विभागामार्फत शहर अभियंता कार्यालयाकडून दरपृथ्थकरणाव्दारे निश्चित करणेत येतील. तसेच बाजार भावातील अशाच बाबींच्या दरापेक्षा सुमारे २०% कमी दराने सदरचे साहित्य मनपाच्या विविध विकास कामासाठी उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील. त्याचा वापर मनपाच्या विविध विकास कामामध्ये आवश्यकतेनूसार करणेची दक्षता स्थापत्य/उद्यान/ड्रेनेज/ पाणीपुरवठा इत्यादी विभागांकडून घेणेसाठी अशा बाबींचा समावेश निविदेमध्ये स्वतंत्रपणे करणेत येईल.

३. यामध्ये प्रामुख्याने पेव्हर ब्लॉक, कर्ब स्टोन, चेंबर्स कव्हर, ट्रि गार्ड, युटीलीटी डक्ट व इतर आवश्यकते प्रमाणे निर्माण होऊ शकणारे नाविन्यपूर्ण प्रिकास्ट प्रॉडक्टसचा समावेश असेल. या व्यतिरिक्त विविध विकास कामांसाठी लागणारे कच्चे साहित्य उदा. दगड, खडी, विटा, वाळू, माती इत्यादी सह रस्त्यासाठी लागणारा भराव, GSB, Wet - Mix इत्यादी विविध बांधकाम साहीत्याचा वापर मनपाच्या विविध विभागाकडील ठेकेदारांमार्फत करणेसाठीची कार्यप्रणाली शहर अभियंता कार्यालयाकडून निश्चित करणेत येईल. त्यानुसार याचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील निर्माण होणा-या बांधकामाच्या राडारोड्याचे Construction and Demolition Waste Management Rule 2016 चे नियमानूसार वहन करुन त्याचेवर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्यापासून निर्माण होणा-या विविध Precast Product बांधकाम साहित्याचा पूर्ण वापर मनपाच्या व इतर खाजगी बांधकामामध्ये करणेच्या धोरणास [C & D Waste Policy] मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड मनपाचा वर्ग १ व २ च्या अत्यावश्यक सेवेतील पदांचा आकृतिबंध नुकताच शासनाने मंजूर केलेला आहे. अगोदरच मनपामध्ये अधिकारी/कर्मचा-यांची कमतरता असून सद्यस्थितीत अनेक अधिका-यांकडे एकापेक्षा अनेक विभागाचा अतिरिक्त पदभार सोपविलेला आहे. महापालिकेची वाढणारी लोकसंख्या व त्या प्रमाणात नागरी सेवेवर वाढणारा ताण विचारात घेता शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार तातडीने पात्रताधारक अधिका-यानां पदोन्नती देणेची कार्यवाही

प्रशासनाने तातडीने करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शासन मान्य आकृतिबंधानुसार आस्थापनेवर सहशहर अभियंता, पर्यावरण या अभिनामाचे एक पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. या पदासाठी निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या कालावधी इत्यादी अटीनुसार सद्यस्थितीत या पदासाठी श्री.संजय नारायण कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पर्यावरण हे पात्र होत असल्याने त्यांना सहशहर अभियंता, पर्यावरण या शासनमान्य पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी त्याचप्रमाणे या पदाचे नियंत्रणाखाली पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, जलनिस्सारण विभाग, उदयान (स्थापत्य) विभाग इत्यादी पर्यावरण संवर्धन विषयक विभागांचे नियंत्रण सोपविणेस मान्यता देणेत यावी. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता या ठरावाची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ४६९ विषय क्रमांक – १

दिनांक- २०/११/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पअक/५/कावि/१४८/२०१९दि.२९/०५/२०१९

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.४८५१ दि.१२/०६/२०१९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२९ दि.७/९/२०१९

४) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५६ दि.२०/९/२०१९

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालयतर्फे "बांधकाम साहित्य व राडारोडा यांच्यातील टाकाऊ घटकाच्या विल्हेवाट लावणे" या नियम २०१६ नुसार [C & D Waste Management Rule 2016] महानगरपालिकेने व्यवस्थापकाची जबाबदारी पार पाडावयाची आहे. पर्यावरण, वन हवामान बदल मंत्रालयाच्या नियमांनुसार महानगरपालिकेने सदर यंत्रणेसाठी उपविधी [By laws] मंजूर करून सदर व्यवस्थापन खर्च राडारोडा निर्माण कर्त्याकडून वसूल करणे प्रस्तावित आहे. तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून बांधकाम राडारोडयाचा पुर्नवापर

करण्याच्या व टाकाऊ वस्तूचे प्रमाण कमी करण्या-या बांधकाम व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सवलती व सूट देणे याकरिता महानगरपालिकेतर्फे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

पूर्वपिठीका: भारत देशातील बांधकाम व्यवसायाचा वृद्धी दर वार्षिक ७-८ टक्के आहे. पुढील वर्षात नीती आयोगाच्या अनुमानानुसार सध्याच्या बांधकामाच्या तिप्पट गृहनिर्माण प्रकल्प, रस्ते, व्यावसायिक व संस्थात्मक आस्थापना व मुलभूत सुविधा प्रकल्प भारतात प्रस्तावित आहेत. या प्रकल्पातून वाळू, खडी, दगड, चुनखडी, माती यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या प्रकल्पाच्या बांधकाम साहित्यातून निर्माण होणा-या राडारोड्यातून अनेक संसाधानाचे वर्गीकरण करून पुर्नवापर केला जाऊ शकतो. यासाठी दिल्ली व अहमदाबाद येथे पथदर्शी प्रकल्प गेली ५ ते ६ वर्षापासून कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील व आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकाम प्रकल्प कार्यरत आहेत. शहरांतर्गत अनेक विकास प्रकल्पाचे बांधकाम शासन व महानगरपालिकेतर्फे व खाजगी स्वरुपात केले जात आहेत. शहरातील मध्यम वर्गामध्ये सातत्याने गृह दुरूस्ती करिता व सुधारणा करिता घरा अंतर्गत बांधकाम साहित्यांचा वापर होत आहे. सद्यस्थितीत शहरात सदर टाकाऊ बांधकाम साहित्य नदी, नाले, ओढे, तळे इत्यादींच्या काठावर व इतर ठिकाणी अयोग्य पद्धतीने टाकण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक स्त्रोतांचे प्रदूषण होत आहे. तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्या मुळे नागरिकांना त्याचा त्रास होऊन अनारोग्य परिस्थिती निर्माण होते.

उद्दिष्ट: Construction and Demolition Waste Management Rule 2016 नुसार शहरात निर्माण होणा-या बांधकामाचा राडारोडा सुयोग्य पद्धतीने गोळा करून त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे. शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियेतून वेगळ्या झालेल्या बांधकाम संसाधानाचा पुर्नवापर महानगरपालिकेतर्फे केल्या जाणा-या बांधकाम प्रकल्पामध्ये करणे तसेच खाजगी प्रकल्पामध्ये सदर साहित्याचा पुर्नवापर करणेसाठी प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे.

कृती आराखडा: १. शहरातील बांधकाम साहित्य वापर करण्या-या सर्व व्यावसायिक कंत्राटदार व नागरिक यांना पर्यावरण मंत्रालयातर्फे बांधकाम व दुरूस्ती निष्कासनातून निर्माण होणा-या राडारोड्याच्या महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम अंतर्गत भाग १८ तील २९०,२९१,२९२,२९३नियम बंधनकारक असतील.

२. बांधकाम व दुरूस्ती मधून निर्माण होणा-या राडारोडा व्यवस्थापनासाठी राडारोडा निर्मितीदाराचे वर्गीकरण पुढील प्रमाणेआहे.

श्रेणी क्र.१ : i शासनाच्या व महानगरपालिकेतर्फे नेमणूक केलेले कंत्राटदारामार्फत विविध विकासकामातून निर्माण होणारा राडारोडा. : ii खाजगी बांधकाम व्यावसायिक, संस्था व नागरिकांकडून करणेत येणारी बांधकामे ज्यांना महानगरपालिकेतर्फे खाजगी बांधकामासाठी प्राधिकृत वा परवानगी वितरीत बांधकामातून निर्माण होणारा राडारोडा. श्रेणी क्र.२ : i शासनाची व महानगरपालिकेची परवानगी आवश्यक नसलेले कोणतीही घरगुती आस्थापना अंतर्गत, संस्था अंतर्गत बांधकाम व दुरुस्ती श्रेणी १ मध्ये अंतर्गत समाविष्ट नसलेले सर्व घटक : ii मनपा किंवा कोणत्याही प्राधिका-याकडून परवानगी न घेता करणेत येणा-या बांधकामामधून निर्माण होणारा राडारोडा.

श्रेणी क्र.१ अंतर्गत येणा-या घटकांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित असेल.

१. शासकीय/निमशासकीय विभागाच्या विविध विभागामार्फत किंवा महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून कार्यादेश वितरीत झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत अथवा आपत्कालीन परिस्थितीत काम सुरु केल्या नंतर तीन दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडे कामाचे स्वरूपानुसार निर्माण होणारे राडारोडाच्या अंदाजित प्रमाण व प्रकार कामाचे ठिकाण विहित नमुन्यात शासकीय/ निमशासकीय किंवा मनपाच्या संबधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकां-यांकडून प्रमाणित करून सादर करावे. सदर राडारोडा ५०० किलो पेक्षा जास्त असल्यास आवश्यक कंटेनरची संख्या निश्चित करून अंदाजित प्रक्रिया व वाहतूक खर्च तसेच महानगरपालिकेतर्फे साठवणूक कंटेनरसाठी आवश्यक ठेव रक्कम निश्चित करण्यात येईल.

२. राडारोडाचे दैनिक प्रमाण जास्त नसल्यास निर्मितीदार स्वतःचे कंटेनर वापरू शकतात व महानगरपालिकेच्या कॉल सेंटर मधिल यंत्रणाना राडारोडा उचलण्यासाठी संपर्क करू शकतात. महानगरपालिकेच्या यंत्रणांना टोल फ्रि क्रमांकावर राडारोडा उचलण्यासाठी संपर्क केल्यानंतर त्वरीत राडारोडा उचलण्याची व्यवस्था मनपाने नेमलेल्या कंपनीतर्फे करेल परंतु कोणत्याही परिस्थितीत राडारोडा नैसर्गिक जमिनीवर किंवा रस्त्यावर व इतरत्र टाकता येणार नाही याची जबाबदारी सबंधित संस्थावर व नागरिकांवर राहील.

३. अंदाजित प्रक्रीया खर्चाच्या कमीतकमी २५ टक्के रक्कम व साठवणूक कंटेनरकरिता ठेव रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल. श्रेणी १ मध्ये येणा-या महानगरपालिकेच्या कंत्राटदाराच्या वतीने संबधित विभागाचे अधिकारी विभागाचा Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात.

४. सध्या अस्तिवात असलेल्या राडारोडाच्या व अनाधिकृत बांधकामाच्या राडारोड्याच्या वहनासाठी व प्रक्रिया करण्यासाठी प्रभाग प्रमुखांना Login व Password वापरून क्रेडीट निर्माण करू शकतात. या करिता छायाचित्रसहित केलेली कार्यवाही व राडारोडा अंदाजित प्रमाण यांची नोंद करणे आवश्यक असेल.

५. महानगरपालिकेतर्फे राडारोडा व्यवस्थापनासाठी निर्माण करण्यात येणा-या मोबाईल ॲप व संकेतस्थळा मध्ये Login व Password संबधित संस्था यांना अग्रीम रक्कम जमा झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

६. सदर ॲप व संकेत स्थळावर अंदाजित राडारोडाचे प्रमाण व जमा अग्रिम रक्कम खात्यामध्ये दिसेल.

७. सदर संस्थाने कंटेनर भरल्यानंतर अथवा सदर संस्थेने संपर्क केल्यानंतर राडारोडा उचलण्यासाठी वाहन पाठविले जाईल. सदर वाहनातील संगणक यंत्रणेव्दारे उचलण्यात आलेला राडारोडा त्याचे छायाचित्र व त्यांचे वजन तसेच सदर साठी आकारण्यात येणारी रक्कम महानगरपालिकेच्या समन्वय कक्षाकडे व मोबाईल ॲप वर दोन्ही कडून नोंदवण्यात येईल व अग्रिम रक्कमेतून वजावट करण्यात येईल.

८. राडारोडा उचलण्यात येण्यासाठी मोबाईल ॲपमधील शिल्लक रक्कम हि अंदाजित प्रमाणाच्या ५% पेक्षा जास्त असणे आवश्यक राहील.

९. सदर रक्कम ५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेने तात्काळ पुढील २५% टक्के भरणा करणे आवश्यक राहील.

श्रेणी २ अंतर्गत येणा-या घटकांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. श्रेणी २ अंतर्गत घटकांनी जमा झालेला राडारोडा, गनी बॅगमध्ये भरणे आवश्यक राहील. श्रेणी २ अंतर्गत सदर राडारोडा महानगरपालिकेच्या मोशी येथील Construction & Demolition पर्यंत स्वखर्चाने नेऊन देऊ शकतात. अथवा महानगरपालिकेच्या राडारोडा व्यवस्थापन केंद्रास टोल फ्रि क्रमांकावर संपर्क करून राडारोड्यासाठी वाहन Pickup साठी बोलवू शकतात.

२. राडारोडा मनपाच्या नजीकच्या ट्रान्स्फर स्टेशन पर्यंत नेल्यास श्रेणी १ व २ मधील घटकांना ट्रान्स्फर स्टेशन येथे वजनाप्रमाणे शुल्क भरणा करावा लागेल. सर्व श्रेणीसाठी पुढीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन शुल्क आकारणे प्रस्तावित आहे. राडारोडा गोळा करणे. श्रेणी १ व २ बांधकाम राडारोडा उचलणे व मोशी राडारोडा प्रक्रिया केंद्रापर्यंत वहन खर्च र.रु.१५/- प्रति किमी/प्रतिटन राडारोड्यावर प्रक्रिया करणे. श्रेणी १ व २ बांधकामराडारोडा प्रक्रिया शुल्क. रक्कम रुपये. २५०/- प्रति टन

नियम बाह्य राडारोडा व्यवस्थापनाकरिता दंड :-

१. वरीलप्रमाणे राडारोडा व्यवस्थापन यंत्रणाशी संपर्क न करता अथवा अनधिकृत राडारोडा टाकणा-या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक, कंत्राटदार, नागरिक व इतर घटकावर टाकलेल्या राडारोडाच्या वाहनासाठी व प्रक्रियेसाठी येणा-या खर्चाच्या १० पट शुल्क अधिक वहन व प्रक्रिया खर्च वसूल करण्यात येईल. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन २०१६ व C & D Waste Management Rule 2016 च्या अधिनियमनुसार कार्यवाहीस पात्र राहतील.

२. वरीलप्रमाणे कोणत्याही श्रेणीमधील घटकाने नैसर्गिक, नदी, नाले, ओढे, इत्यादी जलस्त्रोतांच्या बाजूने विनापरवाना राडारोडा टाकलेचे निदर्शनास आल्यास, तसेच पदपथ, मोकळ्या आणि अडगळीच्या जागा इत्यादी ठिकाणी अनाधिकृत व अयोग्यरितीने टाकाऊ बांधकाम साहित्य टाकल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून १० पट दंडाची रक्कम तसेच त्यांचेवर फौजदारी गुन्हा मनपाच्या वतीने दाखल करणेत येईल.

राडारोडा पासून पुनर्निर्मित घटकाच्या वापरास प्रोत्साहन :-

१. (i) प्रक्रियायुक्त राडारोडा वापरणा-या बांधकाम व्यवसायिकांना प्रोत्साहन देण्याकरिता बांधकाममध्ये ग्रीन बिल्डींग रेटींग अंतर्गत GRIHA किंवा LEED प्रमाणपत्र घेणा-या बांधकाम प्रकल्पांना मालमत्ता करामध्ये प्रचलित नियमानूसार जास्तीत जास्त ५% सूट तसेच मोठ्या प्रकल्पामध्ये (Large Development) अथवा परवडणा-या (Affordable Housing) (GRIHA) गृहा मानांकननुसार प्रकल्पामध्ये चार स्टार व पाच स्टार प्रकल्पामध्ये गृह प्रमाणपत्र अथवा (Leed) लीड प्रमाणपत्रामध्ये Platinum अथवा गोल्ड दर्जा प्रमाणपत्र

मिळवलेल्या प्रकल्पांना मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाकडील ग्रीन बिल्डींग रेटींगच्या योजनेनूसार प्रचलित सुट देय राहील.

(ii) प्रक्रियायुक्त राडारोड्यापासून निर्माण झालेल्या बांधकाम साहित्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणा-या बांधकाम व्यवसायिक किंवा, खाजगी नागरिकांना तसेच शासकीय /निमशासकीय/मनपाच्या ठेकेदारांना सदरचे साहित्य त्या-त्या वर्षाच्या चालू बाजारभावापेक्षा २०% कमी दराने उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सींवर बंधनकारक राहील.

२. महानगरपालिकेतर्फे करण्यात येणा-या सर्व स्थापत्य, कामामध्ये राडारोड्यावर प्रक्रिया करून बनविलेल्या बांधकाम साहित्याचा वापर M२० grade पर्यंत Non structural भागासाठी वापर करणे बंधनकारक राहील त्यासाठी मनपाच्या शहर अभियंता कार्यालयाने आवश्यक साहित्याची मागणी प्रक्रिया केंद्राला तीन महिने आगाऊ पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे माध्यमातून कळविणे आवश्यक आहे. सदर स्थापत्य विषयक बाबींचे प्रत्येक वर्षीचे दर, स्थापत्य विभागामार्फत शहर अभियंता कार्यालयाकडून दरपृथ्थकरणाव्दारे निश्चित करणेत येतील. तसेच बाजार भावातील अशाच बाबींच्या दरापेक्षा सुमारे २०% कमी दराने सदरचे साहित्य मनपाच्या विविध विकास कामासाठी उपलब्ध करुन देणे सबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील. त्याचा वापर मनपाच्या विविध विकास कामामध्ये आवश्यकतेनूसार करणेची दक्षता स्थापत्य / उद्यान / ड्रेनेज / पाणीपुरवठा इत्यादी विभागांकडून घेणेसाठी अशा बाबींचा समावेश निविदेमध्ये स्वतंत्रपणे करणेत येईल.

३. यामध्ये प्रामुख्याने पेव्हर ब्लॉक, कर्ब स्टोन, चेंबर्स कव्हर, ट्रि गार्ड, युटीलीटी डक्ट व इतर आवश्यकते प्रमाणे निर्माण होऊ शकणारे नाविन्यपूर्ण प्रिकास्ट प्रॉडक्टसचा समावेश असेल. या व्यतिरिक्त विविध विकास कामांसाठी लागणारे कच्चे साहित्य उदा. दगड, खडी, विटा, वाळू, माती इत्यादी सह रस्त्यासाठी लागणारा भराव, GSB, Wet - Mix इत्यादी विविध बांधकाम साहीत्याचा वापर मनपाच्या विविध विभागाकडील ठेकेदारांमार्फत करणेसाठीची कार्यप्रणाली शहर अभियंता कार्यालयाकडून निश्चित करणेत येईल. त्यानुसार याचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे.

